# महापशुधन वार्ता

वर्ष २ रे, अंक १ ला,  मे -२०२६

१३४

गौरवशाली परंपरा

**पशुसंवर्धन विभाग**

स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष २ रे, अंक १ ला,  मे -२०२६




**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र गीता सुरेश जाधव**

सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११०६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत प्रमिला दयाराम भड**

उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे-४११०६७

**वृत्तसंपादक**

**श्री. संतोष ताराबाई शिवराम पवार,**

'महापशुधन वार्ता' कक्ष,
जनसंपर्क अधिकारी
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

मागील अंक वाचण्यासाठी

dahd.maharashtra.gov.in /अथवा स्कॅन करा

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**मुख्य संपादक**
**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११०६७**

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).




**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना**

**शासन निर्णयासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा.**

राज्यस्तरीय

जिल्हास्तरीय

## या अंकात...


- महामहिम राज्यपाल यांना 'महापशुधनवार्ता' ची प्रत भेट
- जनमानसातील लोकनेते ते महाराष्ट्राचे राज्यपाल
- मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते 'महापशुधनवार्ता'चे अनावरण
- पशुसंवर्धन विभागात युवकांना उद्योजक बनविण्याची क्षमता: मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे
- पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेला लस निर्मिती परवाना
- योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी तत्परतेने काम करावे: मा. श्रीमती पंकजा मुंडे
- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान अंतर्गत मा. सचिव (पदुम) यांना प्रथम पारितोषिक
- मा. आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्या 'सहज' प्रणालीची दखल
- मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्यस्तरीय)
- मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (जिल्हास्तरीय)]
- पशुवैद्यक हे अन्न, आरोग्याचे रक्षक: जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड
- 'झालावडी' शेळीच्या गोठवलेल्या वीर्य मात्रा वितरणाचे उद्घाटन
- मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांच्याकडून लस उत्पादन प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा
- पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प करुया: मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन
- VMDD प्रकल्पांतर्गत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा शुभारंभ
- नागरिकांनी गो-उत्पादनांचा वापर करावा: डॉ. किरण पाटील
- पशुसंवर्धन आयुक्तालयात जागतिक पशुवैद्यक दिन साजरा
- अंबाजोगाईत 'गोकाष्ट' निर्मितीला चालना!
- नांदेडच्या 'मथुरा-लभान' गोवंशाला राष्ट्रीय सन्मान
- 'क्लासिकल स्वाइन फीव्हर' नियंत्रण कार्यक्रम (CSF-CP)
- राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळीपालन प्रकल्पाची पाहणी
- लस निर्मिती क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. सुनीता चौगुले यांचा गौरव
- ब्रॉयलर पक्ष्यांमधील होणारी मरतूक व त्यावरील उपाययोजना
- पशु वन औषधी - वनस्पती उद्यान :जिवंत ग्रंथालय
- कुक्कुटपालनासाठी आवश्यक बाबी व शेड बांधकाम
- पशुधन जनुकीय संसाधने : अपरिचित, अल्पज्ञात व नवओळख प्राप्त जातींच्या संदर्भात
- करडां-कोकरांची मरतूक: शेळी-मेंढी पालनातील सर्वात मोठे आव्हान
- उंट -गाढव अमूल्य दुधासाठी पाळीव जीवनधन !
- दुधाळ पशुधनातील आनुवंशिक सुधारणा
- नागपुरी म्हैस: ग्रामीण अर्थव्यवस्थेचा नवा कणा

# महामहिम राज्यपाल मा. श्री. जिष्णू देव वर्मा यांना 'महापशुधनवार्ता' ची प्रत भेट




मुंबई: महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहिम श्री. जिष्णू देव वर्मा यांची पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ. रामास्वामी एन. यांनी राज्यपालांना पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधनवार्ता' या डिजिटल ई-मासिकाचा अंक भेट देऊन त्यातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली.

'महापशुधनवार्ता' हे ई-मासिक अत्यंत कमी कालावधीत राज्यातील पशुपालक व शेतकरी बांधवांमध्ये लोकप्रिय झाले आहे. हे मासिक केवळ माहितीचे साधन न राहता, पशुसंवर्धन विभाग आणि पशुपालक यांच्यातील एक भक्कम दुवा म्हणून काम करत आहे. या मासिकाद्वारे शासनाच्या विविध योजनांची तसेच उपक्रमांची माहिती थेट पशुपालकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचवली जाते. तज्ज्ञांचे माहितीपूर्ण लेख पशुपालकांना त्यांच्या व्यवसायात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यास मदत करतात. पशुसंवर्धन विभागामार्फत राबवले जाणारे विविध उपक्रम व घडामोडींचा आढावा या मासिकातून घेतला जातो. यातील माहितीमुळे पशुपालकांना आपल्या व्यवसायाची योग्य दिशा निश्चित करणे व व्यावसायिक प्रगती साधणे सोपे झाले आहे.

या भेटीदरम्यान, राज्यपाल महोदयांनी डिजिटल माध्यमाचा प्रभावी वापर करून पशुपालकांपर्यंत पोहोचण्याच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत पशुसंवर्धन विभागाचे व अशा माहितीपूर्ण उपक्रमांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करत महामहिम राज्यपाल महोदयांनी 'महापशुधनवार्ता' या डिजिटल ई-मासिकास शुभेच्छा दिल्या.



# जनमानसातील लोकनेते ते महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल

महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची धुरा सध्या एका अशा व्यक्तिमत्त्वाच्या हाती आहे, ज्यांचा वारसा राजघराण्यातील असला, तरी त्यांचे विचार व कार्य मात्र सर्वसामान्य माणसाच्या हिताशी जोडलेले आहे. त्रिपुराच्या गौरवशाली 'माणिक्य' राजवंशातील मा. श्री. जिष्णू देव वर्मा हे केवळ एक राजकारणी नसून, एक संवेदनशील कवी, प्रतिभावंत कलाकार व द्रष्टे प्रशासक म्हणून ओळखले जातात.



त्रिपुराचा माणिक्य राजवंश हा भारतातील सर्वात जुन्या व आधुनिक विचारांच्या राजवंशांपैकी एक मानला जातो. सन १९४१ मध्येच या राजवंशाने त्रिपुराला पहिले लिखित संविधान दिले होते. विशेष म्हणजे, देशात आरक्षणाचे वारे वाहण्यापूर्वीच या संविधानात अल्पसंख्याक, मजूर व मागासवर्गीयांना विधिमंडळात प्रतिनिधित्व देण्याची तरतूद करण्यात आली होती. असा हा समतावादी व प्रगत विचारांचा वारसा घेऊन मा. श्री. जिष्णू देव वर्मा सार्वजनिक जीवनात आले.

सन १९९३ मध्ये भारतीय जनता पक्षातून राजकीय प्रवासाची सुरुवात करणाऱ्या श्री. वर्मा यांनी संघटनेत महत्त्वाची पदे भूषवली. २०१८ च्या निवडणुकीत त्यांनी 'चारिलम' मतदारसंघातून मिळवलेला विजय ऐतिहासिक होता. त्यांना तब्बल ८९.३३% मते मिळाली, जी त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष देतात. त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना त्यांनी अर्थ, ऊर्जा व ग्रामीण विकास यांसारख्या खात्यांना नवी गती दिली.

शब्दांकन: संतोष पवार, महापशुधनवार्ता



### 'बायो व्हिलेज'च्या माध्यमातून ग्रामीण क्रांती

महामहिम राज्यपाल श्री. वर्मा यांची सर्वात महत्त्वाची ओळख म्हणजे त्यांनी राबवलेला 'बायो व्हिलेज २.०' हा प्रकल्प. ग्रामीण भागात शेती, ऊर्जा व उपजीविकेच्या साधनांमध्ये पर्यावरणाचे रक्षण करत शाश्वत विकास कसा साधता येतो, याचे आदर्श उदाहरण त्यांनी जगासमोर ठेवले. त्यांच्या या उपक्रमाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. प्रशासकीय कामाच्या व्यापातही त्यांच्यातील कलाकार नेहमीच जागृत असतो. ते एक उत्तम चित्रकार व शिल्पकार आहेत. त्यांच्या कविता हृदयाला भिडणाऱ्या असतात. 'चिल्ड्रन ऑफ वॉटर गॉडेस' आणि 'मास्टर ऑफ टाइम' या त्यांच्या पुस्तकांमधून त्यांच्यातील संवेदनशील कवीचे दर्शन घडते. "आपल्या मनात केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर आपल्याकडे आशेने पाहणाऱ्यांसाठीही जागा असावी," हा त्यांचा विचार खूप काही सांगून जातो.

राजघराण्याचा वारसा व उपमुख्यमंत्रीपद यांसारखी मोठी पदे भूषवूनही श्री. जिष्णू देव वर्मा यांचा साधेपणा सर्वांना थक्क करतो. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांच्या आयुष्यात सुखाचे चार क्षण निर्माण करणे, हेच त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. दि. ३१ जुलै २०२४ रोजी तेलंगणाचे राज्यपाल म्हणून कार्यभार सांभाळल्यानंतर, १० मार्च २०२६ रोजी त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे ते अल्पावधीतच महाराष्ट्राच्या जनतेचे लाडके राज्यपाल बनले आहेत. आदिवासी विकास, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत कार्य करण्याची त्यांची जिद्द महाराष्ट्राच्या प्रगतीला नक्कीच नवी दिशा देईल, यात शंका नाही.

# मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते 'महापशुधनवार्ता'चे अनावरण

## पशुसंवर्धन विभागाच्या उपक्रमाचे कौतुक



मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी 'महापशुधनवार्ता' मासिकाची प्रत मुख्यमंत्र्यांना भेट दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अंकाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महापशुधन वार्ता

# पशुसंवर्धन विभागात युवकांना उद्योजक बनविण्याची क्षमता: मा. मंत्री श्रीमती पंकजा मुंडे



## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना सादरीकरण व कार्यशाळा उत्साहात

## वराहपालनास चालना देण्यासह अंड्यांच्या ब्रँडसाठी नियोजन करण्याचे निर्देश

**पुणे:** पशुसंवर्धन विभागात गेल्या दोन वर्षांमध्ये घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयामुळे या विभागाने आपली यशस्वी वाटचाल अधिक प्रशस्त व गतिमान करून ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मजबुती प्रदान केली आहे. आता यात आणखी भर म्हणून शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेला मंजुरी दिली असून, या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात लाखो रोजगार संधींची निर्मिती होणार आहे. त्यामुळे बेरोजगारांना उद्योजक बनविण्याची क्षमता पशुसंवर्धन विभागामध्ये असल्याची बाब लक्षात घेता पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाने सांघिक प्रयत्नांतून विकसित महाराष्ट्राच्या प्रक्रियेत समर्पित योगदान द्यावे, असे प्रतिपादन मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांनी केले.

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पशुपालन क्षेत्राला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. यानिमित्त शुक्रवारी, १० एप्रिल २०२६ रोजी पशुसंवर्धन आयुक्तालयात मा. श्रीमती पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली योजना सादरीकरण व अंमलबजावणी कार्यशाळा पार पडली. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा, मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.), पशुसंवर्धन विभा-



मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), मा. जिल्हाधिकारी (बुलडाणा), तथा पशुसंवर्धन विभागाचे माजी आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), मा. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग श्री. प्रशांत मोहोळ, मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. शितलकुमार मुकणे, मा. सहसचिव श्री. निवृत्ती मराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मा. श्रीमती मुंडे पुढे म्हणाल्या, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना, ही ग्रामीण महाराष्ट्रातील पशुपालकांसाठी आर्थिक व सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार आहे. ग्रामीण युवकांना केवळ पारंपारिक पशुपालन न करता, त्याकडे एक व्यावसायिक 'उद्योजकता' म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनासाठी तांत्रिक व आर्थिक मदत देऊन ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पशुपालनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पशुजन्य उत्पादनांची उत्पादकता वाढवणे व स्थानिक स्तरावरच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगार विकासाच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे. पशुसंवर्धन विभागाच्या या पुढाकारामुळे राज्याच्या ग्रामीण विकास प्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे, असा विश्वास आहे.

**वराहपालनासह अंड्यांच्या ब्रँडसाठी प्रयत्न करूयात**

राज्यामध्ये पशुसंवर्धनाच्या व्यवसायाचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. प्रादेशिक अनुकूलता व बाजार संलग्नता लक्षात घेता त्यानुसार व्यवसायांची व्यापकता वाढविण्यावर पशुसंवर्धन विभाग भर देणार आहे. त्या दृष्टिकोनातून आदिवासी भागात वराहपालनासह राज्यात सर्वदूर कुक्कुट अंडी उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रयत्न आरंभण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचा अंड्यांचा स्वतंत्र ब्रँड विकसित करण्यासाठी आपण नियोजन केले पाहिजे. त्यासाठी विभागाला आवश्यक निधी उपलब्ध होत असून, त्याचा विनियोग आपण नियोजनपूर्वक केला पाहिजे. पशुजन्य पदार्थांना असलेली बारमाही मागणी लक्षात घेता आता आपण व्यावसायिक विचार व्यापक करण्यावर आणखी भर दिला पाहिजे, असे मत यावेळी मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

## माणूस छोटा, पशुधन मोठे

परळी वैजनाथ, जि. बीड येथे आयोजित 'महापशुधन एक्स्पो-२०२६' हे प्रदर्शन ग्रामीण पशुपर्यटनाचा एक उत्कृष्ट उदाहरण होते. सर्वसामान्य शेतकरी, पशुपालक, नागरिक यांना प्राण्यांविषयी असलेली कणव या प्रदर्शनाच्या माध्यमातून अधोरेखित झाली. आई-वडिलांच्या खांद्यावर बसून प्रदर्शनात सहभागी झालेल्या पशुधनाकडे कौतुकाने पाहत प्रदर्शनाचा आनंद घेणारी लहान मुले पाहताना मला माणूस छोटा अन् पशुधन मोठे वाटले, जे आपल्याला आनंद देऊन पशुजन्य उत्पादनांच्या माध्यमातून स्वतःला मानवाच्या सेवेसाठी समर्पित करतात.


## पशुसंवर्धन विभागाच्या ताफ्यात 16 वाहने दाखल



क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाचे प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांच्यासाठी १६ वाहने खरेदी करण्यात आली. मा. मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल श्रीमती पंकजा मुंडे यांच्या हस्ते वाहनांचे पूजन करून हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

मा. सचिव महोदय यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही पशुसंवर्धन विभागाची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, या योजनेमुळे महाराष्ट्राचे अर्थचक्र अधिक गतिमान होण्यास मदत होणार आहे. पशुसंवर्धन विभागाने शासनाच्या 'विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेला अनुसरून आपली वाटचाल आरंभली असून, या संकल्पनेच्या यशस्वीतेत पशुसंवर्धन विभागाचे योगदान निश्चित दोन आकडी राहील. विभागाचे अंदाजपत्रक आज ४,५५२ कोटी रुपयांपर्यंत विस्तारित करण्यात आले असून, त्यात डीपीसीतून (DPC) उपलब्ध होणाऱ्या सुमारे २,००० कोटी रुपयांच्या निधीची भर पडणार आहे.

महापशुधन वार्ता



# शेळ्यांतील देवी लशीत राज्य स्वयंपूर्णतेकडे

## पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेला लस निर्मिती परवाना



**पुणे,** शेळ्यांतील देवी (गोट पॉक्स) लशीची निर्मिती राज्यात होणार आहे. यामुळे खासगी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. औंध येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेला व्यावसायिक उत्पादनाचा परवाना मिळाला असून, परवाना मिळणारी पुण्यातील ही संस्था देशात पहिली शासकीय संस्था ठरली आहे. या परवान्यामुळे आता शासकीय स्तरावर लसीचे उत्पादन सुरू झाले असून, मान्सूनपूर्व लसीकरणासाठी डोस उपलब्ध होणार आहेत.

शेळीपालन व्यवसायासाठी घातक ठरणाऱ्या गोट पॉक्स आजाराच्या नियंत्रणासाठी केवळ दोन खासगी कंपन्यांकडूनच लसीचे उत्पादन केले जात होते. शासनालाही याच कंपन्यांवर अवलंबून राहावे लागत होते. या लशीच्या उत्पादनासाठी आवश्यक तंत्रज्ञान संस्थेला डिसेंबर २०२२ मध्ये हस्तांतर झाले होते. त्यानंतर सर्व तपासण्या व अंतिम परवाना मिळण्यास चार वर्षांचा कालावधी लागला.

सध्या या संस्थेत व्यावसायिक तत्त्वावर लशीचे उत्पादन सुरू झाले आहे. पहिल्या तीन बॅचचे परीक्षण उत्तरप्रदेशमधील इंडियन व्हेटर्नरी रिसर्च इन्स्टिट्यूटकडून यशस्वी झाल्यानंतर ही लस प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर वितरित केली जाणार आहे.

**परवाना प्रक्रिया**

- ❑ डिसेंबर २०२२ मध्ये तंत्रज्ञान हस्तांतर
- ❑ ड्रग्स कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाकडे १६ मार्च २०२५ रोजी अर्ज
- ❑ सेंट्रल ड्रग्स स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन मुंबई व राज्य अन्न व औषध प्रशासन यांची संयुक्त तपासणी
- ❑ २७ नोव्हेंबर २०२५ : केंद्र शासनाचा ना हरकत दाखला
- ❑ ३० डिसेंबर २०२५ : सेंट्रल ड्रग्स स्टॅंडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनकडून ना हरकत
- ❑ १३ मार्च २०२६ : अंतिम परवाना मंजूर

**राज्यातील शेळ्यांची संख्या**

१,०६,०४,०००

**लस निर्मितीची क्षमता**

(प्रतीमाह)

२० ते २५ लाख मात्रा

**यावर्षीचे लस निर्मितीचे उद्दिष्ट**

१,१७,००,००० मात्रा



मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. म्हणाले, महाराष्ट्र हे पशुसंवर्धन क्षेत्राला कृषीचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य आहे, त्यामुळे विभागाला कृषीचा दर्जा निर्माण करायचा आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'व्हिजन डाक्युमेंट' विकास क्षेत्रात कृषी आणि पशुसंवर्धन समावेश करण्यात आलेला आहे. 'व्हिजन डाक्युमेंट'च्या धर्तीवर ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पशुपालन क्षेत्राला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. अर्थसंकल्पात पशुसंर्वधन विभागाकरिता ४ हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड, लाभार्थ्यांशी संवाद, वेळेत निधी खर्च, किसान क्रेडिट कार्डचे वितरण, कृत्रिम बुद्धीमत्तेचा प्रभावी वापर, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, मनुष्यबळ उपलब्धता आदीबाबत नियोजन करुन काम करायचे आहे, असेही डॉ. रामास्वामी एन. म्हणाले.

त्यामुळे पशुसंवर्धनासाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधांसोबत योजनांच्या यशस्वीतेसाठी आवश्यक वित्तीय पूर्तता होणार आहे. सेंद्रिय (ऑरगॅनिक) उत्पादनांना ग्राहकांकडून होत असलेली वाढती मागणी लक्षात घेता स्वच्छ व दर्जेदार पशुजन्य उत्पादनांच्या निर्मितीवर पशुसंवर्धन विभागाचा भर असणार आहे. यासाठी पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला मिळालेला कृषीचा दर्जा वृद्धिंगत करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर असणार आहे. करिता, विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समर्पित लोकसेवेच्या माध्यमातून 'विकसित महाराष्ट्र २०४७' संकल्पना यशस्वीतेसाठी आपले योगदान द्यावे.

मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी प्रास्ताविक करताना विभागाच्या पुढील वाटचालीबाबत नियोजनाची माहिती दिली. कार्यशाळेदरम्यान, मुख्यमंत्री ग्रामीण उद्योजकता विकास योजना तयार करण्यामध्ये सहभाग नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यांचा तसेच परळी वैजनाथ, जि. बीड येथे आयोजित 'महापशुधन एक्स्पो-२०२६' च्या यशस्वीतेत योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच पशुसंवर्धन विभागाचे माजी आयुक्त तथा बुलढाणा जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. यानंतर पशुसंवर्धन विभागाचे डिजिटल ई-मासिक 'महापशुधनवार्ता'चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्यभरातील प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन उपस्थित होते.

# योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे

## पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे निर्देश



**चंद्रपूर:** पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असून, पशुपालकांना सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पशुधनाचे आरोग्य, लसीकरण व शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, असे निर्देश पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी दिले.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तालय, चंद्रपूर येथे जिल्ह्यातील पशुपालकांच्या विविध प्रश्नांबाबत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.सदर आढावा बैठकीत, जिल्ह्यातील पशुधनाच्या आरोग्याबाबत प्रशासन सतर्क असून, लसीकरण मोहिमेची सद्यस्थिती व ती अधिक प्रभावीपणे राबवण्यावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी काळात जिल्ह्यात चारा टंचाई भासू नये, यासाठी आतापासूनच योग्य नियोजन व उपाययोजना करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले. पशुपालकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ थेट शेवटच्या गरजू पशुपालकापर्यंत पोहोचवण्यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले.

"पशुपालकांच्या अडीअडचणी सोडवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याला पशुसंवर्धन विभागाचे प्राधान्य आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची व निर्णायक आहे," असे मत श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केले.

महापशुधन वार्ता

# 'झिरो ब्युरोक्रसी'कडे शासनाची वाटचाल; प्रशासनाने 'स्टार्टअप'सारखे काम करावे: मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान अंतर्गत मा. सचिव (पदुम) यांना प्रथम पारितोषिक**

मुंबई: राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान व नागरिकाभिमुख करण्यासाठी 'झिरो ब्युरोक्रसी'ची संकल्पना राबविण्याचा निर्धार व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाने 'स्टार्टअप'प्रमाणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमेय आणि मानवी हस्तक्षेप कमी करून पात्र नागरिकांना थेट सेवा देणे हेच -झिरो ब्युरोक्रसी॰चे मूळ तत्त्व असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नागरी सेवा दिन २०२६ आणि -राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या सभारंभास कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची -स्टार्टअप॰शी तुलना करत, प्रत्येक विभागाने स्वतःकडे एक स्वतंत्र स्टार्टअप म्हणून पाहिले पाहिजे, असे सांगितले.

## प्रशासकीय गतिमानता व नाविन्यपूर्ण उपक्रम पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'प्रशासकीय गतिमानता' पुरस्कारांतर्गत, कृषी व पदुम (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय) विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी 'ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रणा' या त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाने हे यश संपादन केले. या प्रणालीमुळे कृषी क्षेत्रातील नियोजनात आधुनिकता येणार असून, शेतीची पाहणी व सांख्यिकी माहितीचे व्यवस्थापन अधिक अचूक व गतिमान पद्धतीने करणे शक्य झाले आहे. तंत्रज्ञानाचा हा प्रभावी वापर प्रशासकीय कार्यक्षमतेत मोलाची भर घालणारा ठरला आहे. डॉ. रामास्वामी एन. यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या या डिजिटल उपक्रमामुळे प्रशासकीय कारभारात पारदर्शकता व अचूकता वाढण्यास मोठी मदत झाली आहे.

# मा. आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्या 'सहज' प्रणालीची दखल 'द्वितीय सेवा हक्क दिनी' विशेष सन्मान



**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बुलडाणा जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा सध्याचे पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी राबवलेल्या 'सहज प्रणाली' या नावीन्यपूर्ण उपक्रमाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून, या उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात त्यांचा राज्याचे मुख्य सचिव मा. श्री. राजेश अगरवाल यांचे हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या वतीने 'द्वितीय सेवा हक्क दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमास राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे आयुक्त सुधाकर तेलंग, छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त किरण जाधव तसेच नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी पदावर कार्यरत असताना, सामान्य नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत व पारदर्शक पद्धतीने मिळाव्यात यासाठी 'सहज प्रणाली' विकसित केली होती. या उपक्रमामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येऊन नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचले. हा पॅटर्न संपूर्ण राज्यासाठी आदर्श ठरला असून, इतर जिल्हाधिकाऱ्यांनाही यातून प्रेरणा मिळावी या उद्देशाने आयोगाकडून डॉ. पाटील यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डॉ. पाटील यांच्या या यशामुळे सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## राज्यस्तरीय योजना

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमाद्वारे जनमानसाचे जीवनमान उंचावणे, शाश्वत आर्थिक समृद्धी मिळवणे, पर्यावरणीय व्यवस्थापन स्थिर ठेवून राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सची करण्याचे राज्याचे ध्येय आहे. सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पुर्ण होत आहेत. राज्यातील नागरिकांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षा व न्याय व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत राज्यात १०० उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कृषी व संलग्न क्षेत्रातील ७ उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून, शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. या उपक्रमाव्दारे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व पशुपालन या शेतीपुरक जोडधंद्यांना उद्योजकतेचे स्वरुप देण्यासाठी सुयोग्य वातावरण (integrated ecosystem) उपलब्ध करून देणे, हा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना'- राज्यस्तरीय योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.



**डॉ. रामास्वामी एन.** (भा.प्र.से.)
सचिव (पदुम),
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखड्यानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देणारे ८ घटक सुनिश्चित केले आहे. त्यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात भरीव सहभाग नोंदविण्यासाठी पशुजन्य उत्पन्नात वाढ करण्याच्या व्यापक भूमिकेतून पशुआरोग्याच्या सुविधेबरोबरच पशुपालन व्यवसायास पोषक वातावरण उपलब्ध करुन देणे हे पशुसंवर्धन विभागाचे धोरण आहे. यासाठी पशुसंवर्धन विभाग पशुपैदास सुधारणा (Breeding), पशुधनाचे आरोग्य (Animal Health), वैरण विकास (Fodder), पशुखाद्य (Feed) व पशुधनाचे व्यवस्थापन (Management) या पंचसूत्रीनुसार काम करत आहे.

राज्यात केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची वंशावळ निर्माण करण्यासाठी कृत्रिम रेतन, लिंग विनिश्चित रेत मात्रांचा पुरवठा, भृण प्रत्यारोपण या आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येत असून, पशुपालकांना त्यांच्या दारात पशुआरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने फिरते पशुचिकित्सा पथके कार्यान्वित आहेत. याशिवाय उत्पादन वाढीसाठी वैरण विकास कार्यक्रमासही प्राधान्य देण्यात येत आहे. पशुजन्य उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने विभाग प्रयत्नरत आहे. जेणेकरुन, पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होवून राज्याच्या अर्थव्यवस्थेस बळकटीकरण प्राप्त होईल.

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालात चालू असलेल्या योजनांचे पुनर्विलोकन करुन पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजना एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस केली. मा. मंत्रिमंडळाने दि. १९.०८.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत सदर अहवाल स्विकारला. त्यानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या जिल्हा वार्षिक व राज्यस्तरीय योजनांमध्ये सुसुत्रिकरण करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला होता. मा. मंत्रिमंडळाने दिनांक २२.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर मान्यतेनुसार सध्या अंमलात असलेल्या १८ राज्यस्तरीय योजनांपैकी २ राज्यस्तरीय योजना सुरु ठेवण्यास, ११ योजना बंद करण्यास, ५ योजना सुधारित स्वरुपात व ५ नविन योजना सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सुधारीत व नवीन योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे:

## 1) 5 दुधाळ गाय / म्हैस पालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास योजना :-



**लाभाचे स्वरुप:** लाभार्थ्यांना ०५ दुधाळ गाय/ म्हैस व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील अल्पभुधारक, अत्यल्प भुधारक व महिला बचत गट

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभाथी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

ब) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ, ब, क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

१) १ एकर स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्ट्याची जमीन आवश्यक. वनहक्क धारकांना सदर अट लागू राहणार नाही.

२) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील)

किंवा

२ वर्षाचा दुग्ध व्यवसायाचा अनुभव

**प्रकल्पाची किंमत:**

(१) ५ गाय/ म्हैस रु. ५,००,०००/- (प्रति गाय व म्हैस रु. १ लक्ष) व विमा (रु ५,६०,१८०/-)

(२) शेड निर्मिती- रु. ३,००,०००/-

(३) साधन सामुग्री (कडबाकुट्टी यंत्र, फॉगिंग मशीन, खाद्यपाण्याची भांडी, मिल्कींग मशीन, दुध कॅन, फवारणी यंत्र, सोलर ३५ व इतर साहित्य) रु.२,७५,०००/-

**प्रकल्पाची एकूण किंमत**-रु. ११,३५,१८०/-

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु. ५,६७,५९० /-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के (रु. ८,५१,३८५/-)

३) अनुदान २ टप्यात देय राहील. एकुण अनुदानाच्या ५० टक्के इतके पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती तसेच साधनसामुग्री खरेदी केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान जनावरांच्या खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे:**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.) **किंवा** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा दूध संस्थेस किमान २ वर्ष दूध विक्री करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) या योजनेमध्ये प्रती दिन १० ते १२ लिटर दूध उत्पादन देणाऱ्या एच.एफ., जर्सी या संकरित गाई, प्रतीदिन ८ ते १० लिटर दूध उत्पादन देणाऱ्या गीर, सहीवाल, रेड सिंधी, राठी, थारपारकर, प्रती दिन ५ ते ७ लिटर दूध उत्पादन देणाऱ्या स्थानिक प्रजातीच्या गायी / म्हशींचे वाटप करण्यात येईल.

२) वाटप करावयाची दुधाळ जनावरे ही शक्यतो १-२ महिन्यांपूर्वी व्यालेली दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील असावीत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी करावी.

४) एक महिन्याच्या कालावधीत संबंधित लाभार्थ्याने त्याच्या पसंतीनुसार इतर राज्यातून दुधाळ जनावरांची खरेदी करावी. जर लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

५) शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

६) वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.

७) योजनेमध्ये वाटप केलेले जनावर मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसरे दुधाळ जनावर खरेदी करुन पुरविण्यात यावे.

८) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्याचा शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरे खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

९) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१०) योजनेंतर्गत प्राप्त दुधाळ जनावरांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या प्रमुखाने करणे बंधनकारक राहील.

११) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## 2) शेळी-मेंढीपालन प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकास योजना :-

**लाभाचे स्वरुप:** ५०+५ शेळी/मेंढी गट व ३ वर्षाचा विमा, शेड व साधन सामुग्री

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला बचत गट

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

ब) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ, ब, क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के व महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.



**पात्रता**

१) स्वतःची १ एकर किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा इतकी जमीन आवश्यक, मात्र वनहक्क धारकांना सदर अट लागू राहणार नाही.

२) पशुपालन दुग्ध व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) **किंवा** २ वर्षाचा शेळी/मेंढी व्यवसायाचा अनुभव

**प्रकल्पाची किंमत : ५०+५ शेळी/मेंढी**

१) पशुधन खरेदी- प्रती शेळी / मेंढी रु. १२,०००/- व बोकड / मेंढा रु.१५,०००/- प्रमाणे गटाची किंमत- रु. ६,७५,०००/-

२) ३ वर्षाचा विमा-१२.७५% (+ १८% GST)-रु. १,०१,५५४/-

३) शेड निर्मिती- रु. २,००,०००/-

४) कडबा कुट्टी यंत्र-रु.३०,०००/-

५) सोलर (३ kw)-रु. १,३२,०००/-

**प्रकल्पाची एकूण किंमत - रु.११,३८,५५४/-**

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के ( रु. ५,६९,२७७/-)

२) अनु. जाती जमाती लाभार्थी ७५ टक्के (रु. ८,५३,९१५/-)

३) अनुदान २ टप्प्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती तसेच साधनसामुग्री खरेदी केल्यानंतर व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान शेळी/मेंढी गट खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमीपत्र.) किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) खरेदी समितीच्या उपस्थितीत गटाची खरेदी करावी.

२) खरेदी प्राथम्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या प्रक्षेत्रावर उत्पादित झालेल्या शेळ्या-मेंढ्यांतून करण्यात यावी.

३) महामंडळाच्या प्रक्षेत्रावर शेळ्या-मेंढया उपलब्ध नसल्यास महामंडळाकडून ना-उपलब्धता प्रमाणपत्र घेवून गटाची खरेदी खाजगी / राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळ्या-मेंढ्यांच्या ब्रिडींग फार्म, स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित शेळी प्रकल्पावरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंती व वजनानुसार करावी.

४) सदरच्या शेळ्या, मेंढया, बोकड व मेंढे स्थानिक वातावरणात तग धरतील याची दक्षता घेण्यात यावी.

५) या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाच्या शेळया मेंढया तसेच, बोकड / मेंढे यांचे वय १ ते ३ वर्ष वयोगटातील असाव्यात.

६) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, गठीत समिती समवेत शेळी / मेंढी गट खरेदी करावी.

७) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, जनावरांची खरेदी न केल्यास त्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

८) शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, पशुधनाच्या खरेदीनंतर पशुधन वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

९) वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.

१०) योजनेतील शेळ्या-मेंढ्या मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसऱ्या शेळया / मेंढ्या खरेदी करुन पुरविण्यात याव्यात.

११) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा शेड निर्मिती व साधन सामुग्री खरेदी तसेच, पशुधन खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त यांना सादर करावा.

१२) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१३) योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची नोंद एनडीएलएम पोर्टलवर कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थाप्रमुखाने करणे बंधनकारक राहील.

१४) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## ३) कुक्कुट पक्षांचे वाटपः-

### अ) अंडी देणाऱ्या सुधारित कुक्कुट / देशी पक्षांचे वाटपः




**लाभाचे स्वरुप:** किमान २०० अंडी उत्पादन देणारे ५००० एक दिवशीय पक्षी, १ महिन्याच्या खाद्यावरील खर्च, अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने शेड बांधकाम, खाद्य, पाणी पुरवठा, भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट, ऑटोमेशन प्रणाली, इत्यादी आवश्यक साहित्य, सोलर (३ kw)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भुधारक,
ब) अल्पभुधारक,
क) वनहक्क धारक
ड) सुशिक्षित बेकार,
इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.
२) आरक्षणानुसार पुरेसे महिला पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**प्रकल्पाची किंमत**

१) किमान २०० अंडी उत्पादन देणारे ५००० एक दिवशीय पक्षी (रु. ५०/-प्रती पक्षी प्रमाणे) - रु. २,५०,०००/-
२) १ महिन्याच्या खाद्यावरील खर्च (३ कि.ग्रॅ. प्रती पक्षी x ५००० पक्षी x रु.३०/- प्रती कि.ग्रॅ. प्रमाणे) रु. ४,५०,०००/
३) अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने शेड बांधकाम रु. १५,००,०००/-च्या मर्यादेत
४) खाद्य, पाणी पुरवठा, भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट, ऑटोमेशन, इत्यादी आवश्यक साहित्य- रु. ६,६८,०००/-
५) सोलर (३ kw) - रु.१,३२,०००/-
६) प्रकल्प एकूण किंमत - रु.३०,००,०००/-

**पात्रता**

१) किमान २० गुंठे स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

२) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु. १५,००,०००/-)
२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी- ७५ टक्के (रु. २२,५०,०००/-)
३) अनुदान २ टप्प्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के इतके पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्प्याचे ५० टक्के अनुदान साधनसामुग्री खरेदी व पक्षी खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे किंवा स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र) २) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) प्रकल्पासाठी कर्ज मंजूरी सहमती

**अटी व शर्ती:**

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान २०० अंडी उत्पादन देणारे असाव्यात.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट / सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र/ राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घ्यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच दोन महिन्याच्या आत लाभार्थ्याने कुक्कुटपालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या एक महिन्याच्या कालावधीत पक्षी, खाद्य/पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुटपालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुट पक्षांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) अनुदानाच्या ५० टक्के अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करताना बँकेचे कर्ज मंजूरी आदेश

८) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

## आ) पशुपालक/शेतकऱ्यांना देशी / सुधारित मार्सल कुक्कुट 3000 ते 5000 पर्यंत पक्षांच्या संगोपनाद्वारे उद्योजकता विकासः

**लाभाचे स्वरुप:** शेड क्षेत्र, सोलर, खाद्य व पाणी भांडी, सोलर प्रणाली (३ kw क्षमतेची)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भुधारक,

ब) अल्पभुधारक,

क) वनहक्क धारक

ड) सुशिक्षित बेकार,

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.



**प्रकल्पाची किंमत:**

**१) शेड** - प्रती पक्षी १.२ चौ.फु. जागा आवश्यक, खर्च रु. २५०/- प्रती चौ.फु. दर

**२) खाद्य व पाणी भांडी इत्यादी** प्रती पक्षी रु.५०/- प्रमाणे

**३) सोलर अंदाजीत** - रु १५००००/- (अन्य योजनेत अनुदानाचा लाभ घेतल्यास अनुज्ञेय नाही)

**४) प्रकल्पाची एकूण किंमत-३००० पक्षी-** रु. १२,००,०००/-

**५) ५००० पक्षी-** रु. १९,००,०००/-



**पात्रता**

१) किमान २० गुंठे स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

२) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभघेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (३००० पक्षी ६,००,०००/- तर ५००० पक्षी-रु. ९,५०,०००/-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के (३००० पक्षी-९,००,०००/- तर ५००० पक्षी-रु. १४,२५,०००/-)

३) अनुदान २ टप्यात देय राहील. एकूण अनुदानाच्या ५० टक्के इतका पहिल्या टप्प्याचे अनुदान लाभार्थ्याने शेड निर्मिती केल्यानंतर देय राहील व उर्वरीत दुसऱ्या टप्याचे ५० टक्के अनुदान साधनसामुग्री खरेदी व पक्षी खरेदीनंतर देण्यात येईल.

**आवश्यक कागदपत्रे:**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

**किंवा**

कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) प्रकल्पासाठी कर्ज मंजूरी सहमती

**अटी व शर्ती**

१) सुधारित पक्षी खुल्या बाजारातून खरेदी करता येतील.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट / सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र / राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घेण्यात यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच दोन महिन्यात लाभार्थ्याने कुक्कुट पालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या १ महिन्यात पक्षी, खाद्य/पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुट पालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुट पक्षांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) अनुदानाच्या ५० टक्के अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करताना बँकेचे कर्ज मंजूरी आदेश

८) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

९) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

१०) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

## इ) 1000 प्रती आठवडा अंडी उबवणी क्षमतेच्या संयंत्राचा (Incubator, Hatcher) पुरवठा:

**लाभाचे स्वरुप:** प्रती आठवडा १००० अंडी उबवणी क्षमतेचे संयंत्र (Incubator, Hatcher), सोलर यंत्रणा (३ kw क्षमता)

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन,

ब) अत्यल्प भुधारक,

क) अल्पभुधारक,

ड) सुशिक्षित बेकार,

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.




२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता:**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक)

**प्रकल्पांची किंमत**

१) प्रती आठवडा १००० अंडी उबवणी क्षमतेचे संयंत्र (Incubator, Hatcher) रु २, ०८,०००/-

२) सोलार युनिट (३ kw)- रु १,३२,०००/-

एकूण किंमत ३,४०,०००/-

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु.१,७०,०००/-)

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी - ७५ टक्के टक्के (रु. २,५५,०००/-)

**आवश्यक कागदपत्रे**

१) कुक्कुटपालन व्यवसायातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्याबाबतचे स्थानिक पशुवैद्यक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा कुक्कुटपालन व्यवसायाचे शासन / शासनमान्य संस्थांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण न घेतलेल्या लाभार्थ्यांनी लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

२) दिव्यांगांसाठी UDID **प्रमाणपत्र**

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने अंडी उबवणी यंत्राची उभारणी करावी.

२) तद्नंतरच्या एक महिन्यात प्रत्यक्ष अंडी उबवणी सुरु करावे.

३) लाभार्थ्याने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत अंडी उबवणी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, **छायाचित्र**, लाभार्थ्यांचे बँकेचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

५) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

६) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

७) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.




**लाभाचे स्वरुप:** मुरघास हार्वेस्टर (चार ओळी एकाचवेळी हॉरवेस्ट) व मुरघास बेलर संयंत्र

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अ.जाती, जमाती लाभार्थी निवड खालील घटकांतून उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक ब) अल्प भूधारक क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ व क मधील)

१) वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

२) आरक्षणानुसार पुरेसे पात्र अर्जदार उपलब्ध न झाल्यास इतर घटकांमधील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता:**

किमान १० मोठे पशुधन / १०० शेळ्या किंवा मेंढ्या संख्या, स्वतःचा किमान ५० hp ट्रॅक्टर आवश्यक.

उपकरणाची किंमत रु.२६,००,०००/- च्या मर्यादेत

**अनुदानाचे स्वरुप:**

१) सर्वसाधारण लाभार्थी ५० टक्के (रु.१३,००,०००/-)

२) अनुसुचित जाती / जमाती लाभार्थी ७५ टक्के (रु.१९,५०,०००/-)

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान १० मोठे पशुधन / १०० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) अर्जदाराच्या नावे / कुटुंबातील सदस्याचे नावे असलेले ट्रॅक्टरचे नोंदणी कार्ड (आरसी कार्ड)

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) बँकेचे कर्ज मंजूरीबाबतचे सहमती पत्र किंवा स्वनिधीतून मुरघास सयंत्र खरेदी करणार असल्यास किमान स्वः हिश्श्याची रक्कम जमा असल्याचे स्वतः च्या बँक खात्याचे एक महिन्याचे विवरणपत्र

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या आत मुरघास हार्वेस्टर खरेदीसाठी रकमेचा भरणा करावा.

२) लाभार्थ्यांने ३ महिन्याच्या आत मुरघास हार्वेस्टर (चार ओळी एकाच वेळी हॉरवेस्ट) व मुरघास बेलर संयंत्र खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) मुरघास हार्वेस्टर व मुरघास बेलर संयंत्र वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

६) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

**योजनेचे नाव:** शेळी /मेंढी / गाय / म्हैस / कुक्कुटपालन/ वराहपालन व्यवसायाद्वारे उद्योजकता विकास करणेसाठी घेतलेल्या कर्जामध्ये व्याज सवलत देणे.

**लाभाचे स्वरुप:** शेळी / मेंढी / गाय / म्हैस /कुक्कुटपालन व्यवसायासाठी प्रकल्प धारकाने वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या कर्जाची विहीत मुदतीत परतफेड केल्यास व्याज दरात ४ टक्के व्याज सवलत

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.




**पात्रता:**

१) बँकेकडून कर्ज घेऊन शेळी / मेंढी / गाय / म्हैस / कुक्कुटपालन, वराहपालन प्रकल्प, चारा प्रक्रिया / पशुखाद्य निर्मिती कारखाना

२) केंद्र / राज्याच्या अन्य अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

**अनुदानाचे स्वरुप:**

कर्जावरील व्याजदरात ४ टक्के सवलत एकूण रु. ४,००,००० च्या मर्यादेत पुर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर

**आवश्यक कागदपत्रे**

बँकेचे प्रकल्प मंजूरी व कर्ज मंजूरीचे पत्र

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने निवड झाल्याचे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन यांनी कळविल्यानंतर प्रकल्प / कारखाना उभारणी करावी.

२) कर्जाची विहित वेळेत परतफेड करणे आवश्यक.

३) घेतलेल्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के सवलत (एकूण रु. ४,००,००० च्या मर्यादेत) पुर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर बँकेचे नादेय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.




**व्यवस्थापन: पशुसंवर्धन व्यवसायात Artificial Intelligence व ML (Machine Learning) तंत्रज्ञानाचा वापर :-**

**लाभाचे स्वरुप:** पशुपालकाकडील गाय / म्हैशीच्या गळ्यातील सेन्सर/स्मार्ट कॉलर बेल्ट प्रती गाय / म्हैस रु ५०००/- व एका गोठ्यासाठी गेटवे रु १०,०००/- (५० टक्के अनुदान तत्वावर) किमान ५ ते ४० गायी / म्हशी.

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**पात्रता:** भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेल्या स्वतःच्या किमान ५ गायी / म्हशी

**प्रकल्प किंमत**

१) गाय / म्हशीच्या गळ्यातील सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट प्रती गाय / म्हैस रु. ५०००/-

२) एका गोठ्यासाठी (किमान ५ ते ४० गायी/म्हशी) गेटवे रु. १०,०००/-

**अनुदानाचे स्वरुप**

सर्व प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान तत्वावर (प्रती लाभार्थी रु. १,००,०००/-च्या मर्यादेत)

**आवश्यक कागदपत्रे**

स्वतः च्या मालकीच्या ५ गायी / म्हशी असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

**कार्यपध्दती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत गायी / म्हशीसाठी सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठयासाठी गेटवे खरेदी करुन वापर सुरु करावा.

२) लाभार्थ्याने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत गायी / म्हशीसाठी सेन्सर / स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठयासाठी गेटवे खरेदी करुन वापर सुरु न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) गायी / म्हशीसाठी सेन्सर/स्मार्ट कॉलर बेल्ट व गोठ्यासाठी गेटवेचा वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.


६) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

## वराह पालन गट वाटप योजना

| बाब | तपशील |
|---|---|
| लाभाचे स्वरुप | ५+१ वराह गट + विमा |
| लाभार्थी | सर्व प्रवर्गातील दारिद्रय रेषेखालील, भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, सुशिक्षीत बेरोजगार, महिला बचत गट **(लाभ सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के, अनुसूचित जाती जमाती- ७५ टक्के)** |
| लाभार्थी निकष | सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.<br>अ) भुमीहीन ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक) क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक) ड) वनहक्क धारक इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)<br>वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. |
| पात्रता | पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करतांना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) |
| गटाची किंमत | १. १) पशुधन खरेदी- १) प्रति मादी वराह- रु. २२,५००/-<br>२) नर वराह - रु. २५,०००/-<br>२) विमा - १२.७५ टक्के (३ वर्षासाठी) - रु. १७, ५३१/-<br>३) विक्री कर - १८ टक्के रु. ३१५६/-<br>एकूण - रु. १,५८,१८७/-<br>२. शेड, खाद्य, पाणी उपकरणे व साहित्य (शेड वॉशर / स्प्रे पंप) रु. ५०,०००/-<br>३. एकूण प्रकल्प किंमत रु. २,०८,१८७/- |

आवश्यक कागदपत्रे

१. पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र २. दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र, ३. शेडसाठी जागा उपलब्ध असल्याचे तसेच वराह मोकाट सोडले जाणार नाही याबाबतचे स्वयंघोषणा पत्र.




## अटी व शर्ती

१. या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाचे वराह हे सुधारित व विदेशी जाती (उदा. यॉर्कशायर/हॅम्पशायर /लॅंड्रेस इत्यादी तसेच स्थानिक हवामानाशी जुळवून घेणाऱ्या व उच्च उत्पादकता असलेल्या वय १ ते २ वर्ष वयोगटातील असावे.

२. वराह गटाची खरेदी ही खरेदी समितीच्या उपस्थितीत करण्यात यावी.

३. वराह गटाची खरेदी राष्ट्रीय पशुधन प्रक्षेत्रावर उत्पादित झालेल्या वराहातून प्राधान्याने करण्यात यावी.

४. सदर प्रक्षेत्रावर वराह उपलब्ध नसल्यास शासकीय फार्म / खाजगी ब्रिडींग फार्म्सवरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार वजनानुसार करण्यात यावी.

५. पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत गठीत समिती समवेत खरेदी करावी.

६. लाभार्थ्यांने विहीत केलेल्या कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतिक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

७. खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, पशुधनाच्या खरेदीनंतर जनावरे वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

८. वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्हयाचे जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

९. योजनेमध्ये वाटप केलेले पशुधन मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दूसरे पशुधन खरेदी करुन पूरविण्यात यावे.

१०. तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्याचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

११. योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैदयकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

१२. या संपुर्ण खरेदी प्रक्रियेचा समावेश लाभार्थ्याकडुन करुन घ्यावयाच्या बंधपत्रामध्ये करण्यात यावा.




**अंमलबजावणीची कार्यपध्दती (वैयक्तिक लाभाच्या योजना) :-**

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक व्हावे यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या अहवालात पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी अशी शिफारस केली आहे. ही बाब विचारात घेवून राज्यस्तरीय योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी लाभार्थी निवड एकाच प्रणालीव्दारे ऑनलाईन करण्यात येईल. योजना राबविण्यासाठी कार्यपध्दती:

**अ) लाभार्थी निकष:**

वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवडीसाठी योजनानिहाय निकष संबधित योजनेत दर्शविण्यात आले आहेत. ज्या योजनांचा लाभ भुमीहीन लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे, अशा योजनांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**ब) लाभार्थी निवड -**

१) योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस वेळापत्रकाची आखणी करुन विहीत कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवावेत.

२) प्राप्त अर्जाची छाननी ऑनलाईन पध्दतीने करुन निवड समितीमार्फत यादृच्छिक (Random) पध्दतीने जे लाभार्थी अटी व शर्तींची पुर्तता करतात, अशा लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

३) संबंधित भागाचा समुह स्वरुपात विकास होईल यादृष्टीने लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी, यासाठी आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्या-त्या भागातील भौगोलीक स्थिती, जिल्हा नियोजन आराखडा व स्थानिक व्यावसायिक पर्यावरण विचारात घेवून जिल्हानिहाय लक्ष्यांक निर्धारित करावे.

४) अनुदानाअभावी त्या-त्या आर्थिक वर्षात योजनेचा लाभ देणे शक्य होणार नाही, असे लाभार्थी प्रतीक्षाधीन ठेवण्यात येतील.

५) संबंधित योजनांसाठी लाभार्थी निवडीसाठी दरवर्षी अर्ज मागविण्यात येतील. मात्र, मागील आर्थिक वर्षात प्रतीक्षाधीन असलेल्या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल.

**क) निवड समिती:**

(i) वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद- | अध्यक्ष |
| २. जिल्हा समाज कल्याण अधिकारी- | सदस्य |
| ३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प- | सदस्य |
| ४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी (जिल्हा परिषद)- | सदस्य |
| ५. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | सदस्य सचिव |

(ii) मांसल कुक्कुट ३०००/५००० कुक्कुटपक्षी व अंडी देणाऱ्या ५००० कुक्कुटपक्ष्यांचे वाटप व मुरघास संयंत्र वाटप योजना या ३ योजनांसाठी प्राप्त अर्जाची तपासणी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **१) आयुक्त पशुसवंर्धन व दुग्धव्यवसाय** | **अध्यक्ष** |
| २) अतिरिक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय | सदस्य |
| ३) संबंधित विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहआयुक्त | सदस्य |
| **४) सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (पशुधन व नियोजन)** | **- सदस्य सचिव** |

समितीने तपासणीअंती शिफारस केलेल्या प्रस्तावांची अंतिम निवड खालील समितीमार्फत करण्यात येईल -

| | |
|---|---|
| **१) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय** | **अध्यक्ष** |
| २) आयुक्त पशुसवंर्धन व दुग्धव्यवसाय | सदस्य |
| ३) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, आदिवासी विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) अ.मु.स/प्र.सचिव / सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| **७) सह/उपसचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय** | **सदस्य सचिव** |

**ड) खरेदी समिती** दुधाळ पशुधन, बैल जोडी व शेळी मेंढी गट वाटप योजनांतर्गत पशु वाटपासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीद्वारे खरेदी करण्यात येईल.

| | |
|---|---|
| **१) संबंधित तालुक्याचे तालुका पशुसंवर्धन अधिकारी :-** | **अध्यक्ष** |
| २) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखान्याचे संस्थाप्रमुख - | सदस्य |
| ३) बँक बँक (कर्ज चर्चा) | सदस्य |
| ४) विमा कंपनीचा प्रतिनिधी | सदस्य |
| **५) लाभार्थी** | **सदस्य** |

**टिप -**

१) वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान हे त्यांच्या बँक खात्यात पशुधनाची खरेदी / प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर थेट जमा (DBT) करण्यात येईल.

२) व्याज सवलत योजनेंतर्गत देण्यात येणारी सवलत ही प्रकल्पधारकाने संबंधित बँकेकडून घेतलेल्या कर्जाची विहीत कालमर्यादेत परतफेड केल्यानंतर Back Ended Subsidy च्या स्वरुपात अदा केले जाईल.

**मूलभूत निर्देशक सुचना :**

१) एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ देण्यात येईल.

२) केंद्र शासनाच्या किंवा शासनाच्या इतर विभागाकडील समान योजनेचा लाभ घेतला असल्यास, सदर कुटुंबास या योजनेचा लाभ देय राहणार नाही. यासाठी केंद्र शासनाच्या किंवा शासनाच्या इतर विभागांकडील याच प्रकारच्या योजनेचा लाभ मागील ३ वर्षात इतर शासकीय संस्था / विकास मंडळाकडून घेतला नसलेबाबत अर्जदाराचे स्वयंघोषणापत्र घेण्यात येईल.

३) संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) हे या योजनांचे अमंलबजावणी अधिकारी असतील व ते या योजनांसाठी आहरण व संवितरण अधिकारी राहतील. विभागीय स्तरावर संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

४) योजना मुंबई व उपनगर वगळून इतर जिल्ह्यांसाठी लागू.

५) लाभार्थ्यांची योजनानिहाय निवड यादी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय, पुणे हे संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

६) संबंधित सहाय्यक आयुक्त (प.व दु.), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देतील.

७) लाभार्थ्यांची निवड झाल्याबाबत संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सर्व संबंधित लाभार्थ्यांस लेखी कळवतील.

८) योजनांतर्गत निवड झालेल्या संबंधित लाभार्थी यांचेकडून योजनेचे अंमलबजावणीसाठी विहीत प्रपत्रात बंधपत्रे / योजनानिहाय आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यात येईल. लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे सर्वसमावेशक प्रारुप आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करुन ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात येईल.

९) लाभार्थ्यांनी शासकीय अनुदानाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास लाभार्थ्यांकडून अनुदानाची रक्कम व्याजासह महसूली कार्यपध्दीने वसूल करण्यात येईल. असे लाभार्थी / कुटुंब शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत लाभ देण्यास पुढील पाच वर्षासाठी अपात्र राहील, यासाठी त्यांच्या स्वतंत्र नोंदी ठेवण्यात येतील व तसे संबंधित ग्रामपंचायत, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना कळविण्यात येईल.

१०) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत तसेच, आदिवासी क्षेत्र उपयोजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी अनुक्रमे केवळ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीच खर्ची करण्यात येईल.

११) योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या दुधाळ जनावरे, शेळी-मेंढी व कुक्कुट पक्षी गटांची तसेच प्रकल्पांची पडताळणी पुढील आर्थिक वर्षात नजीकच्या जिल्ह्यातील अधिकारी यांच्यामार्फत Cross verification करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे.

१२) संबंधित आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी २ टक्के निधी प्रशासकीय खर्चासाठी खर्च करण्यात यावा.

**मुल्यमापन** – योजनेचे दर ३ वर्षांनी बार्टी, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन केंद्र यासारख्या शासन मान्यताप्राप्त त्रयस्त संस्थामार्फत मूल्यमापन करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या निधीतून करण्यात येईल.






# जिल्हा वार्षिक योजना

सद्यस्थितीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागांतर्गत १४ जिल्हा वार्षिक योजना अंमलात आहेत. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक करण्यासाठी चालु असलेल्या योजनांचे पुनर्विलोकन करून पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची केलेली शिफारस विचारात घेवून चालु असलेल्या जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा घेण्यात आला आहे. सदर आढाव्याअंती अस्तित्वात असलेल्या १४ जिल्हा वार्षिक योजनांपैकी ६ जिल्हा वार्षिक योजना बंद करण्यास, ६ योजना सुधारित स्वरूपात व २ योजना कोणत्याही बदलाशिवाय पुढे चालू ठेवण्यास व ७ नवीन जिल्हा वार्षिक योजना सुरु करण्यास शासनाने दि. ०९ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.



**डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य
पुणे- ४११०६७

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमाद्वारे जनमाणसाचे जीवनमान उंचावणे, शाश्वत आर्थिक समृद्धी मिळवणे, पर्यावरणीय व्यवस्थापन स्थिर ठेवून राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्स करण्याचे राज्याचे ध्येय आहे. सन २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होत आहे. राज्यातील नागरिकाना जागतिक दर्जाचे शिक्षण, आरोग्यसेवा, सुरक्षा आणि न्याय व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत राज्यात १०० उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कृषी व संलग्न क्षेत्रातील ७ उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून, शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. या उपक्रमाव्दारे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि पशुपालन या शेतीपुरक जोडधंद्यांना उद्योजकतेचे स्वरुप देण्यासाठी सुयोग्य वातावरण उपलब्ध करुन देणे, हा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखड्यानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देणारे ८ घटक सुनिश्चित केले आहे. त्यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाशी संबंधित "दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायास चालना देणे" या उपक्रमाचा समावेश आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात भरीव सहभाग नोंदविण्यासाठी पशुजन्य उत्पन्नात वाढ करण्याच्या व्यापक भूमिकेतून पशुआरोग्याच्या सुविधेबरोबरच पशुपालन व्यवसायास पोषक वातावरण उपलब्ध करुन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे. यासाठी पशुसंवर्धन विभाग पशुपैदास सुधारणा, पशुधनाचे आरोग्य, वैरण विकास, पशुखाद्य व पशुधनाचे व्यवस्थापन या पंचसूत्रीनुसार काम करत आहे.

राज्यामध्ये केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची वंशावळ निर्माण करण्यासाठी कृत्रिम रेतन, लिंग विनिश्चित रेत मात्रांचा पुरवठा, भृण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व पशुपालकांना त्यांच्या दारात पशुआरोग्य सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने फिरते पशुचिकित्सा पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. याशिवाय उत्पादन वाढीसाठी वैरण विकास कार्यक्रमासही प्राधान्य देण्यात येत आहे. पशुजन्य उत्पादनास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने विभाग प्रयत्नरत आहे. जेणेकरुन, पशुपालकांच्या पर्यायाने राज्याच्या अर्थव्यवस्थेस बळकटीकरण प्राप्त होईल.

यासाठी राज्य सरकारने दि. ०९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागात पशुउद्योजक तयार होऊन ग्रामीण अर्थचक्र अधिक वेगवान करण्यासाठी "**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना**" **जिल्हा वार्षिक योजना** अंतर्गत सुधारीत व नवीन योजना राबविण्याचे निश्चित केले आहे. या योजनांविषयी...




### 1. दुभत्या जनावरांचे वाटप:

ग्रामीण भागातील पशुपालनाचा विकास आणि विशेषतः भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाने 'दुभत्या जनावरांचे गट वाटप' ही महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश दुग्धोत्पादनात वाढ करुन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

#### योजनेचे स्वरूप व लाभ:

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दुभत्या गायी किंवा म्हशींचे गट वाटप केले जातात. यामध्ये दोन पर्याय उपलब्ध आहेत:

- १ दुभती गाय / म्हैस व ३ वर्षांचा विमा.
- २ दुभत्या गायी / म्हशींचा गट व ३ वर्षांचा विमा.

### लाभार्थी व पात्रता निकष

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवड खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

- ❑ भुमीहिन (फक्त १ गाय / म्हैस गटासाठी).
- ❑ अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत)
- ❑ अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर).
- ❑ महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)
- ❖ विशेष आरक्षण: दिव्यांग व्यक्तींसाठी ५ टक्के, तसेच १ गाय / म्हैस गटासाठी महिलांना ५० टक्के आणि २ गाय / म्हैस गटासाठी ३० टक्के आरक्षण लागू राहिल.
- ❑ १ गाय / म्हैस यासाठी जमीनधारणेची आवश्यकता नाही.
- ❑ २ गायी / म्हैस गटासाठी किमान १ एकर जमीन आवश्यक. मात्र, वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

### प्रशिक्षणाची अट

२ गाई / म्हशींच्या गटासाठी लाभार्थ्याकडे पशुपालन व्यवसायाचे शासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. जर प्रमाणपत्र नसेल, तर अनुदान मिळण्यापूर्वी प्रशिक्षण घेणे किंवा २ वर्षांचा दुग्ध व्यवसायाचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

### गटाची किंमत:

१ जनावरासाठी अंदाजे १,१२,०३६ रुपये, तर २ जनावरांच्या गटासाठी २,२४,०७२ रुपये (विमा रक्कमेसह) खर्च अपेक्षित आहे.

### अनुदानाचे प्रमाण:

- ❑ सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी: **५० टक्के.**
- ❑ अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गासाठी: **७५ टक्के अनुदान.**

### आवश्यक कागदपत्रे

१. ७/१२ उतारा किंवा ८-अ उतारा (किंवा ५ वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा).

२. वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसूची "जे" प्रमाणपत्र

३. पशुपालन दुग्धव्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र)

**किंवा,** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षांचे अनुभव प्रमाणपत्र **किंवा** दूध संस्थेस किमान २ वर्ष दूध विक्री करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र

४. दिव्यांगासाठी UDID प्रमाणपत्र.

६. बचत गटासाठी सदस्यत्व प्रमाणपत्र.

### अटी व शर्ती:

१) या योजनेमध्ये प्रती दिन १० ते १२ लिटर दूध देणाऱ्या एचएफ, जर्सी या संकरित गाई, प्रती दिन ८ ते १० लिटर दूध देणाऱ्या गीर, साहीवाल, रेड सिंधी, राठी, थारपारकर, प्रती दिन ५ ते ७ लिटर दूध देणाऱ्या देवणी, लाल कंधारी, गवळाऊ व डांगी गाई तसेच, मुऱ्हा व जाफराबादी या सुधारित जातीच्या म्हशी वाटप करण्यात येतील. वाटप करावयाची दुधाळ जनावरे ही शक्यतो १-२ महिन्यांपूर्वी व्यायलेली दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील असावीत.

२) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने गठीत समिती समवेत दुधाळ गाय म्हैस गटाची राज्या बाहेरुन खरेदी करावी.

३) जर लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतूकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

५) वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

६) योजनेमध्ये वाटप केलेले जनावर मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थीस दुसरे दुधाळ जनावर खरेदी करुन पुरविण्यात यावे.

७) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

८) योजनेंतर्गत वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

ज्या शेतकऱ्यांकडे कमी जमीन आहे किंवा जे भूमिहीन आहेत, त्यांच्यासाठी ही योजना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून देणारी आहे. इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.




## 2) शेळी / मेंढी गट वाटप योजना :-

**लाभाचे स्वरुप:**

१) ५+१ शेळी / मेंढी गट + विमा किंवा

२) १०+१ शेळी / मेंढी गट + विमा

**लाभार्थी:**

सर्व प्रवर्गातील भुमीहीन, अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, महिला **बचत गट**

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन (फक्त ५+१ शेळी/मेंढी गटासाठी)

ब) अत्यल्प भूधारक (१ हेक्टरपर्यंत भूधारक)

क) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टरपर्यंत भूधारक)

ड) वनहक्क धारक

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच ५+१ शेळी / मेंढी गटासाठी महिलांना ५० टक्के आणि १०+१ शेळी मेंढी गटासाठी ३० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

१) फक्त ५+१ शेळी / मेंढी गटासाठी जमीनीची अट लागू नाही.

२) किमान १ एकर स्वतःची किंवा किमान ५ वर्ष नोंदणीकृत भाडेपट्टा असलेली जमीन, मात्र वनहक्क धारकांना ही अट लागू राहणार नाही.

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा, २ वर्षाचा शेळी / मेंढीपालन व्यवसायाचा अनुभव.

**गटाची किंमत**

१) ५+१ शेळी/मेंढी

अ) पशुधन खरेदी

१) प्रती शेळी / मेंढी - रु. १२,०००/-

२) बोकड / मेंढा - रु. १५,०००/-

ब) विमा: १२.७५%

क) विक्री कर: १८%

ड) ५+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. ८६,२८४/-

२) १०+१ शेळी / मेंढी गटाची एकूण किंमत: रु. १,५५,३११/-

**अनुदानाचे स्वरुप**

१) सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के

२) अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा किंवा किमान ५ वर्षाचा भाडेपट्टा नोंदणीकृत करारनामा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र.

३) पशुपालन व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र.) **किंवा** स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

४) दिव्यांगांसाठी UDID **प्रमाणपत्र**

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

### अटी व शर्ती

१) खरेदी समितीच्या उपस्थितीत गटाची खरेदी करण्यात यावी.

२) खरेदी प्राथम्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ प्रक्षेत्रावर उत्पादित शेळ्या-मेंढ्यातून करण्यात यावी.

३) महामंडळाच्या प्रक्षेत्रावर शेळ्या-मेंढ्या उपलब्ध नसल्यास महामंडळाकडून ना-उपलब्धता प्रमाणपत्र घेवून शेळी-मेंढी गटाची खरेदी खाजगी / राष्ट्रीय पशुधन अभियान / स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेळ्या-मेंढ्यांच्या ब्रिडींग फार्म्सवरुन किंवा खुल्या बाजारातून लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार वजनानुसार करण्यात यावी.

४) सदरच्या शेळ्या, मेंढया, बोकड व मेंढे स्थानिक वातावरणात तग धरतील याची दक्षता घेण्यात यावी.

५) या प्रकल्पांतर्गत खरेदी करावयाच्या शेळ्या / मेंढ्या तसेच, बोकड / मेंढे यांचे वय १ ते ३ वर्ष वयोगटातील असाव्यात.

६) निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत / १ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने गठीत समिती समवेत खरेदी करावी.

७) लाभार्थ्यांने कालमर्यादेत जनावरांची खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

८) खरेदी केलेल्या पशुधनाची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

९) वाटप करण्यात येणाऱ्या पशुधनाचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

१०) योजनेतील पशुधन मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विमा रकमेतून दूसरे पशुधन खरेदी करावे.

११) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (प. व दु.) यांना सादर करावा.

१२) योजनेंतर्गत वाटप केलेल्या पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

१३) या संपुर्ण खरेदी प्रक्रियेचा समावेश लाभार्थ्याकडून करुन घ्यावयाच्या बंधपत्रामध्ये करण्यात यावा.






### 3) अंडी देणाऱ्या सुधारित कुक्कुट / देशी पक्षांचे वाटप :-

**लाभाचे स्वरुप:**

अंडी देणाऱ्या १६-१८आठवडे वयाच्या ५०० सुधारित / देशी कुक्कुट पक्षी, अर्धबंदिस्त / पिंजरा गादी पध्दतीचे शेड, खाद्य, पाणी भांडी, एग्ज ट्रे, एग नेस्ट इ. आवश्यक साहित्य.

**लाभार्थी प्रवर्ग:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांग बांधवांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता:**

कुक्कुट व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील) किंवा २ वर्षाचा कुक्कुट व्यवसायाचा अनुभव असणे आवश्यक.

**गटाची किंमत:**

१) पक्षी किंमत - किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे ५०० पक्षी रु. ३५०/- प्रती पक्षी प्रमाणे

२) २ महिन्याच्या खाद्यावरील खर्च (७.२ कि.ग्रॅ. प्रती पक्षी x रु. २७/- प्रती कि.ग्रॅ. प्रमाणे)

३) अर्धबंदिस्त / पिंजरा / गादी पध्दतीने संगोपन (प्रती पक्षी रु. १००)

४) खाद्य, पाणी भांडी, अंडी ठेवण्याकरीता ट्रे, एग नेस्ट इत्यादी आवश्यक साहित्य (प्रती पक्षी रु. २०/-)

एकूण किंमत रु. ३,३२,२००/-

**अनुदानाचे स्वरुप**

१. सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के

२. २. अनुसुचित जाती जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के

**आवश्यक कागदपत्रे**

१) पशुपालन कुक्कुट व्यवसायाचे शासकीय / निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र (अर्ज करताना प्रशिक्षण प्रमाणपत्र नसल्यास अनुदानाचा लाभ घेण्यापुर्वी प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमी पत्र) किंवा स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.

२) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे व १६ ते १८ आठवडे वयोगटातील असावेत.

### अटी व शर्ती

१) या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारे कुक्कुटपक्षी हे वार्षिक किमान १८० ते २०० अंडी उत्पादन देणारे व १६ ते १८ आठवडे वयोगटातील असावेत.

२) देशी पक्षी खरेदी करताना प्राथम्याने शासकीय मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र / सघन कुक्कुट गट/ सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्वावरील प्रक्षेत्र / राष्ट्रीय पशुधन अभियान / स्मार्ट प्रकल्पांतर्गत स्थापित कुक्कुट प्रकल्प यांच्याकडून घेण्यात यावेत.

३) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने कुक्कुट पालनासाठी शेडची उभारणी करावी.

४) तद्नंतरच्या एक महिन्याच्या कालावधीत पक्षी, खाद्य / पाण्याचे भांडे तसेच इतर मूलभूत सुविधा पुर्ण करुन प्रत्यक्ष कुक्कुटपालन सुरु करावे.

५) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कुक्कुटपक्षी खरेदी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

६) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

८) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## 4) वैरण विकास योजना -

### अ) चारा उत्पादन कार्यक्रम :-

**लाभाचे स्वरुप:** चारा बियाण्यांचा / ठोंबाचा पुरवठा

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील शेतकरी, शेतकरी समुह गट

**लाभार्थी निकष:**

१) वैयक्तिक शेतकऱ्यासाठी १ हे. वैरण उत्पादन घेण्यासाठी

२) वनहक्क धारक

३) नोंदणीकृत शेतकरी समुह गट

**पात्रता**

अ) वैयक्तिक शेतकरी -

१) स्वतःची जमीन व सिंचन सुविधा

२) स्वतःचे किमान ३ ते ४ पशुधन

आ) शेतकरी समुह गट

**अनुदानाचे स्वरुप**

१) वैयक्तिक लाभार्थी १०० टक्के अनुदान १ हेक्टरसाठी रु. ४०००/-

२) शेतकरी समुह गट ५ हेक्टर व रु. २००००/- च्या मर्यादेत

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या नावे ७/१२ उतारा

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) किमान ३ ते ४ पशुधन

४) नोंदणीकृत प्रमाणपत्र (शेतकरी समुह गट)

### अटी व शर्ती

१) सदर योजनेंतर्गत पुरविण्यात येणारे बियाणे / ठोंबांची खरेदी राष्ट्रीय बियाणे महामंडळ / राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी मेंढी विकास मंडळ यांच्याकडून करण्यात येईल.

२) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने पात्रतेसाठी विहीत केलेली आवश्यक ती कागदपत्रे तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांच्याकडे सादर करावीत.

३) लाभार्थ्यांने उपरोक्त प्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कागदपत्रांची पुर्तता न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधिन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) पात्र लाभार्थी संख्या विचारात घेवून जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन हे वैरण बियाणेंसाठी राष्ट्रीय बियाणे महामंडळ / राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे यांच्याकडे व ठोंब्यांसाठी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास मंडळ यांच्याकडे मागणी नोंदवतील.

५) या योजनेत बियाणे / ठोंबे खरेदीची पूर्ण रक्कम जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन हे परस्पर पुरवठादार संस्थेस अदा करतील.

## ब) हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा उत्पादन योजना :-

**लाभार्थी:** अत्यल्प भुधारक, अल्प भुधारक, वनहक्क धारक, महिला बचत गट

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) अत्यल्प भूधारक

ब) अल्प भूधारक

क) वनहक्क धारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ३० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान ५ मोठे पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असाव्यात.

**अनुदानाचे स्वरुप:**

प्रकल्प चालु झाल्यानंतर

१) सर्वसाधारण प्रवर्ग - ५०% अनुदान

२) अनुसूचित जाती/जमाती-७५ % अनुदान




**अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधा.**

**लाभाचे स्वरुप:** हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा उत्पादनासाठी आवश्यक असणारी खालील साधन सामुग्री अनुदान तत्वावर देणे

| अ.क्र. | तपशील | संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | रॅकफ्रेम | ५ | १००००/- |
| २ | प्लास्टिक ट्रे (२५) | २५ | ४५००/- |
| ३ | पाणी टँक + पाइपिंग | १ | ५०००/- |
| ४ | पंप व मिस्टिंग/सिंचन यंत्रणा | १ | ५५००/- |
| ५ | ग्रीनहाऊस / शेड नेट | १ | १००००/- |
| ६ | इतर (उपकरणे, साधने, स्टोरेज) | -- | ५०००/- |
| | | एकूण | ४००००/- |

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान ५ मोठे पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) निवड झाल्यास आवश्यक ते प्रशिक्षण घेण्याबाबतचे हमीपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्यात हायड्रोफोनिक तंत्राव्दारे चारा युनिटची उभारणी करावी.

२) कालमर्यादेत उभारणी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य




## क) मिनी टीएमआर (Total Mixed Ration) उपकरण खरेदीसाठी अनुदान :-

**लाभाचे स्वरुप:**

पशुपालकांना ३०० किलो प्रती बॅच क्षमता असलेल्या मिनी टीएमआर उपकरण खरेदीसाठी अनुदान

**लाभार्थी:**

सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. महिला लाभार्थी उपलब्ध न झाल्यास पुरुष प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान १० मोठे पशुधन / ५० शेळ्या किंवा मेंढ्या असाव्यात.

**उपकरणाची किंमत:** रु. ४,४०,०००/- प्रती मशीन

**अनुदानाचे स्वरुप:**

- सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के
- अनुसुचित जाती / जमाती प्रवर्गातील लाभार्थी: ७५%

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान १० मोठे पशुधन / ५० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र

२) दिव्यांगांसाठी UDID **प्रमाणपत्र**

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र



संकल्पित चित्र: केवळ उदाहरणास्तव

**अटी व शर्ती**

१) लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच १ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने ३०० किलो प्रति बॅच क्षमता असलेल्या मिनी टीएमआर (Total Mixed Ration) उपकरण खरेदी करुन खाद्य उत्पादन युनिटची उभारणी करावी.

२) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत खाद्य उत्पादन युनिटची उभारणी न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभदेण्यात येईल.

३) प्रकल्प सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडुन घेण्यात यावे.

# ड) पशुपालकांना कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान :-

**लाभाचे स्वरुप:** पशुपालकांना कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील लाभार्थी

**लाभार्थी निकष:**

सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील. महिला लाभार्थी उपलब्ध न झाल्यास पुरुष प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.




**पात्रता**

स्वतःचे मालकीची किमान २ दुधाळ जनावरे/१० शेळ्या/मेंढ्या

**उपकरणाची किंमत**

**रु. ३०,०००/- प्रती कडबा कुट्टी यंत्र खरेदीच्या मर्यादेत**

**अनुदानाचे स्वरुप**

**१) सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के**

**२) अनुसुचित जाती/जमाती प्रवर्गातील लाभार्थी ७५ टक्के**

**आवश्यक कागदपत्रे**

१) किमान २ दुधाळ पशुधन / १० शेळ्या किंवा मेंढ्या असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

३) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने कडबाकुट्टी यंत्र खरेदी करुन वापर सुरु करावा.

२) लाभार्थ्याने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत कडबाकुट्टी यंत्र खरेदी करुन वापर सुरु न केल्यास अशा लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) कडबाकुट्टी यंत्रांचा वापर सुरु झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

४) योजनेमध्ये निर्धारित केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी अदा करावयाची आहे.

५) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्याकडून घेण्यात यावे.

❖ सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी / पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती / जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

## 5) पशुप्रजनन :-

### अ) गायी / म्हशी मध्ये भ्रूण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे :-

**लाभाचे स्वरुप:**

शेतकऱ्यांना त्यांच्या गायी म्हशी / मध्ये भृण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**लाभार्थी निकष:**

सर्व प्रवर्गातील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भूमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते क मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

स्वतःची भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेली गाय / म्हैस असलेले पशुपालक, गोशाळा.

**एका भृण प्रत्यारोपणाची किंमत:**

रु. २४,०००/- (उच्च अनुवंशीक वंशावळीचे यशस्वी भृण प्रत्यारोपणद्वारे निश्चित गर्भधारणा करणेसाठी येणारा खर्च रु.८०००/- याप्रमाणे ३ प्रयत्नात यशस्विता गृहीत धरण्यात आली आहे)

**अनुदानाचे स्वरुप**

सर्व प्रवर्गासाठी १०० टक्के

(मात्र भृण प्रत्यारोपण करण्यासाठीचे विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक)

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतःच्या मालकीची गाय म्हैस / असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२) गोसेवा आयोगाकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र (गोशाळेसाठी)

३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) उच्च अनुवंशिक वंशावळीचे भृण प्रत्यारोपण करण्यास इच्छुक असल्याबाबतचे व त्याबाबतच्या सर्व अटी शर्तीचे पालन करण्यास तयार असल्याबाबतचे बंधपत्र.






प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**गायी / म्हशी मध्ये भ्रूण प्रत्यारोपण करणेसाठी अनुदान देणे :-**

**कार्यपध्दती**

१) सदर योजनेचे अंमलबजावणी यंत्रणा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर राहील.

२) पशुपालकाने नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेमध्ये सदर सेवेबाबतची मागणी नोंदवावी.

३) भ्रूण प्रत्यारोपणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तपासण्या संबंधित स्थानिक शासकीय पशुवैद्यकीय संस्थामध्ये करण्यात याव्यात. यासाठी विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक राहील.

४) संबंधित स्थानिक शासकीय पशुवैद्यकीय संस्थाप्रमुख वरील तपासणी अहवालानुसार भ्रूण प्रत्यारोपणासाठी पात्र असणाऱ्या गायी / म्हशीची माहिती संबधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांना कळवेल.

५) संबधित जिल्हा उपायुक्त (प. दु.) यांनी १०० % अनुदान हिस्सा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांचेकडे जमा करावा.

६) तद्नंतर संबंधित कार्यक्षेत्रातील भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा यांनी संबंधित शेतकऱ्याच्या गाय / म्हशीस उच्च अनुवंशिक वंशावळीचे यशस्वी भ्रूण प्रत्यारोपणद्वारे निश्चित गर्भधारणा करण्यात येईल.

७) सदर योजनेंतर्गत एका पशुपालकास / गोशाळेस एका वर्षात कमाल ५ गाय / म्हशींच्या मर्यादेत योजनेचा लाभ घेता येईल.

## ब) 100% अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा (Sex Sorted Semen) पुरवठा



## ब) 100% अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा (Sex Sorted Semen) पुरवठा करणे :-

**पात्रता:** स्वतःची भारत पशुधन पोर्टलवर नोंद असलेली गाय/म्हैस असलेले पशुपालक, गोशाळा.

**एका रेतमात्रेची किंमत:** प्रती रेतमात्रा किंमत रु. ५७५/- किंवा वेळोवेळी निर्धारित करण्यात येणारी किंमत

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी १०० टक्के (मात्र कृत्रिम रेतन करण्यासाठीचे विहीत करण्यात आलेले सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक)

**आवश्यक कागदपत्रे:**

१) स्वतःच्या मालकीची गाय म्हैस / असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारीचे प्रमाणपत्र

२)गोसेवा आयोगाकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र (गोशाळेसाठी)


३) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

४) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

५) उच्च अनुवंशिक वंशावळीचे भृण प्रत्यारोपण करण्यास इच्छुक असल्याबाबतचे व त्याबाबतच्या सर्व अटी शर्तीचे पालन करण्यास तयार असल्याबाबतचे बंधपत्र.

**लाभाचे स्वरुप:** १०० % अनुदानावर लिंग विनिश्चित रेतमात्रा पुरवठा करणे

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक



### कार्यपध्दती

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर हे सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

२) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र या कार्यालयाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व पशुवैद्यकीय संस्था यांच्याकडून गावनिहाय पैदासक्षम गायी-म्हशींची संख्या, जातनिहाय व महिनावार लिंग वर्गीकृत केलेल्या वीर्यमात्रांची (रेतमात्रांची) मागणी संकलित करावी व जिल्ह्याची एकूण मागणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे नोंदवावी.

३) संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी जिल्ह्यातील प्रजननक्षम गायी-म्हशींची संख्या तसेच, प्रतीवर्ष होणारी गायी-म्हशींमधील कृत्रिम रेतने याचा विचार करून रेतमात्रांच्या खरेदीसाठी आवश्यक निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

४) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी पुढील आर्थिक वर्षाकरीता जिल्ह्याची लिंग वर्गीकृत केलेल्या गोठित रेतमात्रांची मागणी संबंधीत विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांचेमार्फत सीईओ, एमएलडीबी यांच्याकडे दरवर्षी माहे फेब्रुवारीपर्यंत नोंदवावी.

५) संबंधित विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांनी सदरची मागणी तपासून ती योग्य असल्याची खातरजमा करावी.

६) सीईओ, एमएलडीबी, नागपूर हे विहीत कार्यपध्दती पार पाडून लिंग वर्गीकृत रेतमात्रा उपलब्ध करुन देतील.

७) पशुवैद्यकिय चिकित्सालये दरमहा संबंधित विभागीय व्यवस्थापक, शासकीय गोठित रेतमात्रा निर्मिती केंद्र यांच्यामार्फत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्राकडून आवश्यक लिंग वर्गीकृत गोठित रेतमात्रांचा पुरवठा नियमितपणे करण्यात यावा.

८) पशुपालकाने नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेमध्ये सदर सेवेबाबतची मागणी नोंदवावी.

९) पशुधन विकास अधिकारी यांनी गाय / म्हशीची जननेंद्रियांची तपासणी करुन गर्भधारणेस सक्षम गाय / म्हशींची निवड करावी.

१०) गर्भधारणा क्षमता तपासणी तसेच कृत्रिम रेतन सेवाशुल्क पशुपालकाने अदा करणे आवश्यक राहील.

११) या योजनेंतर्गत गायी-म्हशींमध्ये केलेल्या सर्व कृत्रिम रेतनाची नोंद राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM) भारत पशुधन या संगणकीय प्रणालीवर घ्यावयाची असून कृत्रिम रेतनानंतर २१ दिवसांनी गर्भधारणा तपासणी व कालवड / पारडी जन्माच्या नोंदी देखील या प्रणालीवर अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

१२) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी भारत पशुधन किंवा वेळोवेळी प्रचलित असलेल्या संगणकीय प्रणालीवर कृत्रिम रेतन व अनुषंगिक नोंदी घेतल्याची खातरजमा करुनच संबंधित संस्थेस पुढील रेतमात्रांचा पुरवठा करण्याबाबत दक्षता घ्यावी.

## 6) इतर योजना :-

### अ) सुधारित / देशी पारड्याची जोपासना अंतर्गत कालवडी / पारड्यांना पशु खाद्य पुरवठा (50% अनुदान) योजना :-

**लाभाचे स्वरुप:**

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील भुमीहिन, अल्प भुधारक व अत्यल्प भुधारक पशुपालक

**पात्रता:**

१) कालवडी / पारडीच्या NDLM नोंदणी आवश्यक

२) ३ वर्षासाठी विमा उतरवणे आवश्यक

३) एका कुटुंबातील एक कालवड / पारडू

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी - ५०% अनुदान




| अ.क्र. | महिना | दैनिक खाद्य गरज | मासिक खाद्य पुरवठा |
|---|---|---|---|
| १ | ४ था महिना | १ कि.ग्रॅ. | ३० किग्रॅ. |
| २ | ५ वा महिना | १.५ कि. ग्रॅ. | ४५ किग्रॅ. |
| ३ | ६ वा महिना | १.७५ कि.ग्रॅ. | ५२.५ किग्रॅ. |
| ४ | ७ ते १८ महिने | २ कि.ग्रॅ. | ७२० किग्रॅ. |
| ५ | १९ ते ३२ महिने (कालवड) | २.५ कि.ग्रॅ | १०५० कि.ग्रॅ. |
| ६ | १९ ते ४० महिने (पारडी) | २.५ कि.ग्रॅ | १६५० कि.ग्रॅ. |

**कार्यपध्दती:**

१) लाभार्थ्याने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

२) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था प्रमुखाने लाभार्थ्याकडील कालवड / पारडीस एनडीएलएम प्रणालीवरील नोंदीनुसार वयाची खातरजमा करुन योजनेचा लाभ देण्यात यावा.

३) एका कुटुंबातील एक कालवड / पारडी पात्र असेल.

४) जिल्हा निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

५) निवड झालेल्या पशुपालकाने भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणकानुसार खाद्यामध्ये मॉइश्चरचे प्रमाण १० टक्के, क्रुड प्रोटीनचे प्रमाण २० टक्के, कुड फायबरचे प्रमाण १३ टक्के, कुड फॅटचे प्रमाण २.५ टक्के, ॲसिड इन्सोल्यूबल ॲश ४ टक्के, सॉल्टचे प्रमाण २ टक्के, कॅल्शियमचे प्रमाण ०.५ टक्के व फॉस्फरसचे प्रमाण ०.५ टक्के प्रमाण असलेले पशुखाद्य खरेदी करणे आवश्यक राहील.

६) योजनेत सहभागी असलेल्या कालवड / पारडी यांची कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी अनुदान वितरणापुर्वी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

७) लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या पशुखाद्याचे ३ महिन्याचे देयक जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना सादर केल्यानंतर विहीत केलेले ५० टक्के अनुदान विचारात घेवून देय अनुदानाची अदायगी डिबीटीव्दारे लाभार्थ्याच्या बँक खात्यात करण्यात येईल.

८) कालवड / पारडीची योजना कालावधीत विक्री केल्यास सदर पशुपालकास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, याची नोंद लाभार्थ्याने घ्यावयाची आहे.

## आ) नर पारडू (रेडकू) संगोपन व संवर्धन प्रोत्साहन योजना

**लाभाचे स्वरुप:** एका नर पारडू / रेडक्याच्या संगोपनासाठी रु. ६,०००/- चे अर्थसहाय्य (खाद्य, औषधे व देखभालीसाठी).

**लाभार्थी:** सर्व प्रवर्गातील पशुपालक

**पात्रता:** ज्या पशुपालकाकडे NDLM वर स्वतःच्या नावावर नोंद असलेले पारडू / रेडकू असे शेतकरी (एका पशुपालकास कमाल १० पारडू / रेडकूच्या मर्यादेत)

**अनुदानाचे स्वरुप:** सर्व प्रवर्गासाठी एका नर पारडू / रेडक्याच्या संगोपनासाठी प्रती पशु रु.६,०००/- चे अर्थसहाय्य अनुदान २ टप्प्यात विभागून दिले जाईल.

**१ ला हप्ता ५०%:** पारडू/रेडक्याचे वय ६ महिने पूर्ण झाल्यावर

**२ रा हप्ता (५०%):** पारडू / रेडक्याचे वय १ वर्ष पूर्ण झाल्यावर

**आवश्यक कागदपत्रे**

१) स्वतः च्या मालकीचे पारडू / रेडकू असल्याबाबतचे स्थानिक पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र

२) पारडू / रेडकू किमान एक वर्षापर्यंत सांभाळण्याबाबत पशुपालकाचे बंधपत्र.

**कार्यपध्दती**

१) पात्र लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी.

२) योजनेत सहभागी असलेल्या पारडू / रेडकू यांचा तपशील कार्यक्षेत्रातील पशुवैद्यक अधिकाऱ्याने स्वतंत्रपणे ठेवावा.

३) लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत लाभार्थ्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यास अशा लाभार्थ्याचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवण्यात येवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

४) योजनेत सहभागी असलेल्या पारडू / रेडकू यांची कार्यक्षेत्रातील तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांनी अनुदान वितरणापुर्वी कार्यक्षेत्रातील संस्था प्रमुखासह संयुक्तपणे तपासणी करुन तपासणी अहवाल जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना १५ दिवसात सादर करावा.

५) पारडू / रेडकू किमान एक वर्षापर्यंत सांभाळण्याबाबत पशुपालकाचे बंधपत्र घेण्यात यावे.

नर रेडकांचे योग्य आहार व आरोग्य व्यवस्थापन केल्यास, ते केवळ 'भार' न ठरता ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे एक 'नफाक्षम जोडधंदा' म्हणून समोर येतील.




**नर रेडके संगोपन व्यवसाय नाही छोटा**
**मिळता अर्थसहाय्य नफा होईल मोठा!**



## इ) पशुपालक/शेतकऱ्यांना देशी बैल जोडी खरेदी करिता अनुदान वाटप:

**लाभाचे स्वरुप:** बैल जोडी खरेदी नंतर

सर्वसाधारण प्रवर्ग - ५०% अनुदान (रु. ८४,०२७/-)

अनुसूचित जाती / जमाती-७५ % अनुदान (रु. १,२६,०४०/-)

**लाभार्थी:**

**सर्वसाधारण प्रवर्ग:** ५०% अनुदान (रु. ८४,०२७/-)

**अनुसूचित जाती / जमाती:** ७५ % अनुदान (रु. १,२६,०४०/-)

सर्व प्रवर्गातील अल्प / अत्यल्प भुधारक शेतकरी, वनहक्क धारक, नोंदणीकृत उसतोड कामगार

**लाभार्थी निकष:** सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती मधील लाभार्थी खालील घटकांमधून उतरत्या प्राधान्य क्रमाने करण्यात येईल.

अ) भुमीहीन

ब) अत्यल्प भूधारक

क) अल्प भूधारक

ड) वनहक्क धारक

इ) महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र. अ ते ड मधील)

वरील घटकांमध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के तसेच महिलांना ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**पात्रता**

१) स्वतःच्या नावावर ७/१२ उतारा अल्प / अत्यल्प भुधारक शेतकरी असल्याचा, मात्र वनहक्क धारकाना ही अट लागू राहणार नाही.

२) भुमीहीन असल्यास उसतोड महामंडळाकडे नोंदणी असलेला कामगार (वनहक्क धारक वगळून)

**देशी बैल जोडीची किंमत**

पशुपालक / शेतकऱ्यांना देशी बैल जोडी खरेदी करिता अनुदान

१) पशुधन खरेदी- रु. १,५०,०००-/

२) विमा १०.२०% (अधिक १८% GST)- रु. १८,०५६ -/ एकूण-रु. १,६८,०५६/-

**अनुदानाचे स्वरुप:**

१. सर्वसाधारण लाभार्थी - ५० टक्के

२. अनुसुचित जाती/जमाती प्रवर्ग लाभार्थी -७५ टक्के अनुदान देय असेल.




**आवश्यक कागदपत्रे:**

१) स्वत:च्या नावावर ७/१२ उतारा असलेला अल्प/अत्यल्प भुधारक शेतकरी

२) वनहक्क जमीन धारकांसाठी ७/१२ उताऱ्यावर "इतर अधिकार" मध्ये नोंद किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले अनुसुची "जे" प्रमाणपत्र,

३) उसतोड महामंडळाकडे नोंदणी असलेला उसतोड कामगार (फक्त भुमीहिन लाभार्थ्यांसाठी)

४) दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र

५) बचत गटाचे सदस्यत्व प्रमाणपत्र

**अटी व शर्ती:**

१) लाभार्थ्याने त्याची निवड झाल्यानंतर जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी कळविलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच एक महिन्यात गठीत समिती समवेत देशी बैल जोडीची खरेदी करावी.

२) एक महिन्याच्या कालावधीत संबंधित लाभार्थ्याने त्याच्या पसंतीनुसार बाजारातून (कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत) देशी बैल जोडीची खरेदी करणे बंधनकारक राहील. जर लाभार्थ्यांने उपरोक्तप्रमाणे विहीत केलेल्या कालमर्यादेत देशी बैल जोडीची खरेदी न केल्यास अशा ...

(पुढील पृष्ठावर...)

लाभार्थ्यांचे नाव मूळ प्रतीक्षा यादीतील शेवटच्या क्रमांकावर ठेवून, पुढील प्रतीक्षाधीन लाभार्थ्यास लाभ देण्यात येईल.

३) खरेदी केलेल्या देशी बैल जोडीची किंमत योजनेमध्ये निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्यास फरकाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांने अदा करावयाची आहे. तसेच, खरेदीनंतर वाहतुकीचा संपूर्ण खर्च संबंधित लाभार्थ्याने करावयाचा आहे.

४) वाटप करण्यात येणाऱ्या देशी बैल जोडीचा लाभार्थी व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या संयुक्त नावाने ३ वर्षांसाठी विमा उतरविण्यात यावा.

५) योजनेमध्ये वाटप केलेला बैल मृत पावल्यास अंमलबजावणी अधिकारी यांच्या संमतीने विम्याच्या रकमेतून लाभार्थ्यास दुसरा बैल खरेदी करुन पुरविण्यात यावा.

६) तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी यांनी लाभार्थ्यांचा खरेदी अहवाल (खरेदी पावती, छायाचित्र, लाभार्थ्यांचे बँकचे तपशील, विमा) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांना सादर करावा.

७) सदर अहवालानुसार जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी DBT व्दारे अनुदान हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावा.

८) योजनेंतर्गत वाटप केलेल्या देशी बैलांची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आहे त्या संस्थेच्या संस्थाप्रमुखानी करणे बंधनकारक राहील.

९) योजनेच्या अटी शर्तीची पुर्तता करुन अंमलबजावणी करण्याबाबतचे बंधपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात यावे.



**७) प्रचार -प्रसिध्दी :-**

ग्रामीण भागातील शेतकरी/पशुपालकांना पशुसंवर्धनविषयी सर्वांगीण माहिती तसेच पशुसंवर्धनातून ग्रामीण उद्योजकता निर्माण करणे व उत्पन्नाचे शाश्वत साधन निर्माण करण्यासाठी व शास्त्रोक्त व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. सदर योजनेंतर्गत खालील बाबींचा समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे :

१) तालुका / जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन व पुरस्कार

२) दूध स्पर्धा

३) मेळावे / कार्यशाळा / परिसंवाद

४) वंध्यत्व निवारण शिबिरे

५) पशुपालकांना प्रोत्साहीत करण्यासाठी यशस्वी पशुपालकांच्या प्रक्षेत्रांना / नामांकित संस्थांना भेटी / सहलीचे आयोजन

६) दृकश्राव्य माध्यमांव्दारे पशुसंवर्धन विषयक प्रसिध्दी व प्रचार

७) देशी गोवंशाचे जतन व संवर्धन करण्याकरीता ब्रीडर असोशिएशनसाठी कार्यशाळा

**अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**

जिल्हा नियोजन समितीचे कामकाज परिणामकारक व्हावे, यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या अहवालात पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय योजनांकरीता एकाच Flagship Scheme किंवा Umbrella Scheme खाली आणण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस केली आहे. सदर बाब विचारात घेवून पशुसंवर्धन व्यवसायाच्या संदर्भात प्रस्तावित असलेल्या जिल्हा वार्षिक योजना व राज्यस्तरीय योजनांची अंमलबजावणीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी योजनांच्या लाभार्थ्यांची निवड ऑनलाईन पध्दतीने एकाच प्रणालीव्दारे करण्यात येईल. प्रस्तावित योजना राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येणार आहे.

**अ) लाभार्थी निकष** - वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमधील लाभार्थी निवडीसाठी योजनानिहाय निकष संबधित योजनेत दर्शविण्यात आले आहेत. ज्या योजनांचा लाभ भुमीहीन लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे, अशा योजनांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण लागू राहील.

**(ब) लाभार्थी निवड -**

१) सदर योजनांसाठी लाभार्थी निवडताना जिल्हानिहाय सर्वसाधारण / अनुसचित जाती / जमाती प्रवर्गाची लोकसंख्या विचारात घेवून लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

२) योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस वेळापत्रकाची आखणी करुन विहीत कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवावेत.

३) प्राप्त सर्व झालेल्या सर्व अर्जाची छाननी ऑनलाईन पध्दतीने करुन लाभार्थी निवड समितीमार्फत यादृच्छिक (Random) पध्दतीने पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

४) अनुदानाअभावी पात्र लाभार्थ्यांना त्या-त्या वर्षात योजनेचा लाभ देणे शक्य झाले नाही, असे लाभार्थी प्रतीक्षाधीन ठेवण्यात येतील.

५) संबंधित योजनांसाठी लाभार्थी निवडीसाठी दरवर्षी अर्ज मागविण्यात येतील. मात्र, मागील आर्थिक वर्षात प्रतीक्षाधीन असलेल्या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल.

६) संबंधित भागाचा समुह स्वरुपात (Cluster) विकास होईल यादृष्टीने लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्या-त्या भागातील भौगोलीक स्थिती, जिल्हा नियोजन आराखडा व स्थानिक व्यावसायिक पर्यावरण विचारात घेवून लक्ष्यांक निर्धारित करावे.

**(क) निवड समिती**

वैयक्तिक लाभांच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ३. प्रकल्प अधिकारी, ए. आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी (जि.प.) | सदस्य |
| ५. जिल्हा उपायुक्त प. व दु. | सदस्य सचिव |

**(ड) खरेदी समिती**

दुधाळ पशुधन, बैल जोडी व शेळी / मेंढी गट वाटप योजनांतर्गत पशुवाटपासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीद्वारे खरेदी करण्यात येईल.

| | |
|---|---|
| १) संबंधित तालुक्याचे तालुका पशुसंवर्धन अधिकारी :- | अध्यक्ष |
| २) कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखान्याचे संस्थाप्रमुख | -सदस्य |
| ३) बँक प्रतिनिधी (कर्जप्रकरणी) | सदस्य |
| ४) विमा कंपनीचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५) लाभार्थी | सदस्य |

**सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना :-**

१) एका कुटूंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ दिला जाईल.

२) शासनाच्या इतर विभागाकडील समान योजनेचा लाभ घेतला असल्यास, सदर कुटुंबास या योजनेचा लाभ देय राहणार नाही. यासाठी इतर विभागांकडील याच प्रकारच्या योजनेचा लाभ मागील ३ वर्षात इतर शासकीय संस्था / विकास मंडळाकडून घेतला नसलेबाबत स्वयंघोषणापत्र अर्जदाराला सादर करावे लागेल.

३) योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान हे त्यांच्या बँक खात्यात पशुधनाची खरेदी / प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर थेट जमा (DBT) करण्यात येईल.

४) सदर योजना मुंबई व मुंबई उपनगर वगळून इतर जिल्ह्यांसाठी लागू राहील.

५) संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) हे या योजनांचे अमंलबजावणी अधिकारी असतील व ते या योजनांसाठी आहरण व संवितरण अधिकारी राहतील. विभागीय स्तरावर संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

६) योजनांतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांची जिल्हा व योजनानिहाय निवड यादी आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यसाय, पुणे हे संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

७) संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देतील.

८) योजनांतर्गत लाभार्थ्यांची निवड झाल्याबाबत संबंधित सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हे सर्व संबंधित लाभार्थ्यांस लेखी कळवतील.

९) योजनांतर्गत निवड झालेल्या संबंधित लाभार्थी यांचेकडून योजनेचे अंमलबजावणीसाठी विहीत प्रपत्रात बंधपत्रे / योजनानिहाय आवश्यक ती कागदपत्रे तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी प्राप्त करुन घेतील. लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे सर्वसमावेशक प्रारुप आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करुन ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात येईल.

१०) लाभार्थ्यांनी शासकीय अनुदानाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास लाभार्थ्यांकडून अनुदानाची रक्कम व्याजासह महसूली कार्यपध्दतीने वसूल करण्यात येईल. असे लाभार्थी /कुटूंब शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत लाभ देण्यास पुढील पाच वर्षासाठी अपात्र राहील, यासाठी त्यांच्या स्वतंत्र नोंदी ठेवण्यात येतील व तसे संबंधित ग्रामपंचायत, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना कळविण्यात येईल.

११) अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत तसेच, आदिवासी क्षेत्र उपयोजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी अनुक्रमे केवळ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठीच खर्ची करण्यात येईल.

१२) योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या दुधाळ जनावरे, शेळी-मेंढी व कुक्कुट पक्षीगटांची तसेच प्रकल्पांची पडताळणी पुढील आर्थिक वर्षात नजीकच्या जिल्ह्यातील अधिकारी यांच्यामार्फत Cross verification करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे.

१३) संबंधित आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी २ टक्के निधी प्रशासकीय खर्चासाठी खर्च करण्यात यावा.

**योजनेचे मुल्यमापन:**

दर ३ वर्षांनी बार्टी, आदिवासी प्रशिक्षण व संशोधन केंद्र यासारख्या शासन मान्यताप्राप्त त्रयस्थ संस्थामार्फत मूल्यमापन करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी योजनेच्या प्रशासकीय खर्चासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या निधीतून करण्यात येईल.



महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

**योजनांच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधा.**


प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे पुणे येथे भेट देऊन चारा पिके व जीवामृत निर्मिती प्रकल्पाची माहिती घेतली. यावेळी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांचेसह प्रक्षेत्र अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे पुणे येथे उत्पादीत दुधाचा पुरवठा पशुसंवर्धन आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांना करण्यासाठी दूध वितरण प्रणालीचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांच्या हस्ते सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे यांना दुधाचे पाकीट देऊन करण्यात आला.

# 'झालावडी' शेळीच्या गोठवलेल्या वीर्य मात्रा वितरणाचे उद्घाटन
# मा. सचिव डॉ. रामास्वामी यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ




राज्यातील पशुसंवर्धन क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी धुळे जिल्ह्यातील मालपूर येथील 'झालावडी' शेळीपालन पट्ट्याला भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते दुग्धोत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या 'झालावडी' शेळी जातीच्या 'गोठवलेल्या वीर्य मात्रा' वितरणाच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सदर कार्यक्रम 'अण्णासाहेब शिंदे फाउंडेशन' आणि 'BAIF' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामुळे झालावडी शेळ्यांच्या अनुवांशिक सुधारणेला व दुग्धोत्पादन वाढीला मोठी चालना मिळणार आहे. या दौऱ्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळा'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शितलकुमार मुकणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पशुसंवर्धन विभागातील प्रादेशिक सहआयुक्त, नाशिक विभाग डॉ. बाबुराव नरवाडे, डॉ. जी. आर. पाटील, डॉ. मिलिंद भणगे व इतर सदस्यांनी या क्षेत्रभेटीत सहभाग घेऊन तांत्रिक बाबींचा आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अण्णासाहेब शिंदे फाउंडेशनचे श्री. अनिल अण्णासाहेब शिंदे व श्री. किरण पटवर्धन, तसेच BAIF संस्थेचे डॉ. मनोजकुमार आवारे व डॉ. विलास टाकळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी तज्ज्ञांनी झालावडी शेळ्यांच्या वैशिष्ट्यांबाबत सविस्तर सादरीकरण केले.

डॉ. एन. रामास्वामी यांनी या नाविन्यपूर्ण प्रयोगाचे कौतुक केले व आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ थेट पशुपालकांच्या गोठ्यापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. शितलकुमार मुकणे यांनी महामंडळामार्फत अशा उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमामुळे मालपूर परिसरातील शेळीपालन व्यवसायाला नवीन दिशा मिळणार असून, 'झालावडी' जातीच्या संवर्धनासाठी हे पाऊल मैलाचा दगड ठरणार आहे.




# पशुवैद्यक हे अन्न, आरोग्याचे रक्षक

## जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड; जागतिक पशुवैद्यक दिन साजरा

लातूर : पशुवैद्यक हे अन्न व आरोग्याचे रक्षक आहेत. पशुवैद्यकांनी पशुपालक शेतकऱ्यांना उद्योजक बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी व्यक्त केले.

जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, कर्नाटक पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शिवशंकर उस्तुरगे, कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, डॉ. भास्कर बोरगावकर, डॉ. माणिकराव जाधव, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बास्टेवाड म्हणाले, की पशुवैद्यकांनी पशुंना वेळेवर उपचार, रोगप्रतिबंधक लसीकरणावर भर देणे, तसेच पशुपालकांना उद्योजक बनविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. श्वानांचे निर्बीजीकरण करून जिल्हा रेबीजमुक्त करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पुढे यावे.

महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे पशुवैद्यकीय शास्त्रज्ञ व माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिलकुमार भिकाने यांनी 'पशुवैद्यक : अन्नसुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे रक्षक' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. विजय जाधव, डॉ. बोरगावकर, डॉ. नेताजी शिंगटे, डॉ. राम हुडगे, डॉ. वसंत गुळवे, डॉ. सूर्यकांत नागरगोजे, डॉ. मधुकर बोरुळे, डॉ. धीरज मानकरी व डॉ. महादेव जगताप यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला.

जिल्हा उपायुक्त डॉ. पडिले यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची माहिती देत योजनेमुळे पशुपालकांना उद्योजकतेकडे वळविण्याची संधी असल्याचे सांगितले. यावेळी जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थांचे प्रमुख, सेवानिवृत्त अधिकारी, पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक, खाजगी पशुवैद्यक उपस्थित होते. डॉ. शिंदे व डॉ. समीर सास्तुरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुधाकर साळवे यांनी आभार मानले.

# मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांच्याकडून IVBP पुणे येथील लस उत्पादन प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा

**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटर्नरी बायोलॉजिकल प्रॉडक्ट्स' (IVBP) संस्थेला मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. राज्याच्या पशुधनाचे विविध रोगांपासून संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या संस्थेच्या कामकाजाची त्यांनी सखोल पाहणी केली. याप्रसंगी त्यांच्यासोबत पशुआरोग्य व रोग नियंत्रण विभागाचे सहआयुक्त डॉ. शैलेश केंडे व संस्थेचे सहआयुक्त डॉ. याहयाखान पठाण हे देखील उपस्थित होते.

या भेटीत मा. आयुक्त महोदयांनी संस्थेतील 'गोट पॉक्स' लसीच्या उत्पादन प्रक्रियेची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. उत्पादनाचा तांत्रिक कार्यप्रवाह व लस निर्मितीच्या विविध टप्प्यांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. संस्थेतील सध्याच्या उत्पादन सुविधा, अद्ययावत यंत्रसामग्री व लस निर्मितीनंतर केल्या जाणाऱ्या गुणवत्ता नियंत्रण उपाययोजनांचे त्यांनी मूल्यमापन केले. राज्याच्या पशुधनाचे रक्षण करण्यासाठी लसींचा दर्जा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार राखण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

लस उत्पादनाचे उच्च निकष कायम राखण्यासाठी IVBP मधील शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांच्या टीमने केलेल्या समर्पित प्रयत्नांबद्दल डॉ. किरण पाटील यांनी अत्यंत समाधान व्यक्त केले. "राज्यातील पशुधनाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी ही संस्था उत्कृष्ट कार्य करत आहे," अशा शब्दांत त्यांनी टीमचे कौतुक करून त्यांचा उत्साह वाढवला. पशुवैद्यकीय जैविक उत्पादनांच्या क्षेत्रात सातत्याने नवनवीन संशोधन व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या या संस्थेच्या भेटीमुळे विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.







# पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प करुया:

## अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन: 67 वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७**

राज्यातील पशुपालकांच्या विकासासाठी पशुसंवर्धन विभाग नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. या प्रयत्नांना 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अंतर्गत आणखी व्यापक करुन पशुपालकांच्या समग्र विकासाचा संकल्प महाराष्ट्र दिनानिमित्त आपण करुयात, असे प्रतिपादन मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी ६७ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त तथा कामगार दिनानिमित्त केले.

औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयात डॉ. शितलकुमार मुकणे यांनी ध्वजवंदन करुन उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्गाला महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव गोसेवा आयोग डॉ. शामकांत पाटील, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,पुणे विभाग डॉ. समीर बोरकर, सहआयुक्त पशुसंवर्धन (पशुआहार) डॉ. सुनिल पसरटे, सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण, सहसंचालक (सांख्यिकी) श्रीमती सुषमा जाधव, उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. शिवाजी पवार, डॉ. प्रशांत भड आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





६७ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त तथा कामगार दिनानिमित्त ध्वजवंदनासाठी उपस्थित पशुसंवर्धन आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी.

# VMDD प्रकल्पांतर्गत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा शुभारंभ

## पशुपालकांना मिळणार उच्च वंशावळीच्या 7 महिन्याच्या गाभण कालवडी




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

विदर्भ व मराठवाडा येथील पशुपालकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि त्यांच्या दारात उच्च वंशावळीच्या दुभत्या जनावरांची पैदास करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (एमएलडीबी), नागपूर अंतर्गत एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या (ETF- Embryo Transfer Technology) सहाय्याने ७ महिने गाभण असलेल्या संकरीत कालवडींचे वाटप पशुपालकांना केले जाणार आहे.

दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, कोपरगाव येथे १२ गाईंमध्ये यशस्वीरीत्या भ्रूण प्रत्यारोपण करून या प्रकल्पाचा रीतसर शुभारंभ करण्यात आला.भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, ताथवडे (पुणे) येथील तज्ञ टीमने कोपरगाव प्रक्षेत्रावर हे काम सुरू केले आहे.

- पहिल्या टप्प्यात प्रक्षेत्रावरील उत्तम वंशावळीच्या कालवडींमध्ये भ्रूण प्रत्यारोपण करण्यात येत आहे. पुढील टप्प्यात बाजारातून दर्जेदार कालवडी खरेदी करून त्यांच्यात उच्च वंशावळीचे भ्रूण प्रत्यारोपित केले जातील.
- या प्रक्रियेद्वारे ७ महिने गाभण राहिलेल्या कालवडी विदर्भ व मराठवाडा येथील पशुपालकांना पुरवण्यात येतील, ज्यामुळे त्यांच्याकडे उच्च दूध उत्पादन क्षमता असलेली वासरे पैदा होतील.
- या प्रकल्पांतर्गत एकूण ३०० गाभण संकरीत कालवडी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

हा प्रकल्प राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतील अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, पशुसंवर्धन विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांच्या सूचनेनुसार तातडीने अंमलात आणला जात आहे. शुभारंभाच्या प्रसंगी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या १२ गाईंमध्ये भ्रूण प्रत्यारोपण पूर्ण करण्यात आले.

# नागरिकांनी गो-उत्पादनांचा वापर करावा: डॉ. किरण पाटील

## गोमय मूल्यवर्धित उत्पादनां'चे प्रदर्शन व विक्री



**पुणे:** अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने पशुसंवर्धन आयुक्तालयात 'गोमय मूल्यवर्धित उत्पादनांचे' विशेष स्टॉल्स लावण्यात आले होते. या उपक्रमाला पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली आणि गो-उत्पादनांच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

या भेटीदरम्यान डॉ. किरण पाटील यांनी विविध गोमय उत्पादनांची माहिती घेत मानवी जीवनातील त्यांची उपयोगिता जाणून घेतली. या आरोग्यदायी उत्पादनांमुळे केवळ नैसर्गिक जीवनशैलीला चालना मिळत नाही, तर गोशाळांच्या सक्षमीकरणासाठीही हे एक मोठे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी डॉ. पाटील म्हणाले की, "गोमय उत्पादनांबाबत समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे काळाची गरज आहे. यामुळे गोवंशाचे जतन आणि संवर्धन करण्यास मोठी मदत होईल."

कार्यक्रमास सहआयुक्त पशुसंवर्धन तथा महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य सचिव डॉ. शामकांत पाटील, वरिष्ठ अधिकारी डॉ. संगिता पांडे, डॉ. आशिष पवार, श्री. पंडीत, श्री. राहुल जगताप आदींसह कर्मचारी तसेच विविध गोशाळांचे संचालक व प्रतिनिधी उपस्थित होते. अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमाला आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांनी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गोमय उत्पादनांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने गोसेवा आयोगाचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे.



# अंबाजोगाईत 'गोकाष्ट' निर्मितीला चालना!

## लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळेचा पर्यावरणपूरक पुढाकार




**बीड:** महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व गोशाळांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने, अंबाजोगाई तालुक्यातील वरवटी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळेत 'गोकाष्ट' निर्मितीचा एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जात आहे.

गायीच्या शेणापासून तयार करण्यात आलेल्या लाकडाला 'गोकाष्ट' म्हटले जाते. हे लाकूड नैसर्गिक असून लाकूडतोडीला एक उत्तम व पवित्र पर्याय म्हणून समोर आले आहे. या उपक्रमांतर्गत तयार होणाऱ्या गोकाष्टाचे महत्त्व विशद करताना गोशाळा व्यवस्थापनाने खालील फायदे सांगितले आहेत:

- स्वयंपाकासाठी जळण म्हणून याचा वापर होतो. हे लाकूड लवकर पेटते व दीर्घकाळ उष्णता देते.
- गोकाष्ट जाळल्यानंतर शिल्लक राख उत्कृष्ट खत म्हणून वापरता येते, ज्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो.
- हवन, यज्ञ, पूजा व अगदी अंत्यविधीसाठी गोकाष्ट अत्यंत पवित्र मानले जाते. यामुळे वृक्षतोड थांबण्यास मदत होते.
- याचा धूर नैसर्गिक कीटकनाशकाचे काम करतो, ज्यामुळे डास व इतर कीटकांचा प्रादुर्भाव कमी होतो.
- नैसर्गिक लाकडाचा वापर कमी झाल्यामुळे जंगलांचे रक्षण होते व प्रदूषणही कमी होते.

### सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी आवाहन

"पुन्हा एकदा देशाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी व गोवंश टिकवण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गोशाळा आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे व गोकाष्टाचा वापर हे त्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. गोकाष्टाचा वापर करून पर्यावरण रक्षणाच्या या महायज्ञात सामील व्हावे व आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे," असे आवाहन लोकनेते गोपीनाथ मुंडे गोरक्षण शाळेच्या वतीने ॲड. अशोक बी. मुंडे यांनी केले आहे.




## 'जागतिक पशुवैद्यकीय दिन - 2026




**जळगाव: 'जागतिक पशुवैद्यकीय दिना'चे औचित्य साधून जिल्हा पशु सर्वचिकित्सालय, जळगाव आणि महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यकीय संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'अँटी-रेबीज' (रेबीज प्रतिबंधक) लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रभारी पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. शामकांत हिरे यांच्या हस्ते संपन्न झाले. या विशेष मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील 117 श्वान आणि 53 मांजरींना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली. लसीकरणासोबतच उपस्थित पशुपालकांना रेबीज या आजाराची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि स्वच्छतेचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.**

*************************************************************************************

# पशुसंवर्धन आयुक्तालयात जागतिक पशुवैद्यक दिन साजरा; उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पशुवैद्यकांचा गौरव




**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-६७**

ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान महाराष्ट्र, व महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटना, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या पशुवैद्यकांचा सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.





मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. याप्रसंगी बोलताना डॉ. मुकणे यांनी पशुवैद्यकांचे समाजातील आणि अन्न सुरक्षेतील महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून पशुसंवर्धन मुख्यालयाचे सहआयुक्त डॉ. शैलेश केंडे, पशुधन व नियोजन विभागाचे सहआयुक्त डॉ. देवेंद्र जाधव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

सेवानिवृत्त सहआयुक्त पशुसंवर्धन (रोग अन्वेषण विभाग) डॉ. विनायक लिमये यांचा यावेळी जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या प्रशासकीय कामकाजात उत्तम कामगिरी करणाऱ्या सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. देवेंद्र जाधव व उपआयुक्त पशुसंवर्धन तथा, सदस्य सचिव महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण डॉ. प्रशांत भड यांचाही सदर कार्यक्रमात प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यात ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे सल्लागार (औषधे व खाद्य) मा. डॉ. सत्यव्रत कुलकर्णी यांनी 'Veterinarian: Guardian of Food and Health' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच भारतीय खाद्य सुरक्षा व मानक प्राधिकरणाचे (FSSAI) सहसंचालक मा. डॉ. कृष्णा मेथेकर यांनी 'Food Safety' या विषयावर आपले विचार मांडले.





इंडियन इम्युनॉलॉजिकल्स संस्थेचे उपमहाव्यवस्थापक डॉ. सर्वेश तायशेटे व भारतीय पशुचिकित्सा संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. किरण भिलेगावकर यांची देखील या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

पशुवैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विविध श्रेणींमध्ये यावेळी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये विशेष प्रकल्प व उपक्रम गटात डॉ. धनंजय परकाळे, डॉ. शरद लोंढे, डॉ. निलेश खलाटे, डॉ. विश्वनाथ जवणे, डॉ. नवटाके, डॉ. दीपक औताडे व डॉ. दिपाली क्षीरसागर यांचा समावेश होता.

प्रशासन, रेडिओलॉजी व इतर सेवा गटात उत्कृष्ट प्रशासन अधिकारी म्हणून डॉ. बाळासाहेब गायकवाड (DVP), कल्याणी आवटी, अर्चना कांबळे आणि कर्मचारी (DD कार्यालयीन कर्मचारी - परवाना शुल्क प्रयत्नांसाठी) डॉ. दीपक बेल्हेकर, डॉ. नम्रता चौधरी, डॉ. स्मिता नेरुलकर, डॉ. अमित क्षीरसागर, विस्तार अधिकारी डॉ. अस्मिता साताळकर, डॉ. योगेश शेळके, डॉ. प्रशांत साळवे व डॉ. शरद खटके यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यालयीन क्षेत्रातील उत्कृष्ट पशुवैद्यकीय अधिकारी या गटात डॉ. शरयू गोगावले, डॉ. दुर्गादास उदेगावकर, डॉ. गायत्री आवटी, डॉ. वैशाली वानखेडे, डॉ. संजय पवार तर गुणवंत अधिकारी गटात डॉ. रुपाली दादके डॉ. प्रेरणा मुलुक, डॉ. नवनाथ अडसूळ, डॉ. माणिक गुलाब बनकर, डॉ. नागेश पुरी, डॉ. प्रशांत आबाजी खटके डॉ. युवराज रगतवान, डॉ. वाघमोडे, डॉ. शैलजा कोब्रागडे, डॉ. काळजरे, डॉ. विकास सातपुते व डॉ. वेद पाठक यांचा सन्मान करण्यात आला.











सत्यमेव जयते

# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३

राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" लागू केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे.

## हा कायदा का करण्यात आला?

उत्तम दर्जाच्या वळूंचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

- ➢गायी-म्हशींच्या प्रजनन व्यवस्थेचे नियमन
- ➢दर्जेदार वंशवृद्धी सुनिश्चित करणे
- ➢बेकायदेशीर कृत्रिम रेतन (AI) रोखणे
- ➢शेतकऱ्यांना प्रमाणित सेवा उपलब्ध करून देणे

## कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये:

- राज्यातील सर्व रेत केंद्र), भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.
- कृत्रिम रेतन करणाऱ्या तंत्रज्ञांना आता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांकडे नोंदणी करावी लागेल.
- केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल.
- या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची' स्थापना करण्यात आली आहे.
- प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
- कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

## दंड व शिक्षेच्या तरतुदी :

१.कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर रु. ५०,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल.

२.नोंदणी प्रमाणपत्राविना गोजातीय प्रजनन क्रिया करणे, अथवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोळवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर रु. १,००,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल.

३. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची / दिशाभूल करणारी जाहिरात किंवा प्रसिद्धी केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर ६ महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा रु. २,००,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण

राज्यामध्ये गोजातीय रेत, बीजांडे किंवा भ्रूणबीजपेशी यांचे उत्पादन संस्करण, साठवण, विक्री व वितरण व वापर याचे विनियमन करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १२ अन्वये "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण" पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध,पुणे-०७ येथे कार्यान्वित करण्यात आलेला असून सध्या आयुक्त पशुसंवर्धन हे प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत.

### महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) नियम, २०२४ नुसार नोंदणी व नुतनीकरणाचे शुल्क

| अ. क्र. | नोंदणीची बाब | नोंदणी शुल्क | नोंदणीचे नुतनीकरण |
|---|---|---|---|
| १. | रेत केंद्र | रु. ३०,००० | रु. १५,००० |
| २. | भ्रुण प्रत्यारोपण किंवा प्रयोगनलिका (in-vitro) फलन प्रयोगशाळा | रु. २०,००० | रु. १०,००० |
| ३. | कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था | रु. २०,००० | रु. १०,००० |
| ४. | सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवा पुरवठाकार | रु. २०,००० | रु. १०,००० |
| ५. | सहयोगी जनन तंत्रज्ञान (एआरटी) तज्ञ | रु. १०,००० | रु. ५,००० |
| ६. | रेत बँक | रु. २०,००० | रु. १०,००० |
| ७. | कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकार | रु. २०,००० | रु. १०,००० |
| ८. | कृत्रिम रेतन तज्ञ | रु. १,००० | रु. ५०० |

## शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे

- ➢ फक्त प्रमाणित व अधिकृत वीर्यमात्रेचा वापर करा
- ➢ सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासा व नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्या.
- ➢ कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून आपल्या पशुधनाचे संरक्षण करा.

## शेतकऱ्यांना होणारे फायदे

- ➢सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन
- ➢उत्तम प्रजनन कार्यक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढ
- ➢वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास
- ➢दुग्ध व्यवसायात स्थैर्य व आर्थिक उत्पन्नात वाढ

★ अधिक माहितीसाठी संपर्क ★

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण

पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

हेल्पलाईन क्रमांक: ०२० २५६९०४८०

# 'क्लासिकल स्वाइन फीव्हर' नियंत्रण कार्यक्रम (CSF-CP)



**भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था व अन्नसुरक्षेमध्ये पशुधनाचे आरोग्य हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर, वराह (डुक्कर) पालन क्षेत्राला सुरक्षित करण्यासाठी केंद्र सरकारने 'क्लासिकल स्वाइन फीव्हर नियंत्रण कार्यक्रम' (CSF-CP) सुरू केला आहे. हा कार्यक्रम 'पशु आरोग्य व रोग नियंत्रण' (LH&DC) योजनेअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या या महत्वपूर्ण उपक्रमासाठी केंद्र सरकार 100% आर्थिक मदत पुरवते.**

क्लासिकल स्वाइन फीव्हर (CSF) ज्याला सामान्यतः 'हॉग कॉलरा' म्हणतात, हा डुकरांमध्ये आढळणारा एक अत्यंत संसर्गजन्य व घातक विषाणूजन्य आजार आहे. हा आजार 'फ्लॅव्हिव्हिरिडे' (Flaviviridae) कुटुंबातील विषाणूमुळे होतो. यात वराहांना तीव्र ताप येणे, भूक मंदावणे व त्वचेवर अंतर्गत रक्तस्रावाचे चट्टे दिसणे अशी लक्षणे आढळतात.

हा विषाणू वराहांमधील थेट संपर्क, दूषित खाद्य किंवा बाधित वस्तूंमुळे वेगाने पसरतो. या आजारामुळे मोठ्या प्रमाणात मृत्यूदर वाढतो, वराहांची उत्पादकता घटते व पर्यायाने पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते.

**या विषाणूचा धोका कायमचा संपवण्यासाठी सरकारने द्विस्तरीय धोरण आखले आहे:**


१. तीन महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या सर्व निरोगी व बिगर-गाभण वराहांचे लसीकरण करणे, हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामुळे वराहांमध्ये रोगप्रतिकारशक्ती निर्माण होऊन आजाराचा प्रसार रोखता येतो.


**क्लासिकल स्वाइन फीव्हर नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुपालकांना कोणत्याही शुल्काशिवाय मोफत लस उपलब्ध करून दिली जाते, जेणेकरून आर्थिक अडचणींमुळे वराह लसीकरणापासून वंचित राहणार नाही. याशिवाय, पशुवैद्यकीय पायाभूत सुविधांमध्ये खालील सुधारणा केल्या जात आहेत:**

| सुविधा | तपशील |
|---|---|
| निदान सुविधा | आधुनिक प्रयोगशाळांद्वारे रोगाचे लवकरात लवकर व अचूक निदान करणे. |
| जैव-सुरक्षा (Biosecurity) | जागतिक मानकांनुसार स्वच्छता व पिग फार्मवर सुरक्षेचे उपाय राबवणे. |



**'क्लासिकल स्वाइन फीव्हर नियंत्रण कार्यक्रमा'मुळे वराहांचा मृत्यूदर कमी होऊन त्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. यामुळे वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अधिक शाश्वत व फायदेशीर वातावरण तयार होत असून, भारताच्या एकूण पशुधन क्षेत्राच्या विकासाला यामुळे मोठी चालना मिळत आहे.**










मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन., अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे व प्रादेशिक सहआयुक्त डॉ. बाबुराव नरवाडे यांनी जळगाव तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या X-Ray CR System, Sonography व Cold Room युनिटची बारकाईने पाहणी केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पशुवैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याबाबत त्यांनी यावेळी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.



# राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत शेळीपालन प्रकल्पाची पाहणी...

मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन., अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे आणि प्रादेशिक सहआयुक्त डॉ. बाबुराव नरवाडे यांनी गुढे (ता. भडगाव, जि. जळगाव) येथील ५०० शेळ्यांच्या NLM प्रकल्पाला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रकल्पाच्या व्यवस्थापनाची पाहणी करून लाभार्थ्यांना शास्त्रोक्त शेळीपालनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात पशुधनाच्या माध्यमातून उद्योजकता वाढवण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.





मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. व मा. अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ डॉ. शितलकुमार मुकणे यांनी शेळी-मेंढी प्रक्षेत्र भिलाखेड, ता. चाळीसगाव येथे भेट देत प्रक्षेत्राची पाहणी केली व उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ प्रक्षेत्र, आंबेजोगाई येथे आयोजित विशेष प्रशिक्षण शिबिरात २१४ प्रशिक्षणार्थींनी मेंढी व शेळीपालनाचे आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाचे धडे गिरवले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ संचलित, पडेगाव (छत्रपती संभाजीनगर) येथील प्रक्षेत्रावर आयोजित तीन दिवसीय 'शेळीपालन प्रशिक्षण' कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. दि. 27 एप्रिल ते 29 एप्रिल 2026 या कालावधीत पार पडलेल्या या प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील एकूण 252 प्रशिक्षणार्थ्यांनी घेतला. सन 2026-27 या आर्थिक वर्षातील ही पहिलीच प्रशिक्षण बॅच होती. ग्रामीण भागातील तरुण व नवउद्योजकांना शेळीपालन व्यवसायाकडे आकर्षित करण्यासाठी व त्यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.



# लस निर्मिती क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. सुनीता चौगुले यांचा गौरव; आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. किरण पाटील यांच्याकडून अभिनंदन




पुणे: पशू आजार नियंत्रणासाठी गुणवत्तापूर्ण लसींची निर्मिती व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पशुवैद्यक डॉ. सुनीता चौगुले यांच्या कार्याची दखल घेत पशुसंवर्धन विभागातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. डॉ. चौगुले यांनी लस निर्मिती आणि विविध जीवाणूंच्या जनुकीय पृथक्करणात केलेले संशोधन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वाखाणले गेले आहे.

डॉ. सुनीता चौगुले सध्या पुणे येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था (IVBP), औंध येथे जीवाणू विभागात सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन) म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत अत्यंत संवेदनशील व महत्त्वाच्या प्रक्रिया पार पाडल्या जात आहेत. डॉ. चौगुले यांचे पशू आजार नियंत्रण व लस चाचणीसंदर्भातील संशोधन राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे. जीवाणू विभागात कार्यरत असताना त्यांनी 'लस बीज बँक' मध्ये जीवाणूंचे संचयन व त्यांचे जनुकीय पृथक्करणावर विशेष काम केले आहे. पशूंना दिल्या जाणाऱ्या लसींची गुणवत्ता तपासणे, दर्जात्मक निर्मिती आणि प्रयोगशाळेतील जैवसुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे.

पशुसंवर्धन विभागाला मिळालेल्या या यशामध्ये डॉ. चौगुले यांचे योगदान महत्त्वाचे असून, त्यांचे कार्य पशू आरोग्य क्षेत्रातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी डॉ. सुनीता चौगुले यांच्या विशेष कामगिरीबद्दल व विभागाला मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे. "महाराष्ट्राला अशा समर्पित व कर्तृत्ववान महिला अधिकाऱ्याचा अभिमान आहे," अशा शब्दांत आयुक्तांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# महापशुधन वार्ता

# NAGPUR POST

## Farmers now get interest-free loan on Kisan Credit Card

ASHOK BANORE / YAVATMAL / NAGPUR POST: The Animal Husbandry Department has launched the Pashusanvardhan Kisan Credit Card campaign for animal husbandry farmers. Under this scheme, easy loan facilities are being provided to farmers engaged in animal husbandry, goat-sheep farming, poultry farming and boar farming. Under this initiative, farmers who do not have a Kisan Credit Card will be given a collateral-free loan of up to Rs 1 lakh 60 thousand. If there is a guarantee from a milk organization, this limit is increased to Rs 3 lakh. Also, farmers who already have Kisan Credit Card have been given the opportunity to increase the limit to Rs 3 lakh. Although the basic interest rate of the loan is 9 percent, those who repay regularly get a total interest subsidy of 7 percent, namely 3 percent from the Central Government and 4 percent from the State Government. Therefore, honest loan payers can actually get the benefit of zero percent interest. Under the Chief Minister's Rural



eligible beneficiaries through the credit card.

Animal husbandry members of milk societies, milk unions or milk producing companies who have not yet availed the benefits will be eligible for this scheme. It is mandatory for the beneficiaries to register their livestock on the Bharat Pashudhan portal.

**Appeal to avail the benefits of the scheme**

In order to promote the livestock business and overcome financial difficulties, District Animal Husbandry Deputy Commissioner Mangesh Kale has appealed to the eligible animal husbandry to avail the benefits of this scheme. For more information,

# लोकमत

## गोठ्यापर्यंत धावले डॉक्टर; वर्षात ६५ हजार पशुधनाचा वाचला प्राण

राज्यातील स्थिती

४,०१,९९२

३,७८,०००


३४,९७९

६४,७५९



दीड तासात पथक हजर

कोणत्या जिल्ह्यात किती पशुधनावर उपचार?



९५३ मोबाइल क्लिनिक...

# पुढारी

## पशुधनासाठी चारासुरक्षा आराखडा तयार करा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संभाव्य चाराटंचाईच्या पार्श्वभूमीवर सूचना



# पुण्य नगरी

## पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्डद्वारे मिळणार ३ लाखांपर्यंत कर्ज

सुविधा : पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन व वराहपालन करणारे शेतकरी पात्र

## पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजनेतून 3 लाखांपर्यंत अर्थसहाय्य

### >> पशुपालकांनी योजनेचा लाभ घ्यावा: डॉ. गिरीश पाटील



# देशोन्नती

www.deshonnati.com epaper.deshonnati.com जिल्हा ३

## लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - एम. रामास्वामी



# पशुवैद्यक हे अन्न, आरोग्याचे रक्षक

जिल्हाधिकारी डॉ. घाटगे-पाटील; लातूरमध्ये जागतिक पशुवैद्यक दिन साजरा



# आली रे आली, आता तरुणांकरिता 'मालक' होण्याची नामी संधी आली

७५ टक्क्यांपर्यंत अनुदान : 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ठरणार 'संजीवनी'



लोकमत

# तीन लाखांपर्यंत कर्ज, शून्य व्याज; 'किसान क्रेडिट कार्ड' काढले का?

जिल्ह्यात पशुपालकांसाठी 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम; सवलतीच्या दरात कर्ज सुविधा



तरुण भारत

24 Apr 2026 - Page 8

epaper.tarunbharatlive.com

## हेल्पलाईच्या माध्यमातून तीन लाखांवर पशुधनाच्या आजारांचे निराकरण

जळगाव : पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जनावरांचे आरोग्य धोक्यात आले की, शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडते. मात्र, आता अद्ययावत तंत्रज्ञान आणि १९६२ मोबाईल व्हेटरनरी क्लिनीक यांच्या समन्वयामुळे पशुपालकांना मोठा आधार मिळाला आहे. वर्षभरात या हेल्पलाईनवर ४ लाख १ हजार ९९२ कॉल्स प्राप्त झाले असून त्यापैकी ३ लाख ७८ हजार ३५ पशुधनाच्या आजारविषयक समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यात आले आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील ३४ हजार ९७९ पशुपालकांनी या सेवेचा लाभ घेतला. ही सेवा त्यांच्या दृष्टीने लाईफलाईन ठरली आहे. आपत्कालीन परिस्थितीत गोल्डन अवरमध्ये उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. कॉल प्राप्त झाल्यानंतर अवघ्या दीड तासात पशुवैद्यकीय पथक घटनास्थळी पोहोचते, यामुळे ६४ हजार ७५९ पशुधनाचे प्राण वाचवण्यात यश आले आहे. यात २९ हजार १३० मोठ्या व ३५ हजार ५६९ लहान पशुधनाचा समावेश आहे.

तरुण भारत

## पशुवैद्यकीय यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना

एल निनोच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाची सज्जता; मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

लोकमत

## पशुपालकांनो, उष्माघातामुळे दररोज जनावरांना दिवसांतून ४ वेळा पाणी द्या; उन्हात चारणे टाळा



## राज्यात २०० कोटींचा वैरण विकास कार्यक्रम



लोकमत

# तीन लाखांपर्यंत कर्ज, शून्य व्याज; 'किसान क्रेडिट कार्ड' काढले का?

लोकमत इन्फो स्टोरी

**नागपूर :** राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

## काय आहे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजना?

शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पशुसंवर्धन विभागाकडून किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या माध्यमातून ३ लाखांपर्यंतचे अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळणार आहे.

## सवलत, शून्य व्याजदरावर ३ लाखांपर्यंत कर्ज

किसान क्रेडिट कार्ड असलेल्या शेतकऱ्यांना ३ लाखांपर्यंतचे कर्ज मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक शेतकऱ्यांना शून्य टक्का व्याज दराचाही लाभ घेता येणार आहे. २०२६-२७ पासून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ घेता येणार आहे.

## असा आहे व्याज सवलतीचा आराखडा

कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला, तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३ टक्के आणि राज्य सरकारकडून ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळू शकते. बँकांनाही २ टक्के व्याज सवलत देण्यात आली आहे.

## कार्ड नसल्यास १.६० लाखाचे कर्ज

ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाते. मात्र, दूध संस्थेने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाखांपर्यंत वाढविता येईल.



## १९६२ हेल्पलाइनवर मिळेल माहिती

राज्यातील ५० लाख पात्र पशुपालकांना योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. यासंदर्भातील माहिती नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालय व १९६२ या हेल्पलाइन नंबरवर मिळेल.

## कशासाठी किती कर्ज?

२५ हजार मांसल कुक्कुट पक्षी, ५० हजार किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

४५००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट

१०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा

५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी-शेळीचा गोठा

२०० किंवा त्यापेक्षा कमी वराह



### योजनेसाठी पात्रता आणि अटी

प्रकल्प धारकाने केंद्र, राज्य, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

पशुपालन प्रकल्पामधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक.

पशुपालकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड करणे आवश्यक आहे.

## कुठे आणि कसा करायचा अर्ज?

जिल्ह्याचे उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धविकास या योजनेचे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. पशुपालकांनी पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधावा.

"पशुधनाच्या संगोपनासाठी आर्थिक अडचण भासू नये, तसेच ग्रामीण भागात पशुधन व्यवसायाला चालना मिळावी, यासाठी पशुपालकांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून लाभ घ्यावा.

**डॉ. नितीन फुके**, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर

लोकमत

# मुक्या प्राण्यांनाही उष्माघाताचा होतो त्रास; काय काळजी घ्याल?

लोकमत इन्फो स्टोरी

**लातूर :** उन्हाची तीव्रता वाढत असून, सध्या कमाल तापमान ३५ अंशांवर पोहोचले आहे. वाढत्या तापमानाचा परिणाम, नागरिकांवरच नव्हे, तर मुक्या प्राण्यांच्या आरोग्यावरही होत आहे. त्यामुळे पशुधन, पाळीव प्राण्यांची काळजीचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

## ३५ अंशांवर जिल्ह्याचा पारा

चार दिवसांपासून वातावरणात बदल होत असला तरी सध्या तापमानाचा पारा ३५ अंशावर पोहोचला आहे. विशेषत: औसाद शहाजानी परिसरातील तापमान ३८ अंश सेल्सियस नोंदले गेले आहे. आगामी काळात आणखी तापमान वाढीचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे.

## उष्णतेमुळे दुभत्या जनावरांसह पाळीव प्राणी टाकताहेत धापा...

उन्हाळ्यात दुभत्या जनावरांची अधिक काळजी घेण्याची गरज आहे. जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते, त्वचा गरम व कोरडी होते. त्यामुळे पशुधन सावलीत किंवा थंड निवाऱ्याच्या ठिकाणी बांधावे. पिण्यासाठी थंड पाणी द्यावे. शरीरावर थंड पाण्याचा शिडकावा करावा, तसेच ओले पोते टाकावे.

## प्राण्यांत उष्माघाताची लक्षणे कोणती?

उन्हाळ्यात पशुधनाच्या नाकातून रक्त पडते. जलद श्वास घेणे, धाप लागणे, तोंडातून जास्त लाळ गळणे, शरीराचे तापमान खूप वाढणे, सुस्ती, अस्वस्थपणा, भूक कमी होणे अथवा पाणी जास्त पिणे, डोळे व जीभ लालसर होणे, हृदयाचे ठोके वाढणे आदी लक्षणे आहेत.

## दूध घटले, प्रजनन क्षमतेवर परिणाम...

उष्णतेमुळे जनावरांच्या शरीरातील पाणी कमी होते, त्याचा परिणाम दूध उत्पादनावर होतो, तसेच प्रजनन क्षमता

"उन्हामुळे पशुपालकांनी पशुधनाची अधिक काळजी घ्यावी. पिण्यासाठी थंड पाणी, पुरेसा चारा असावा. दुपारच्या वेळी शेती कामे करू नये. उष्माघाताची लक्षणे दिसताच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**डॉ. राजकुमार पडिले**, उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन, लातूर.

## दुभत्या व संकरित जनावरांना असे जपा...

पशुधनास उन्हात बांधू नये. शेती कामे सकाळी व सायंकाळच्या वेळी करावीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था गोठ्याजवळच असावी. पशुधन दाटीवाटीने बांधू नये.



## घरातील पाळीव प्राण्यांची काय काळजी घ्याल?...

उन्हाळ्यात प्राण्यांना पिण्यासाठी थंड पाणी ठेवावे. प्राण्यांचा निवारा सावलीत असावा. आजारी पाळीव प्राण्यांना ऊन लागू नये याची काळजी घ्यावी. आजारी प्राण्यांवर तत्काळ उपचार करून घ्यावेत. उन्हाळ्यात प्राण्यांना जास्त काळ पायी

# 'एल-निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभाग सतर्क

### जिल्हा चारा सुरक्षा आराखडा तयार करण्याचे मुख्यमंत्री यांचे निर्देश

[illegible]

महापशुधन वार्ता

# ब्रॉयलर पक्ष्यांमधील विविध कारणामुळे होणारी मरतूक व त्यावरील उपाययोजना



**ब्रॉयलर पक्षी हे त्यांच्या जलद वाढीच्या व खाद्याचे मांसात रूपांतर करण्याच्या उत्कृष्ट क्षमतेमुळे मांस उत्पादनासाठी ओळखले जातात. साधारण 6 ते 8 आठवड्यांत तयार होणारे हे पक्षी प्रथिनांची गरज भागवण्यासाठी महत्त्वाचे असून, सध्या हा व्यवसाय शेतीपूरक व रोजगाराचा एक उत्तम स्रोत बनला आहे. मात्र, बदलत्या हवामानाचा फटका, आहारातील असमतोल, व्यवस्थापनातील त्रुटी आणि नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव यामुळे ब्रॉयलरच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी, उत्पादकता घटून मरतुकीचे प्रमाण वाढल्यास मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. त्यामुळे या व्यवसायात योग्य संगोपन आणि काटेकोर व्यवस्थापन अत्यंत आवश्यक ठरते.**



**डॉ. डी. एस. गाडे,**
सहाय्यक आयुक्त प. व दु.,
पशुसंवर्धन आयुक्तालय,
औंध, पुणे - 411067



**प्रा. डॉ. एम. व्ही. धुमाळ,**
कुक्कुटपालन विभाग,
पशुवैद्यक व पशुविज्ञान
महाविद्यालय परभणी

### ब्रॉयलर पक्षामध्ये मरतुक कशामुळे व कोणत्या कारणामुळे होते?

सर्वसाधारणपणे ब्रॉयलर पक्षामध्ये उन्हाळ्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या आठवड्यामध्ये पिल्लांना जास्त प्रमाणात ऊब (उष्णता ) देणे, थंडी व पावसाच्या दिवसामध्ये उष्णतेची कमतरता, अमोनिया साठणे, नेव्हल इल (आजारी नाभी), संसर्गजन्य आजार, परोपजीवी जंतुंचा प्रादुर्भाव झाल्यामुळे, खाद्याचे घटकामधील असमतोलामुळे, व पिल्लामधील मूत्रपिंडाचा होणारा आजार अशा विविध कारणांमुळे पहिल्या एक- दोन आठवड्यामध्ये ब्रॉयलर पक्षांच्या पिल्लामध्ये मरतूक होत असते. हे टाळण्यासाठी कुक्कुटपालनामध्ये नेहमी आढळणाऱ्या रोगाविषयी माहिती, प्रतिबंधक उपाय आणि औषोधोपचार या विषयी जनजागृती असणे आवशाक आहे.

### अ. तापमान व्यवस्थापन व त्याचे परिणाम

ब्रॉयलर पक्षांच्या शरीराचे सामान्य तापमान १०५°F ते १०७°F असते. पिल्लांच्या सुदृढ वाढीसाठी पहिल्या आठवड्यात शेडचे तापमान ९५°F राखणे अनिवार्य आहे. यशस्वी कुक्कुटपालनासाठी सुरुवातीचे दोन आठवडे तापमान, स्वच्छता व हवेचे योग्य व्यवस्थापन करणे हाच आर्थिक नुकसान टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. कारण, तापमानातील चढ-उताराचे परिणाम खालीलप्रमाणे होतात:

•**अति तापमान:** तापमान आवश्यकतेपेक्षा वाढल्यास पिल्लांच्या शरीरातील पाणी कमी होते. विष्टा घट्ट होऊन गुदद्वारापाशी साचल्याने पिल्ले दगावतात. तसेच, पिल्ले धापा टाकतात, खाद्य कमी खातात व 'कॅनिबालीझम' (एकमेकांना टोचणे) सारख्या सवयी जडतात.

•**कमी तापमान:** तापमान ६०°F ते ६५°F च्या खाली गेल्यास पिल्ले उब मिळवण्यासाठी एकमेकांवर गर्दी करतात. यामुळे गुदमरून /थंडीमुळे श्वसनाचे विकार होऊन मरतूक वाढते.

**उपाय:** पिल्ले शेडमध्ये येण्यापूर्वी किमान १२-१४ तास आधी 'ब्रुडर' सुरू करावे. पहिल्या दोन आठवड्यात तापमान स्थिर राखून खेळती हवा ठेवावी, जेणेकरून त्यांची प्रतिकारशक्ती व वाढ उत्तम राहील.

### ब. अमोनिया वायूचे नियंत्रण

लिटर (गादी) ओले / दमट झाल्यामुळे तिथे अमोनिया वायू तयार होतो. जर या वायूचे प्रमाण २५ PPM पेक्षा जास्त झाले, तर त्याचे गंभीर परिणाम दिसतात, जसे की...

❑ पिल्लांच्या डोळ्यांना इजा होते व डोळे चिकटतात.
❑ खाद्य खाण्याचे प्रमाण घटून वाढ खुंटते.
❑ श्वसन नलिकेत रक्तस्राव होऊ शकतो.

**प्रतिबंधात्मक उपाय:**

१. दिवसातून २-३ वेळा लिटर खाली-वर करावे.
२. पाण्याचे भांडे सांडणार नाही याची दक्षता घ्यावी.
३. लिटर जास्त ओले झाल्यास ते बदलून नवीन टाकावे.
४. ओल्या लिटरमध्ये प्रती १०० चौ. फुटास १ किलो चुना पावडर मिसळावी.
५. शेडमध्ये हवा खेळती राहील याची खात्री करावी.

### क. ओम्फालायटीस (नाभीचा दाह)

हा प्रामुख्याने हॅचरीतील अस्वच्छतेमुळे होणारा आजार आहे. अंडी उबवून बाहेर आल्यानंतर पिल्लांची नाभी पूर्णपणे बंद होणे आवश्यक असते. मात्र, काही कारणास्तव नाभी उघडी राहिल्यास त्यातून जंतूंचा प्रवेश होतो.

•**लक्षणे:** पोटाजवळील कातडीला सूज येणे, पोट फुगणे व पिल्ले दगावणे. मृत पिल्लाचे शवविच्छेदन केल्यास न शोषलेला अंड्याचा पिवळा बलक दुर्गंधीसह आढळतो.

•**उपाय:**

❑ प्रतीजैविके पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार वापराavit.
❑ अंडे देणाऱ्या कोंबड्याचे घरे स्वच्छ ठेवावीत.
❑ हॅचर व सेटर, बास्केट, आदी उपकरणांचे परिणामकारक निर्जंतुकीकरण करावे.
❑ हॅचर, बास्केट कोरडे असावे.
❑ हॅचरचे धुरीकरण करावे.
❑ उबवणूकीच्या वेळी अंडे ओलसर होऊ देऊ नये.

### ड. साल्मोनेल्लोसीस (पांढरी हगवण)

हा सूक्ष्म जीवाणूंमुळे होणारा आजार आहे. प्रामुख्याने अंडी उबवणूक केंद्रामध्ये संसर्ग असल्यास पिल्लांमध्ये हा रोग दिसून येतो.

**लक्षणे:** पिल्लांची विष्टा पांढऱ्या रंगाची असते. पिल्ले सुस्त होतात, पंख विस्कटतात व गुदद्वाराजवळ पांढरी विष्टा चिकटलेली दिसते. श्वसनास त्रास होऊन मरतूक वाढते.

**उपाय:** संसर्गित अंडी देणाऱ्या कोंबड्या कळपातून वेगळ्या कराव्यात. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकांचा वापर करावा. कडक जैवसुरक्षा पाळावी.

### इ. कोक्सिडीओसिस (रक्ती हगवण)

हा परोपजीवी जंतूंमुळे (Protozoa) होणारा अत्यंत घातक आजार आहे.

**लक्षणे:** विष्ठा लालसर किंवा विटकरी रंगाची (रक्ती) असते. पिल्ले अशक्त होतात, खाद्य कमी खातात व डोळे मिटून एका कोपऱ्यात बसतात.

**उपाय:** खाद्यामध्ये 'कोक्सिडीओस्टॅट' औषधांचा वापर करावा. शेडमधील लिटर नेहमी कोरडे ठेवावे आणि नियमितपणे खाली-वर करावे. रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास शेडचे प्रभावी निर्जंतुकीकरण व धुरीकरण (Fumigation) करणे आवश्यक आहे.



### ई. गाऊट (संधीरोग)

हा आजार प्रामुख्याने मूत्रपिंडाच्या कार्यात बिघाड झाल्यामुळे होतो. जेव्हा रक्तातील युरिक ॲसिडचे प्रमाण वाढते, तेव्हा त्याचे स्फटिक सांधे, स्नायू किंवा शरीराच्या अंतर्गत अवयवांवर साचू लागतात.

**प्रमुख कारणे:**

१. खाद्यात प्रथिनांचे अतिप्रमाण, कॅल्शियम व फॉस्फरसचा असमतोल आणि जीवनसत्व 'अ' ची कमतरता.

२. पिण्याच्या पाण्याची कमतरता, कठीण पाणी किंवा मिठाचे (सोडियम क्लोराईड) जास्त प्रमाण.

३. जेंटामायसिन किंवा सल्फा औषधांचा अनावश्यक वापर व खाद्यातील बुरशीजन्य विषबाधा (Mycotoxins).

**लक्षणे:** पिल्ले निस्तेज होतात, शरीरातील पाणी कमी होते (Dehydration) आणि पाय सुजल्यामुळे चालताना त्रास होतो. शवविच्छेदनात हृदय, यकृत व मूत्रपिंडावर पांढरट थरावर स्फटिक साचलेले दिसतात.

**प्रतिबंध आणि उपाय:**

- २४ तास मुबलक व स्वच्छ पाणी उपलब्ध असावे.
- पाण्यातून इलेक्ट्रोलाईट द्यावे.
- वयोमानानुसार संतुलित आहार द्यावा.
- प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्यास भरडलेली मका व गुळाचे पाणी द्यावे.
- पशुवैद्यकाच्या सल्ल्याने युरिन ॲसिडिफायर (उदा. व्हिनेगर, पोटॅशियम क्लोराईड) व जीवनसत्व 'अ, डी ३, के' चा वापर करावा.

### 2. चौथ्या आठवड्यानंतर होणारी मरतूक: कारणे व उपाय

**अ. जलोदर (Ascites):** हा आजार प्रामुख्याने ४ ते ६ आठवड्यांच्या पक्ष्यांमध्ये होतो. शरीराला पुरेसा ऑक्सिजन न मिळाल्याने हृदयावर ताण येतो, ज्यामुळे फुफ्फुसांतील रक्तवाहिन्यांतून द्रव पाझरतो आणि पोटाच्या पोकळीत पिवळसर पाणी साचते.

**लक्षणे:** पोट मोठे होणे, तुरा निळसर पडणे आणि चोचीने श्वास घेणे.

**प्रतिबंध:** ३० दिवसांनंतर पक्ष्यांची वाढ नियंत्रित करण्यासाठी खाद्यावर निर्बंध घालावेत. शेडमध्ये भरपूर खेळती हवा (ऑक्सिजन) असावी व लिटर कोरडे ठेवावे.

**ब. क्रॉनिक रेस्पिरेटरी डिसीज (CRD):** 'मायकोप्लाझ्मा गॅलीसेप्टीकम' जीवाणूमुळे हा श्वसनाचा विकार होतो.

**लक्षणे:** सर्दी, खोकला, नाका-डोळ्यांतून पाणी येणे आणि श्वास घेताना घरघर आवाज येणे.

**उपाय:** पशुवैद्यकाच्या सल्ल्याने टायलोसीन किंवा टेट्रासायक्लीन यांसारखी औषधे द्यावीत. शेडमधील धूळ कमी करून जैवसुरक्षेची अंमलबजावणी करावी.

**क. ई-कोलाय (Colibacillosis):** दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे हा जीवाणूजन्य आजार होतो. अंतर्गतरित्या यकृत, फुफ्फुस व हवेच्या पिशव्यांना सूज येते.

•**उपाय:** पिण्याच्या पाण्याचे नियमित शुद्धीकरण करावे. पाण्याची टाकी व पाइपलाईन वेळोवेळी स्वच्छ करावी.

### 3. जीवनसत्त्वे व खनिजांच्या कमतरतेमुळे होणारे विकार

**अ. जीवनसत्त्वांची कमतरता:**

•**जीवनसत्त्व 'अ':** कमतरतेमुळे अंधत्व येते, डोळ्यांतून पाणी येते आणि वाढ खुंटते.

•**बी-कॉम्प्लेक्स गट:**

•B१ (थायमिन): भूक मंदावणे.

•B२ (रायबोफ्लेवीन): पाय वाकडे होणे.

• B६ (पायरीडोक्झिन): पक्षी हेलकावे खाणे / चक्कर येणे.

•B१२ व बायोटीन: पिल्ले पांगळी होणे.

**ब. खनिजांची कमतरता:**

•**कॅल्शियम व फॉस्फरस:** हाडे ठिसूळ होणे, पाय वाकणे व वाढ खुंटणे.

•**मॅंगेनीज व झिंक:** सांध्यांना सूज येणे, पांगळेपणा आणि पचनशक्ती बिघडणे.

•**सेलेनियम:** स्नायू कमकुवत होणे.

**ब्रॉयलर पक्षामधील लसीकरण :-** कुक्कुटपालनात पक्षांचे व्यवस्थापन, आहार, पैदास, निवास व संगोपनाबरोबर पक्षांचे आरोग्यरक्षण करणे खूप महत्वाचे आहे. ब्रॉयलर पक्षामध्ये विविध संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे उत्पादन क्षमतेत घट होऊन आर्थिक नुकसान होते हे टाळण्यासाठी ब्रॉयलर पक्षामध्ये विविध रोगाचे लसीकरण करणे गरजेचे आहे. उपचारापेक्षा प्रतिबंधक लसीकरण हे आर्थिक दृष्ट्या परवडणारे आहे.यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार खालील रोगाचे लसीकरण करावे.




| अ. क्र. | रोगाचे नाव | लसीकरण केंव्हा करावे | लसीकरण कसे करावे |
|---|---|---|---|
| १ | मानमोडी रोग-लासोटा वाण प्रथम मात्रा | ५ ते ७ व्या दिवशी | नाकामध्ये/डोळ्यामध्ये-थेब टाकणे |
| २ | आय.बी. डी. रोग, प्रथम मात्रा (गंबोरो) | वयाच्या १४ व्या दिवशी | नाकामध्ये/डोळ्यामध्ये-थेब टाकणे |
| ३ | आय.बी. डी. रोग, द्वितीय मात्रा(गंबोरो) | वयाच्या २१ व्या दिवशी | पाण्यातून |
| ४ | मानमोडी रोग-लासोटा वाण द्वितीय मात्रा | वयाच्या २८ व्या दिवशी | पाण्यातून |



# पशु वन औषधी - वनस्पती उद्यान :
# जिवंत ग्रंथालय



**सध्या 'अँटी-मायक्रोबियल रेसिस्टन्स' (AMR) हा जागतिक आरोग्य विभागासमोर एक गंभीर पेच बनला आहे. जेव्हा संसर्गजन्य आजारांवर वापरली जाणारी प्रतिजैविके (Antibiotics), बुरशीनाशके (Anti-fungal) व विषाणूरोधक (Anti-viral) औषधे मानवी किंवा प्राण्यांच्या शरीरात काम करेनाशी होतात, तेव्हा त्या स्थितीला AMR असे म्हणतात. या प्रक्रियेमुळे साधे संसर्गदेखील जीवघेणे ठरू शकतात. पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे या समस्येची गांभीर्याने दखल घेतली आहे. विशेषतः न्युमोनिया व मूत्रनलिकेचे आजार औषधांना दाद देत नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. औषधांच्या अतिवापरामुळे उद्‌भवलेली ही समस्या निवारण्यासाठी 'पशु वन औषधी' वनस्पतींचे जिवंत ग्रंथालय म्हणून ओळखले जाणारे उद्यान भविष्यात अत्यंत दिशादर्शक ठरेल.**




**डॉ. स्मिता जिंतूरकर**
**सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (से.नि.)**
**गुण नियंत्रण प्रयोगशाळा**
**आरे, गोरेगाव, मुंबई 65**


मानवामध्ये व्हायरल इन्फेक्शन करिता antimicrobial चा अतिवापर किंवा निरोगी जनावरांत रोग प्रतिबंधक उपाय म्हणून तसेच पिकांना कीड लागू नये म्हणून antimicrobials चा अतिरेकी वापर केल्यामुळे AMR होत आहे. जगातल्या एकूण antimicrobials पैकी ७३% हे मांस, अंडी, दूध देणाऱ्या / माणसाला अन्न पुरविणाऱ्या जनावरांमध्ये वापरले जाते. त्यांचे अंश मांसातून, अंड्यातून / दुधातून आपल्या शरीरात, व पर्यायाने संपूर्ण इको सिस्टीममध्ये झिरपते!

मानवाच्या प्रथिनांची गरज भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्राणीजन्य उत्पादनांचा वापर होतो. याच साखळीतून, तसेच पीक-पाणी, दूध, मांस आणि अंडी यांमार्फत 'अँटी-मायक्रोबियल' घटक मानवी शरीरात व पर्यावरणात मिसळत आहेत. यामुळेच निर्माण होणाऱ्या 'अँटी-मायक्रोबियल रेसिस्टन्स' (AMR) या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी आता आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन व पर्यावरण या सर्व विभागांना 'वन हेल्थ अप्रोच' अंतर्गत एकत्र येणे अनिवार्य झाले आहे. या संकटावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने 'नॅशनल ॲक्शन प्लॅन' (NAP-AMR २०२५-२०२९) तयार केला आहे. यानुसार, विशेषतः ब्रॉयलर पोल्ट्रीमध्ये केवळ वजन वाढवण्यासाठी किंवा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून प्रतिजैविकांचा (Feed Additives) वापर करण्यावर कडक निर्बंध घातले आहेत. त्याऐवजी, 'इथ्नो-व्हेटर्नरी मेडिसिन' म्हणजेच पारंपरिक आयुर्वेदिक औषधांच्या वापराला प्रोत्साहन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' (NDDB) ने या विषयावर सखोल संशोधन केले असून, आयुर्वेदिक औषधी हा प्रतिजैव-



कांना सक्षम पर्याय असल्याचे सिद्ध केले आहे. २०२६ चे पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. पुण्यमूर्ती नटेशन यांनी गेल्या ४ दशकांपासून 'सायंटिफिक इथ्नो-व्हेटर्नरी मेडिसिन'वर काम करून प्रतिजैविक विरहित दूध व मांस उत्पादनासाठी ग्रामीण भागात मोठी क्रांती घडवून आणली आहे.

आपल्याकडे मानवाप्रमाणेच पशुधनासाठीही वनौषधींचा मोठा साठा व जैवविविधता उपलब्ध आहे. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे अंगण, तिथली झाडे व 'आजीबाईंचा बटवा' काळाच्या ओघात हरवत चालला आहे. आज आयुर्वेदाला पुनरुज्जीवित करण्यात सर्वात मोठी अडचण म्हणजे औषधी वनस्पतींची ओळख पटवणे. प्रत्येक पिढीगणिक हे पारंपरिक ज्ञान कमी होत चालले आहे.

'वृंदावन' पशु वनौषधी उद्यान: एक जिवंत ग्रंथालय

औषधी वनस्पतींची प्रत्यक्ष ओळख व्हावी, त्यांचे गुणधर्म जाणून घेता यावेत व या ज्ञानाचे जतन व्हावे, या उद्देशाने मुंबईतील आरे (गोरेगाव) येथील गुणनियंत्रण प्रयोगशाळा परिसरात 'वृंदावन पशु वनौषधी-वनस्पती उद्यान' साकारण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही शासकीय निधीशिवाय, लोकसहभाग, खासगी कंपन्या आणि सेवाभावी संस्थांच्या मदतीने पाऊण एकर ओसाड जागेचा कायापालट करून हे नंदनवन उभे राहिले आहे.

**उद्यानाची वैशिष्ट्ये:**

- ❑ येथे ७ प्रकारच्या २६० तुळशींची रोपे (वृंदा) आणि सुमारे २५० प्रजातींच्या ३,००० हून अधिक औषधी वनस्पती व देशी वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.
- ❑ पशुसंवर्धन क्षेत्रात सुरक्षित, शाश्वत आणि अंशविरहित अन्न उत्पादनाला चालना देणे.
- ❑ नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन करणे.

**भविष्यातील दृष्टीकोन व उपयोग**

हे उद्यान केवळ एक रोपवाटिका नसून, ते वनौषधींची ओळख, प्रक्रिया आणि वापर शिकवणारे एक 'प्रात्यक्षिक केंद्र' आहे. या उपक्रमामुळे खालील फायदे साध्य होतील:

१.विद्यार्थी, पशुवैद्यकीय अधिकारी आणि संशोधकांना वनस्पतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळेल.

२.पारंपरिक ज्ञानाचे प्रमाणीकरण करून ते पुढच्या पिढीसाठी जतन केले जाईल.

३.पशुपालकांना स्वस्त व पर्यावरणपूरक उपचार पद्धती उपलब्ध होतील.

४. पशुवैद्यकीय संस्थांना येथून बी-बियाणे व रोपे पुरवून हे ज्ञान थेट शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचवले जाईल.



या उपक्रमासाठी मा. डॉ. रामास्वामी एन., भा.प्र.से., सचिव (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच मा. पद्मश्री. डॉ. पुण्यमुर्ती नटेशन (Scientific Ethno-Veterinary Medicine ) मा. डॉ. आर. ओ. गुप्ता, वरिष्ठ महाव्यवस्थापक ( Productivity Enhancement ) N.D.D.B. आणंद यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

खालील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वृंदावन पशु वनऔषधी-वनस्पती उद्यान मूर्त स्वरूपात आले आहे:

- मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे, भा.प्र.से., आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
- मा. डॉ. देवेंद्र सुरेश जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग नियंत्रण व गुण नियंत्रण, प. सं. आयुक्तालय, पुणे
- मा. डॉ. प्रशांत उषा धनंजय कांबळे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, कोकण भवन
- मा. डॉ. विजय पुष्पा तुकाराम सावंत, उपआयुक्त पशुसंवर्धन, गुण नियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, मुंबई

राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (N.D.D.B.), आणंद (गुजरात); सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, मुंबई; संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली, मुंबई; मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव; अलाना सन्स प्रा. लि.; एम.यु.एन. ॲग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि.; महा इन्फोटेक प्रा. लि. (तंत्रज्ञान सल्ला सेवा); आत्मन अॅकडमी; माऊली औषधी वनस्पती व दुर्मिळ वनस्पती प्लांट सप्लायर या सर्वांनी आवश्यक ते तांत्रिक, समन्वयात्मक सहकार्य व संसाधनांची मदत पुरवून या उपक्रमात मोलाचे योगदान दिले आहे.

महापशुधन वार्ता

# कुक्कुटपालनासाठी आवश्यक बाबी व शेड बांधकाम



**आजच्या काळात पशुपालन हा केवळ शेतीला पूरक व्यवसाय न राहता एक स्वतंत्र व मुख्य व्यवसाय म्हणून उभा राहिला आहे. त्यामध्येही कुक्कुटपालन हा विभाग अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. मात्र, हा व्यवसाय खऱ्या अर्थाने फायदेशीर ठरवण्यासाठी केवळ पक्षांची निवड पुरेशी नसते; तर त्यांचे शास्त्रोक्त व्यवस्थापन आणि शेडची योग्य उभारणी अत्यंत महत्त्वाची असते. कोंबड्यांच्या वाढीवर व आरोग्यावर बाहेरील वातावरणाचा प्रत्यक्ष परिणाम होत असतो. ऋतूंनुसार होणाऱ्या बदलांपासून पक्षांचे संरक्षण करण्यासाठी आणि अपेक्षित उत्पादन मिळवण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने शेड बांधणे आवश्यक आहे. शेड उभारणीचा खर्च हा 'एकदाच' पण मोठा असतो, त्यामुळे त्याचे नियोजन दीर्घकालीन फायद्याचा विचार करूनच करायला हवे. त्याविषयी...**



**डॉ. अतुल पाटणे**
**सहाय्यक आयुक्त**
**पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,**
**अकोले, जि.अहिल्यानगर**

**व्यवसाय सुरू करण्यापूर्वीच्या आवश्यक बाबी:**

कोणताही मोठा प्रकल्प उभारण्यापूर्वी कायदेशीर व तांत्रिक पूर्तता करणे गरजेचे आहे:

१. स्थानिक ग्रामपंचायत किंवा स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' घ्यावे.

२. ५००० पेक्षा जास्त पक्षी क्षमता असलेल्या फार्मसाठी 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा'चा परवाना अनिवार्य आहे.

३.फार्म सुरू केल्यावर पशुसंवर्धन विभागाकडे त्याची अधिकृत नोंदणी करावी.

४.उपलब्ध भांडवल, पक्षांची क्षमता, विक्री व्यवस्था (अंडी किंवा मांस) नियोजन करावे.

५. भविष्यातील व्यवसाय विस्ताराचे नियोजन आधीच तयार ठेवावे.

### कुक्कुट शेडसाठी जागेची निवड

- जागा नेहमी उंचावर व पाण्याचा निचरा होणारी असावी, जेणेकरून हवा खेळती राहील.
- लोकवस्ती व सार्वजनिक पाण्याच्या स्रोतापासून किमान ५०० मीटर लांब असावी.
- शेडसाठीची जागा पूर्व-पश्चिम लांबीची असल्यास उत्तम.
- रस्ता, वीज व मुबलक पाण्याची उपलब्धता तपासावी. परिसरामध्ये सावलीसाठी झाडे असावीत.




## शेड बांधणीचे तांत्रिक निकष

उत्तम उत्पादनासाठी शेडचे बांधकाम खालीलप्रमाणे असावे:

- ❑ कडक ऊन व वाऱ्याचा थेट मारा टाळण्यासाठी शेडची लांबी पूर्व-पश्चिम असावी.
- ❑ पाया जमिनीखाली व वर किमान २.५ ते ३ फूट असावा. फरशी सिमेंट काँक्रीटची असावी, जेणेकरून उंदीर व मुंगसांचा उपद्रव होणार नाही. पाण्याचा निचरा होण्यासाठी जमिनीला हलका उतार द्यावा.

## आकारमान

**रुंदी:** २६ ते ३० फूट.

**लांबी:** पक्षांच्या संख्येनुसार ५० ते ५०० फुटांपर्यंत.

**जागा:** सुधारित गावरान पक्षांसाठी १.२ ते १.५ चौ. फूट, तर ब्रॉयलरसाठी १ ते १.२ चौ. फूट प्रती पक्षी जागा ठेवावी.


- ❑ बाजूची भिंत केवळ १ फूट उंचीची असावी, जेणेकरून हवा खेळती राहून 'लिटर' (खत) कोरडे राहील. भिंतीवर ८ ते १० फूट उंचीची १६-२० गेजची मजबूत GI जाळी बसवावी.
- ❑ मध्यभागी उंची १०-१२ फूट व बाजूला ८-१० फूट असावी.
- ❑ असबेस्टोसचे पत्रे अधिक टिकाऊ व उष्णतारोधक ठरतात. पावसाचे पाणी आत येऊ नये म्हणून पत्रे भिंतीच्या बाहेर ३-४ फूट काढावेत.
- ❑ शेडमध्ये उंचीवर स्वयंचलित टाकी बसवावी. बाहेर असल्यास तिला सावली करावी.

### फार्ममधील आवश्यक पायाभूत सुविधा

मोठ्या प्रमाणावरील व्यवसायासाठी शेडसोबतच खालील व्यवस्था असणे गरजेचे आहे:

- भांडारगृह: खाद्याची भांडी, औषधे, वजन काटा व इतर साहित्यासाठी (१०,००० पक्षांमागे साधारण ५०० चौ. फूट).
- खाद्यभांडार: किमान ५-७ दिवस पुरेल इतका खाद्यसाठा करण्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित गोडाऊन.
- विल्हेवाट खड्डा: मृत पक्षांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी शेडपासून दूर बंदिस्त खड्डा असावा.
- कामगारांसाठी निवास व्यवस्था, कार्यालय व संपूर्ण फार्मला सुरक्षित कुंपण असणे आवश्यक आहे.
- नियोजनबद्ध शेड केवळ पक्षांचे संरक्षण करत नाही, तर पशुपालकाचा नफा वाढवून व्यवसायाला स्थिरता देते.



महापशुधन वार्ता

# पशुधन जनुकीय संसाधने : अपरिचित, अल्पज्ञात व नवओळख प्राप्त जातींच्या संदर्भात





**डॉ.पंडीत नांदेडकर**
**सहयोगी प्राध्यापक**
**पशु अनुवंश व पैदास विभाग समन्वयक,**
**परभणी पशुवैद्यकीय महाविद्यालय**

**उच्च जैवविविधता असलेली पशुधन जनुकीय संसाधने अन्नसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची असून, कृषीस अयोग्य अशा पर्यावरणीय परिस्थितीचा उपयोग करण्यासाठी, उत्पादन प्रणालीतील बदलांना सामोरे जाण्यासाठी, येणाऱ्या हवामान बदलांना प्रतिसाद देण्यासाठी, नवीन रोगांच्या उद्रेकास तोंड देण्यासाठी तसेच बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी अत्यावश्यक आहेत. पशु हे कृषी परिसंस्थेचा अविभाज्य घटक असून ते अन्न, तंतू (लोकर), शेणखत व इंधन पुरवतात. पशुधन जनुकीय संसाधने अन्न व कृषी उत्पादनात मोलाची भूमिका बजावतात; तथापि, ही संसाधने सध्या गंभीर संकटात सापडलेली आहेत. महत्त्वाची जैवविविधता वेगाने नष्ट होत असून त्यामुळे शाश्वत शेती व अन्नसुरक्षा साध्य करण्यासाठी उपलब्ध पर्याय मर्यादित होत आहेत. पशुधन जैवविविधतेचा ऱ्हास झाल्यास पशुपालन क्षेत्राची शाश्वतता तसेच बदलत्या पर्यावरणीय परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता धोक्यात येते.**

ज्या पशुधनसंख्यांचे अद्याप शास्त्रीय स्वरूपात वर्णन, वैशिष्ट्यीकरण व अधिकृत मान्यता झालेले नाही, त्यांना सामान्यतः **"अनिर्दिष्ट** (Non-descript)" असे संबोधले जाते. यामध्ये विविध जातींचे मिश्रण असलेल्या किंवा अद्याप अभ्यास व वर्णन न झालेल्या पशुधन समूहांचा समावेश होतो. तथापि, काही पशुधन समूह असे असू शकतात की जे विशिष्ट, स्थिर व ओळखण्याजोग्या बाह्य वैशिष्ट्यांच्या आधारे इतर लोकसंख्यांपासून वेगळे ओळखता येतात आणि स्वतंत्र जाती किंवा उपजाती म्हणून मान्यता देण्यास पात्र ठरतात. अशा पशुसंख्यांचा पुरेसा शास्त्रीय अभ्यास झालेला नसून त्यांचे दस्तऐवजीकरणही अपुरे आहे; त्यामुळे त्यांना **"अल्पज्ञात** (Lesser-known) ...

**पशुसंख्या"** असे संबोधले जाते. जागरूकतेचा अभाव आणि शिस्तबद्ध वैज्ञानिक अभ्यास नसल्यामुळे या अल्पज्ञात लोकसंख्यांकडे दुर्लक्ष झाले असून त्यांना अनिर्दिष्ट पशुसंख्या म्हणून गणले गेले आहे. स्थानिक पशुधन जनुकीय संसाधनांच्या ऱ्हासाची व विकासातील अडथळ्यांची प्रमुख कारणे म्हणजे त्यांचे योग्य वर्णन व वैशिष्ट्यीकरणाचा अभाव, तसेच प्रभावी प्रजनन व संवर्धन धोरणांचा अभाव. सन २००८ पासून ICAR-NBAGR ने आतापर्यंत (२०२५) राष्ट्रीय पातळीवर एकूण २४६ पशुधन जाती नोंदविल्या गेल्या आहेत.

सन २००८ पासून ICAR-NBAGR ने २०२५ पर्यंत राष्ट्रीय पातळीवर एकूण **२४६ पशुधन जाती** नोंदविल्या गेल्या आहेत.

| प्रजाती, दि.१४.०१.२०२६ | संख्या |
|---|---|
| गाय (Cattle) | ५५ |
| म्हैस (Buffalo) | २२ |
| शेळी (Goat) | ४३ |
| मेंढी (Sheep) | ४६ |
| उंट (Camel) | ९ |
| घोडा व टट्टू (Horse & Pony) | ८ |
| डुक्कर (Pig) | १५ |
| गाढव (Donkey) | ४ |
| कोंबडी (Chicken) | २१ |
| याक (Yak) | २ |
| मिथुन (Mithun) | १ |
| बदक (Duck) | ९ |
| हंस (Geese) | २ |
| कुत्रा (Dog) | ५ |
| एकूण (Total) | २४६ |

## महाराष्ट्रातील पशुधन

- **गाय :** लाल कंधारी, देवणी, खिलार, गवळाऊ, डांगी, कोकण कपिला, कठानी
- **म्हैस :** मराठवाडी, पंढरपुरी, नागपुरी, पूर्णाथडी, मेळघाटी
- **मेंढी :** डेक्कनी
- **शेळी :** उस्मानाबादी, संगमनेरी, बेरारी, कोकण कन्याळ
- **डुक्कर :** करकांबी
- **घोडा :** भीमथडी
- **कोंबडी :** बसरा



महाराष्ट्र राज्यात सध्या विविध पशुधन प्रजातींच्या एकूण **२० मान्यताप्राप्त जाती** उपलब्ध असून, यावरून राज्यातील पशुधन जनुकीय संसाधनांची समृद्ध विविधता स्पष्ट होते. मात्र, याशिवाय अनेक **अल्पज्ञात पशुसंख्या व प्रादेशिक वैशिष्ट्ये असलेल्या विविध उपजाती** अस्तित्वात आहेत. यापैकी अनेक लोकसंख्या संख्यात्मक दृष्ट्या घटत असून, त्यांचे शास्त्रीय वैशिष्ट्यीकरण होण्यापूर्वीच त्या नामशेष होण्याची शक्यता आहे. काही अल्पज्ञात पशुसंख्या मोठ्या संख्येत अस्तित्वात असूनही, त्या स्थापित जातींच्या उपजाती किंवा प्रकार मानल्या गेल्यामुळे त्यांना स्वतंत्र जाती म्हणून मान्यता मिळालेली नाही. या संदर्भात वैशिष्ट्यीकरण व नोंदणीसाठी अत्यंत मर्यादित प्रयत्न झाले आहेत. निश्चित जातींच्या मुख्य प्रजनन क्षेत्राबाहेरही अशा अनेक पशुसंख्या आढळण्याची शक्यता आहे. काही लोकसंख्या पशुपालकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असून, त्यांनी त्यांच्या पारंपरिक प्रजनन क्षेत्रातून मान्यताप्राप्त जातींची जागा घेतली आहे. तथापि, या अल्पज्ञात पशुसंख्येच्या बाह्य वैशिष्ट्यांबाबत अपुरी व त्यांच्या उत्पादन व प्रजनन क्षमतेविषयी शास्त्रीय माहिती उपलब्ध नाही, कारण त्यांना अद्याप अनिर्दिष्ट गटातच समाविष्ट केले जाते.

## महाराष्ट्रातील कमी परिचित / नोंदणी न झालेल्या अनोंदणीकृत पशुधन जाती:

| अ. क्र. | प्रजाती | कमी परिचित पशुधन / स्थानिक वाण |
|---|---|---|
| १ | गाय | मथुरा लभाण, खामगाव, सोनखेरी, उमरडा/बंजारा, पहाडी/धारणी, वऱ्हाडी, मोगलाई |
| २ | म्हैस | बेलोणा, एल्लीचपुरी, गोंडी, मेळघाटी, दुग्गळ |
| ३ | शेळी | कुही, उदगीरी |
| ४ | मेंढी | माडग्याळ, बेरारी / पहाडी |
| ५ | डुक्कर | घुबरी, माडी |
| ६ | घोडा | ढाणगरी |
| ७ | गाढव | गोदाथाडी, कैकाडी / दख्खनी, मराठवाडा |
| ८ | कोंबडी | भेरड, सातपुडा |
| ९ | कुत्रा | करवान, जाणवळ पश्मी |

## भारतामधील पशुधनसंख्येची गतीशीलता व प्रवृत्ती

भारतामधील एकूण पशुसंख्या (२० वी पशुगणना, २०१९) ५३५.७८ दशलक्ष इतकी असून, २०१२ मधील पशुगणनेच्या तुलनेत ४.६% वाढ दर्शविते. भारताने आंतरराष्ट्रीय पशुधन जनुकसाठ्याच्या समृद्धीत व जागतिक पशुधन उत्पादन सुधारण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतास समृद्ध देशी पशुधन जैवविविधतेचे वरदान लाभले असून, सध्या २४६ नोंदणीकृत देशी पशुधन जाती अस्तित्वात आहेत. देशातील एकूण पशुसंख्येपैकी सुमारे २० ते २५ टक्के पशुधन हे चांगल्याप्रकारे वर्णन व मान्यता प्राप्त जातींचे असून, उर्वरित मोठा हिस्सा अद्याप नॉन-डीस्क्रीप्ट देशी पशुधनाचा आहे, ज्यांचे शास्त्रीय वैशिष्ट्यीकरण अद्याप झालेले नाही.

## भारतातील एकूण पशुधन लोकसंख्येमधील प्रमुख प्रजाती वत्यांचे महत्त्व

भारतामधील एकूण पशुधनामध्ये प्रमुख प्रजातींचा वाटा पुढीलप्रमाणे आहे : गाय (३५.९४%), म्हैस (२०.४५%), शेळी (२७.८०%), मेंढी (१३.८७%), डुक्कर (१.६९%) आणि इतर प्रजाती (०.२३%). देशामध्ये जगातील सर्वाधिक म्हैस लोकसंख्या असून, गायी व शेळ्यांच्या लोकसंख्येमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. मेंढ्यांच्या बाबतीत भारत तिसऱ्या, बदकांच्या बाबतीत चौथ्या, कुक्कुटपालनाच्या बाबतीत पाचव्या, तर उंटांच्या लोकसंख्येमध्ये सहाव्या क्रमांकावर आहे.





२०१८-१९ या वर्षात पशुधन क्षेत्राने १८७.७ दशलक्ष मेट्रिक टन दूध, १०३.३२ अब्ज अंडी, ८.१ दशलक्ष मेट्रिक टन मांस आणि ४०.४२ दशलक्ष किलोग्रॅम लोकर उत्पादन केले (BAHS, २०१९). पशुधन क्षेत्र हे बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे उपजीविकेचे साधन असून, ते शेतीला आवश्यक घटक पुरवून पाठबळ देते, पोषण व आरोग्य सुधारण्यास मदत करते, उत्पन्नात वाढ करते तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते. अलिकडच्या वर्षांमध्ये भारतातील पशुधन क्षेत्राचा सरासरी वार्षिक वाढीचा दर सुमारे ७-८% इतका असून, तो पीक शेती क्षेत्राच्या वाढीच्या दरापेक्षा (सुमारे ३-४%) लक्षणीयरीत्या अधिक आहे.

## महत्त्वाचे ठळक मुद्दे

- ❖ कृषी सकल देशांतर्गत उत्पादनातील (Agricultural GDP) योगदान: ~ 30–31%
- ❖ राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनातील (National GDP) योगदान: ~ 4.5–5%
- ❖ दूध उत्पादनातील वार्षिक वाढ: ~ 6–7%
- ❖ अंडी उत्पादनाल वार्षिक वाढ: ~ 7–8%
- ❖ मांस उत्पादनातील वार्षिक वाढ: ~ 6–7%
- ❖ एकूण पशुधन क्षेत्राचा वार्षिक वाढीचा दर: 7–8%

**सीमांत, लहान व अर्ध-मध्यम भूधारक शेतकरी (4 हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रधारणा असलेले) एकूण पशुधनापैकी सुमारे 87.7% पशुधनाचे मालक आहेत. त्यामुळे पशुधन क्षेत्राचा विकास झाल्यास तो सर्वसमावेशक ठरेल.**



# करडा-कोकरांची मरतूक: शेळी-मेंढी पालनातील सर्वात मोठे आव्हान



राज्यातील शेळी-मेंढीपालन व्यवसाय हा शेतीला पुरक व्यवसाय म्हणनू किफायतशीर ठरलेला आहे. पशुपालन व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा भाग आहे; कारण राज्यातील 70% लोकसंख्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबनू असून त्याला पशुपालनाची जोड आहे. शेळी-मेंढीपालन व्यवसाय प्रामुख्याने दुष्काळी व निमदुष्काळी भागात मोठ्या प्रमाणात केला जातो. शेळी-मेंढीपालन व्यवसायामध्ये पशुपालाकांस मिळणाऱ्या उत्पन्नात सर्वात वाटा हा करडे-कोकरे यांची विक्री हा असतो. लेंडी खत, दूध व कातडी यांच्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यंत नगण्य असते. त्यामुळे शेळी-मेंढी पालकांच्या प्रक्षेत्रावर निर्माण झालेली करडे कोकरे ही सुदृढ, सशक्त व निरोगी असणे आवश्यक आहे.




**डॉ. सचिन दडस,**
**प्रक्षेत्र व्यवस्थापक,**
**पु.अ.मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, रांजणी, सांगली**



**डॉ. अंबादास मडकर**
**(पीएच.डी.),**
**पविअ (गट-अ),**
**सांगली**


करडा-कोकारांची मरतूक खूप मोठ्या प्रमाणात झाल्यास मोठा तोटा सहन करावा लागतो व व्यवसाय बंद होण्यास ही मरतूक कारणीभूत ठरते. करडे कोकरे हा एकच मुख्य उत्पादनाचा स्रोत आहे. भारतामध्ये सरासरी २०% करडांची मरतूक होते व त्यांची संख्या जवळपास १० ते १२ मिलियन प्रती वर्ष इतकी आहे. यामुळे प्रती पशुपालक प्रती वर्ष रक्कम १४ ते १५ हजार रुपये इतके नुकसान होत असल्याचे वास्तव या व्यवसायात आहे.



करडे-कोकरे यांच्यामध्ये जन्मतः कमी प्रमाणात उर्जा उपलब्ध असणे, करडे कोकरे जन्मतःचे प्रथम दुध (कोलोस्ट्रम) न पिणे किंवा उपलब्ध न होणे, शेळीला दूध नसणे किंवा कमी असणे, करडा-कोकारांची रोगप्रतिकारक क्षमता कमी असणे, करडे कोकरे वजनाने लहान असतात; परंतु त्यांचेपृष्ठभाग क्षेत्र जास्त त्याची काळजी घेण्यासाठी जास्त प्रमाणत उर्जा जास्त प्रमाणत आवश्यक असते. मात्र, करडा-कोकरांकडे उपलब्ध ऊर्जा कमी असते. व्यवस्थापनातील त्रुटी, साथीचे व संसर्गजन्य आजार इ. बाबींमुळे करडा-कोकरांमध्ये मरतूक जास्त प्रमाणावर होते.

### करडां-कोकरांच्या मरतुकीसाठी जबाबदार घटक:-

#### शेळ्या-मेंढ्याकडील (माता) जाबाबदार घटक :-

प्रथम गाभ असलेल्या शेळ्यांमध्ये भृणाचे योग्य पद्धतीने पोषण होत नाही व त्यामुळे भृणाची वाढ होत नाही व त्यांचे जन्मतः वजन कमी असते. अशी करडे-कोकरे आजाराला व वातावरणातील बदलांना लवकर बळी पडतात व व त्यांचा मृत्यू होतो. काही शेळ्या-मेंढ्या या नवजात पिल्लांना स्वतःहून दूध पाजत नाहीत (पिल्ले टाकून देतात). त्यामुळे करडांना पोषण मिळत नाही. काही शेळ्या-मेंढ्या विल्यानंतर त्यांना काही कारणांमुळे दूधच उपलब्ध होत नाही; त्यामुळे त्यांची पिल्ले उपाशी राहतात व मृत्यू पडतात.

#### करडां-कोकरांकडील जबाबदार घटक:-

रोग प्रतिकारक क्षमता कमी असणे व आजाराला लवकर बळी पडणे.

#### व्यवस्थापनातील जबाबदार घटक:-

यामध्ये निर्जंतुकीकरण व स्वछता, संगोपन पद्धती, निवारा व्यवस्थापन, खाद्य व्यवस्थापन व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची कमतरता याबाबी जबाबदार आहेत.

#### करडे-कोकरे मरतुकीची सर्वसाधारण कारणे

करडे-कोकरे मारतुकीच्या कारणांमध्ये मुख्यतः दोन प्रकारची करणे असतात एक म्हणजे संसर्गजन्य आजाराची लागण होणे आणि दुसरे असंसर्गिक कारणांमुळे होणारी मरतूक.

### रेचक / हागवण / अतिसार :-

**प्रादुर्भावः** हगवण ही विषाणू, जिवाणू, प्रोटोझोआ व जंत यांच्या संसर्गामुळे होते. यामध्ये प्रामुख्याने इ. कोलाई, सलमोनेल्ला, क्लोस्ट्रीडीअमचे जिवाणू, रोटाव्हायरस-बी, कोरोनाव्हायरस इ. चे विषाणू, क्रिपटोस्पोरीडीअम, कोक्सिडीया इ. प्रोटोझोआ व पोटातील पट्टकृमी, चपटेकृमी. गोलकृमी इ. प्रकारच्या जंत प्रादुर्भावामुळे जुलाब होतात. तसेच असंसर्गिक कारणांमुळे सुद्धा जुलाब होतात. त्यामध्ये पचणसंस्थेतील बिघाड, चिक/दुधाचे पचन न होणे, पोटात दुधाचे खडे / गाठी तयार होणे व अपचन इ. कारणे असतात.

**प्रसारः**-दुषित पाणी, शेळीच्या कासेवरील रोगजंतू, माती खाणे इ. यांच्यामार्फत होते. पांढऱ्या, हिरव्या, लाल रंगाचे जुलाब होणे. दूध न पिणे, पोट करडे-कोकरे मलूल होणे, ताप येणे इ. लक्षणे आढळून येतात.

**घरगुती उपायः**-कळकाचा पाला, बेल, डाळिंब साल. कात, बाभळीचा डिंक, बारीक करून दिवसातून दोन वेळेस पाजावे.

**उपचार:**- पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत.

**प्रतिबंधात्मक उपाययोजनाः**- करडे-कोकरे असणाऱ्या शेडचा पृष्ठभाग कोरडा व निर्जंतुक असावा. वेळोवेळी शेडचा पृष्ठभाग हा फ्लेम गनच्या सहाय्याने जाळून घ्यावा. पृष्ठभागावर वेगवेगळ्या जिवाणू, विषाणूनाशक औषधांची फवारणी करावी तसेच शेडच्या पृष्ठभागावर चुना व बीएचसी एकत्रित करून धुरळणी करावी. करडे-कोकरे दूध पिण्याच्या अगोदर शेळी-मेंढीची कास निर्जंतूक करावी. दूध पिल्यानंतर करडा-कोकरांना बाहेरून फिरवून आणावे, जेणेकरून त्यांच्या पोटातील दुधाचे पचन होईल. वयोमानानुसार वेगवेगळे गट करावेत.

**फुफ्फुसदाह (न्यूमोनिया)**

**प्रादुर्भावः**-जिवाणू, विषाणू, मायकोप्लासमा, लाळखुरकूत, देवी, वातावरणातील बदल, थान तुटीचा तान, जन्मतः अशक्त करडे कोकरे, कमी जागेत जास्त करडे कोकरे ठेवणे. ३महिन्यावरील करडे जास्त बळी पडतात इ.

**प्रसारः**- हवा, पाणी, दुषित वातावरण, खाद्य द्वारे होतो.

**लक्षणे:**- नाकातून पातळ व चिकट स्राव येणे, शाररीक तापमान १०४ ते १०५ अंश F होणे, डोळे चीपडणे, तोंडावाटे फेस येणे, श्वास घेण्यास अडथळा येणे, श्वास घेतांना घरघर आवाज येणे, ठसकने इ. लक्षणे दिसतात.

**घरगुती उपायः**- कापूर, पुदिना, निलगिरी तेल / कारज तेल पाण्यात टाकून वाफ देणे, पोटाशियम परमाग्नेट च्या द्रावणानेनाक व तोंड स्वच्छ धुवून घेणे. कापसाच्या बोळ्याने दोन्ही नाकपुड्यांनाकरंज तेलाचा वास देणे. अडुळसा. तुळस, कंठ्ङ्करी, काळे मिरे व अद्रक एकत्र करून दिवसातून दोनवेळा पाजणे.

**उपचार:**- प्रतिजैविके व इतर औषध उपचार हे पशुवैद्यकांच्या सल्ल्याने करावेत.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना:** तणावाचे व्यवस्थापन करावे. रोगप्रतिकार क्षमता वाढविणारी औषधे वापरावीत, आजारी शेळ्या-मेंढ्या वेगळ्या ठेवाव्यात.

**नाळेमुळे येणारा संसर्ग (सांधे सुजणे व धनुर्वात)**

नवजात करडे - कोकरे यांच्यामध्ये नाळ ही जंतुसंसर्गाचे प्रभावी माध्यम आहे. त्याद्वारे वेगवेगळ्या रोगजंतूचा संसर्ग होतो. संसर्ग झालेल्या करडे-कोकरांची सर्वप्रथम नाळ सुजते व ते रोगजंतू पिल्लांच्या शरीरात प्रवेश करतात. त्यानंतर ते रोगजंतू करडा-कोकरांच्या सांध्यामध्ये संसर्ग करतात व त्यामुळेसांधे सुजतात. अनेकदा यकृतदाह होवून मरतूक होते. त्याचबरोबर नाळेवाटे धनुर्वाताचेसुद्धा जिवाणू पिल्लांच्या शरीरात प्रवेश करतात व त्यामुळे त्यांना धनुर्वात होवून मरतूक होते. संसर्ग झालेल्या करडे-कोकरे यांच्यामध्ये पशुवैद्यकांच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावेत. नाळेवाटे संसर्ग टाळण्यासाठी नाळ आयोडीन किंवा इतर जंतुनाशकांनी निर्जंतूक करुन दोऱ्याच्या सहाय्याने घट्ट बांधून ठेवावी.



*** विटामीन- इ / सेलेनीयमची कमतरता:**

- काही पिल्लांमध्ये विटामीन- इ / सेलेनीयम यांच्या कमतरतेमुळे स्नायूंचा ह्रास होतो, त्यामुळे स्नायू जखडले जातात व मागील पायाने चालता येत नाही.
- अत्यंत सशक्त करडे-कोकरे जास्त लांब चालून आल्यावर त्यांचा अचानक मृत्यू होतो.
- या विकारामध्ये हृदयाचे स्नायूसुद्धा कमकुवत होतात व त्यामुळे करडे-कोकरे हृदयविकाराच्या झटक्यानेही मरण पावतात.
- विटामीन- इ ची कमतरता भरून काढण्यासाठी औषधे वेगवेगळ्या माध्यमातून देण्यात यावीत.

*** कॅल्शिअमची कमतरता असणे / करडे-कोकरे थंड पडणे:**

- काही शेळ्या-मेंढ्यांना दूध कमी प्रमाणत उपलब्ध असणे, प्रसुतीदरम्यान शेळी-मेंढीचा मृत्यू होणे. शेळी-मेंढीला कॅल्शिअमची कमतरता असणे इ. कारणांमुळे काही करडे-कोकरे यांना चिकावाटे /दुधावाटे पुरेशा प्रमाणात कॅल्शिअम मिळत नाही, त्यामुळे त्यांच्या शरीरात कॅल्शियमचा अभाव दिसून येतो.
- यामध्ये करडे-कोकरे त्यांचे शारीरिक तापमान सामान्य राखू शकत नाहीत, त्यामुळे त्यांचे शरीर थंड पडते. काही करडे दूध पित नाहीत.
- अशा करडांना ऊर्जा मिळण्यासाठी औषधे पाजण्यात यावीत, तसेच तोंडावाटे कॅल्शियमची औषधे पाजण्यात यावीत.

**शेडमध्ये वातावरण उबदार राहील याची काळजी घ्यावी.**

## पोलिओ एन्सेफ्यालोमयलेसिया

- मज्जासंस्थेशी निगडीत आजार असून Vit. B-१ (थायमिन) या जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे होतो.
- पिल्लांमध्ये हा आजार जास्त दिसतो कारण कोठीपोट एक वर्षापर्यंत पूर्णता कार्यान्वित झालेले नसते त्यामुळे बी-समूहातील जीवनसत्वे तयार होत नाहीत.
- करडे जन्मानंतर सुरुवातीला पशुखाद्य किंवा हिरवा चारा खाण्यास सुरुवात करतात.
- गंधकयुक्त खाद्य जसे लसूनघास, गुळ किंवा काकवी असलेले पशुखाद्य जास्त प्रमाणात दिल्यास,
- शेळ्यांच्या आहारात कोबी, मोहरी व तेलबिया जास्त प्रमाणात दिल्यास,



- कोणत्याही कारणामुळे किंवा आजारामुळे चारा खाणे बंद झाल्यामुळे कोटीपोटाचे कार्य मंदावते.
- खाद्यामध्ये अचानक बदल झाल्यास नवीन खाद्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी साधारणपणे ७ ते १० दिवसांचा वेळ लागतो. त्यामुळे अचानक खाद्यामध्ये बदल झाल्यास कोठीपोटाचे कार्य मंदावते.
- जंतनाशक औषध (लिवामिसोल) तसेच अमप्रोलीअम यामुळे बी-१ जीवनसत्वाची कमतरता निर्माण होते.

**लक्षणेः**

- करडे-कोकरे अशक्त होऊन मलूल होतात आणि खाणे-पिणे बंद करतात.
- चेतासंस्थेशी संबंधित लक्षणे जसे कि चालताना तोल जाणे, चक्कर येणे, दात खाणे इ. आढळतात.
- मागील पायामध्ये अशक्तपणा येतो, त्यामुळे पुढील पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करतात.
- मानेचे स्नायू ताठर झाल्यामुळे जनावरे मान शरीराच्या वरील बाजूस ठेवतात; जेणेकरून शेळ्या आकाशाकडे बघत असल्याच्या स्थितीमध्ये दिसतात. त्यालाच "स्टार ग्रेझिंग स्थिती" असे म्हणतात.



- आजारी करडे बहुतांश अंशत:-पूर्णत: अंध होतात.
- वेळेत उपचार न झाल्यास मृत्यूची शक्यता असते.

**उपचार:**

- थायमिन १० ते १२ mg याप्रमाणे दिल्यास उपचाराला प्रतिसाद मिळतो.
- प्रोबायोटिक्स दिल्यास कोठीपोटामधील सूक्ष्मजीवांचा समतोल राखण्यास मदत होते.

**प्रतिबंधात्मक उपायः**

- एक ते दोन महिने वयानंतर करडाना थायमिन या जीवनसत्वाचा समावेश असेल, अशा B Complex मधील जीवनसत्वे देण्यात यावीत.
- तंतुमय पदार्थाचा समावेश असलेल्या खाद्य घटकांचा खाद्यामध्ये वापर करावा.
- गंधकाचे प्रमाण जास्त असलेले खाद्य / पाणी टाळावे.
- खाद्य व खुराक बुरशीमुक्त असल्याची खात्री करावी.

**करडे-कोकरे मलूल होणे / लुळे पडणे**

- ३ ते १४ दिवस वयोगटात याचे प्रमाण दिसून येते.
- काही पिल्लांमध्ये पिलेल्या चिकाचे किंवा दुधाचे पचन होत नाही व त्यामुळे त्यांना पोटात आम्लाचे प्रमाण वाढते. शरीरातील पाण्याचे प्रमाण काही होत नाही.
- करडे-कोकरे शांत एका जागी बसून रहाणे, चाल मंदावणे, दूध न पिणे, अशक्तपणा, स्नायू कमकुवत होणे, भेलकांडणे, तापमान कमी होणे (९०°F), कान व पाय थंड पडणे अशी लक्षणे दिसून येतात.
- लवकर औषधोपचार केला नाही तर करडे-कोकरे बेशुद्ध होऊन २४ ते ३६ तासांत मृत्युमुखी पडतात.
- आजारात करडा-कोकरांना जुलाब होत नाही, त्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत नाही.
- खाण्याचा सोडा २.५ ते ३ ग्राम व खाण्याचे ते तीन दिवस पाजल्यास उपयुक्त ठरते.
- पुढील २४ तास दूध पाजू नये, त्याऐवजी मिल्क रिप्लेसर/ग्लुकोज पाणी/ इलेक्ट्रोलाईट देण्यात यावे.
- इतर उपचार पशुवैद्यकाच्या सल्ल्याने करावेत.

**करडा-कोकारांमधील संसर्गजन्य / साथीचे आजार**

*** अंत्रविशारक / अतिखाद्य आजार**

- ❖ हिरवे गवत जास्त प्रमाणत खाणे. दूध जास्त पिणे यामुळे हा आजार उद्भवतो.
- ❖ यामध्ये सर्व वयोगटातील करडे कोकरे बळी पडतात. काही करडे २ ते १२ तासांच्या आत मारून पडतात. अशावेळी जोरदार पोटदुखी होते व मज्जासंस्थेच्या बिघाडाची लक्षणे दाखवतात व त्यांचा मृत्यू होतो.
- ❖ काही करडे-कोकरे २ ते ४ दिवस आजारी, त्यामध्ये ते पोटदुखी व रक्तीजुलाब अशी लक्षणे दाखवतात.
- ❖ औषध उपचाराचा जास्त उपयोग होत नाही.
- ❖ लसीकरण करून घेणे.




**लाळ खुरकूत**

❖ हा विषाणूजन्य रोग असून, पिल्लांमध्ये मोठ्या प्रमाणात मरतूक होते.
❖ शारीरिक तापमानात वाढ होते.
❖ याचा संसर्ग दूध, पाणी, लाळ व हवेमार्फत होतो.
❖ करडे लक्षण न दाखवता तत्काळ मरून पडतात.
❖ शेळीला लसीकरण करणे आवश्यक आहे.
❖ लसीकरणामुळे पिल्लांना सहा महिन्यांपर्यंत रोगप्रतिकार क्षमता लाभते.

**शेळ्यांचा प्लेग (पीपीआर)**

❖ महाभयंकर विषाणूजन्य व संसर्गजन्य रोग आहे.
❖ जवळ-जवळ ९०% पशुधनाची मरतूक होते.
❖ वाहतूक, पशुधनाची गर्दी, अचानक वातावरण, खाद्य, पाणी यांमध्ये बदल झाल्याने, रोगप्रतिकारक क्षमता कमी झाल्याने उद्भवतो.
❖ उच्च शारीरिक तापमान, पातळ जुलाब, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन अशक्तपणा येणे, खाल्लेल्या अन्नाचे अपचन होणे, ओठांच्या बाहेरील व आतील बाजूस जखमा होणे, जिभेला जखमा होणे, नाकातून चिकट स्त्राव येणे, डोळे चीपडणे, जनावरे ओल्या ठिकाणी बसण्याचा प्रयत्न करणे, जनावरे विव्हळणे इ. लक्षणे आढळतात.
❖ यासह इतर जीवाणूजन्य आजाराची लागण होते.
❖ पशुधनामध्ये लागण झाल्यापासून २४ ते ३६ तासांच्या आत मरतूक होते.
❖ उपचारास प्रतिसाद देत नाहीत.
❖ पीपीआर रोगाचे लसीकरण करून घेणे हाच एकमेव प्रभावी उपाय या रोगावर आहे.

***मवा (Contageous Ectyma / Orf)**

❖ हा विषाणूजन्य आजार आहे.
❖ जवळपास ९० टक्के करडे कोकरे बळी पडतात.
❖ तोंडाला जखमा होतात. खपल्यांमध्ये या रोगाचे विषाणू असतात.
❖ जखमांच्या खपल्यांमार्फत रोगप्रसार होतो.
❖ करडा-कोकरांना दूध पिता येत नाही व चारा खाता येत नाही, त्यामुळे उपासमार होऊन मरतूक होते.
❖ जखमा निर्जंतूक करून प्रतीजैविक मलम लावणे. असाडी होऊ नये यासाठी औषधांचे स्प्रे मारणे.
❖ आजारी करडे-कोकरे हे निरोगी करडे-कोकरापासून वेगळी ठेवणे.

- गाभण शेळ्यांचे जंतनिर्मुलन करुन त्यांना वेळापत्रकानुसार वेगवेगळ्या आजारांचे व साथीच्या रोगांचे लसीकरण करून घ्यावे त्याचा फायदा करडे-कोकरे यांना जन्म झाल्यानतर सहा महिन्यांपर्यंत होतो. करडा-कोकरांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.
- गाभण शेळ्या-मेंढ्याचे कळप हे वेगळे असणे आवश्यक असून त्यांना स्वच्छ पाणी, खुराक व मुबलक प्रथिनेयुक्त चारा द्यावा.

**नवजात करडे-कोकरे व्यवस्थापन**

- करडे-कोकरे जन्म होताच शेळी-मेंढी त्यांना चाटते. चाटल्यानंतर पिल्लेकोरडी होतात व त्यांच्या त्वचेखालील रक्ताभिसरण जलद गतीने होऊन त्यांना उबदारपणा जाणवतो.
- शेळी-मेंढीच्या पिल्लांना चटण्यामुळे व वासामुळे त्यांच्यामध्ये "माता-पिल्लू" असे नातेसंबंध तयार होवून त्या शेळ्या आपल्या पिल्लांना संगोपन करतात व अनेक पिल्लांमधून नेमके आपल्या पिलांना ओळखतात.
- काही शेळ्या- मेंढ्यांमध्ये काही कारणांमुळे "माता-पिल्लू" हा नातेसंबंध तयार होत नाही त्यामुळे पिल्ले एकाकी पडतात व त्यांचे संगोपन करण्यासाठी शेतकऱ्यांना जास्त कष्ट घ्यावे लागतात जसे कि, त्यांना दूध पाजणे, उबदार वातावरण उपलब्ध करून देणे इ.
- "माता-पिल्लू" हा नातेसंबंध तयार होण्यासाठी त्यांना तीन ते चार दिवस एकत्र एकांतात ठेवावे.

**चिक दूध :-**

- नवजात पिल्लांमध्ये जन्मानंतर पहिले सहा तास पुरेल एवढीच उर्जा असते. त्यासाठी त्यांना चिक दूध पिणे अत्यंत आवश्यक आहे.
- जन्म झाल्यानंतर जास्तीत जास्त १० ते २० मिनिटांमध्ये उभा राहतात व ते शेळी-मेंढीच्या कासेकडे जातात आणि चिक दूध पितात.
- शेळी-मेंढी स्वतः चिक दूध पाजण्यास तयार नसतील तर त्यांना पकडून पाजण्यात यावे किंवा बाटलीमध्ये काढून पाजण्यात यावे.
- चिक दूध हे कराडच्या वजनाच्या १० % पाजण्यात यावे.
- चिक पुरेशा प्रमाणत उपलब्ध होत नसेल तर इतर शेळी, मेंढी किंवा गाय यांचा चिक पाजावा.
- ७०० मिली गाईचे दूध, एक अंडे, एक चमचा तेल व एक मोठा चमचा साखर यांच्या मिश्रणातून कृत्रिम चिक दूध तयार करता येते.
- चिक दूध पाजल्याने पिल्लांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते, शरीरास उर्जा उपलब्ध होते. अन्यथा पिल्ले ऊर्जेच्या अभावी थंड पडतात, कॅल्शिआमची कमतरता निर्माण होते व मृत्यू पावतात.



## दूध, खाद्य व हिरवा चारा व्यवस्थापन:

| वय | दूध (मिली) | पशुखाद्य (क्रिप फीड) | चारा (हिरवा/सुका) |
|---|---|---|---|
| १ ते ३ दिवस | चिक ३०० मिली, दिवसातून ३ वेळा | -- | -- |
| ४ ते १४ दिवस | ३५० मिली. दिवसातून ३ वेळा | -- | -- |
| १५ ते ३० दिवस | ३५० मिली. दिवसातून ३ वेळा | ५० ग्रॅम प्रती करडू प्रती दिन | अल्प प्रमाणात |
| ३१ ते ६० दिवस | ४०० मिली. दिवसातून २ वेळा | १००-१५०ग्रॅम प्रती करडू प्रती दिन | मुबलक प्रमाणात |
| ६१ ते ९० दिवस | २०० मिली. दिवसातून २ वेळा | २००-२५०ग्रॅम प्रती करडू प्रती दिन | मुबलक प्रमाणात |

## क्रिप फीडमधील घटक व त्याचे प्रमाण:

| अ.क्र. | घटकाचे नाव | खाद्यातील प्रमाण % |
|---|---|---|
| १ | मका | ४० |
| २ | शेंगदाणा पेंड | ३० |
| ३ | गव्हाचा कोंडा | १० |
| ४ | तेलबियांचा तेल काढून उरलेला चोथा | १३ |
| ५ | मळी / गूळ | ५ |
| ६ | खनिज मिश्रण | २ |
| ७ | मीठ | १ |

हे खाद्य तयार करताना जीवनसत्वे अ, बी-२, ड-३, प्रतीजैविके, कॉक्सिडीआ प्रतिबंध औषधे इ. घटक मिसळावेत.


## लसीकरण वेळापत्रक:

| लसीचे नाव | प्रथम लस देण्याचे वय | लसीचा कालावधी |
|---|---|---|
| पीपीआर | तीन महिने | तीन वर्ष |
| आंत्रविषारक | तीन महिने (१४ दिवसांनी पुन्हा बुस्टर डोस) | १ वर्ष |
| देवी | तीन महिने | १ वर्ष |
| घटसर्प | तीन महिने | सहा महिने |
| लाळ-खुरकुत | तीन महिने | १ वर्ष |
| धनुर्वात | तीन महिने | १ वर्ष |



महापशुधन वार्ता

# उंट -गाढव अमूल्य दुधासाठी पाळीव जीवनधन !





प्राध्यापक डॉ. नितीन मार्कंडेय
माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक
(पशुप्रजनन शास्त्र विभाग) पशुवैद्यकीय
महाविद्यालय, परभणी मो. 9422657251

**वाळवंटी प्रदेशातील उपयुक्त जहाज असणारे उंट किंवा व्यवसाय गरजे पोटी सांभाळले आणि पाळले जाणारे गाढव, म्हणजे सहज दूध मिळण्याचाही फायदा. मानवी आहारात दूध सहज वापरला जाणारा भाग असल्यामुळे त्याची अधिकाधिक स्वस्तात, सहज आणि निर्भेळ उपलब्धता अपेक्षित असते. उंट आणि गाढव या प्राण्यांच्या दुधातील वैशिष्ट्ये सर्व दूर प्रसारित झाल्यास अशा दुधाला प्रचंड मागणी दिसून येणार आहे.**

मानवाने अनेक प्राणी पाळीव केले. आपल्या फायद्यासाठी त्यांची उपयुक्तता आपल्या जीवनात पडताळली, अनुभवली आणि टिकून ठेवली. प्रत्येक जीवनधनाकडून दूध नेहमी प्रसूतीनंतरच मिळते, त्याला उंट व गाढव हे प्राणी अपवाद नाहीत. नेहमीच गाय, म्हैस,शेळी यांच्याकडून सहज मिळणाऱ्या दुधामुळे इतर पाळीव प्राण्यांच्या दुधाबाबत सहसा माहिती नसते, मात्र ज्या मानवी समुहात नैसर्गिक गरजेप्रमाणे वेगवेगळे प्राणी पाळीव केले आहे, त्यांचेच दूध नियमित वापरले जाते.

## औषधी दूध उंटिणीचे

गतवर्ष आंतरराष्ट्रीय पातळीवर उंट समूहातील प्राण्यांचे वर्ष म्हणून साजरे केले गेले. कधीतरी अमूल कंपनीची जाहिरात वाचताना उंट दूध उपलब्ध असल्याचे कळू शकते. मात्र, उंटाकडून मिळणाऱ्या दुधाचे गुणधर्म सहज कळू शकत नाहीत. पौष्टिक व औषधी उंट दुधात ब आणि क जीवनसत्त्वाची मोठी मात्रा उपलब्ध असते. उपयुक्त स्निग्ध आम्ले व रोगप्रतिकारक्षमता वाढवणारे प्रथिन घटक म्हणजे लॅक्टोपेरिन व इमिनो ग्लोबलिन्स यांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता दिसून येते. मानवात गाईच्या दुधाला प्रतिरोध म्हणजे अलर्जी दिसून येते. दुधातील बीटा-लॅक्टोग्लोबिन यामुळे निर्माण होणारा प्रतिरोध असल्यास मानवासाठी दुसरा पर्याय म्हणजे उंटाचे दूध कारण; त्यात स्निग्धांशाची उपयुक्तता अधिक प्रमाणात असते.


उंटाच्या दुधात क्षार उपलब्धता प्रामुख्याने रक्तवर्धक घटकांची असल्यामुळे मानवी आरोग्यास फायदा होतो. लहान आकाराचे स्निग्ध पदार्थ मानवातील दूध पचनास पूरक ठरतात. दुधातील प्रथीनयुक्त घटकांमुळेच जिवाणू रोधक क्षमता, दाह रोधक क्षमता आणि बुरशी रोधक क्षमता नेहमी नेहमी मोठी असते. पाण्याचे अधिक प्रमाण असणारे उंट दूध गाईच्या दुधापेक्षा अधिक काळ टिकणारे दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी उपयुक्त ठरते. दुग्ध शर्करा- लॅक्टोज प्रतिरोध यावर उपाय म्हणून मानवासाठी उंटाचे दूध निसर्गाचे वरदान असते. मानवातील मधुमेह, स्वयम् मग्नता, प्रतिरोध, हृदयरोग, पचनदोष, रोग प्रतिबंध असमर्थता यासारख्या कारणात उंट दूध प्रभावी असल्याबाबत संशोधन सिद्ध झाले आहे. साधारणपणे, प्रसूतीनंतर एक ते तीन महिन्यात दूध उत्पादन सुरू होते. पाच लिटर ते वीस लिटर एवढ्या प्रमाणात उंट दूध दररोज प्राप्त होते. साधारणपणे नऊ ते १८ महिने दूध देण्याचे प्रमाण उंटात दिसून येते. वाळवंटात उपलब्ध असणाऱ्या चारा आणि पाणी यावर आधारित दुधाची प्रत याची प्रत थोड्याफार प्रमाणात बदलत राहते. कासेची रचना अगदी गायीप्रमाणे मात्र शरीराला अधिक चिकटल्यासारखे असते. उंट दूध मुलांची उंची वाढण्यास मदत होते. दूध दोहन उंट उभे असतानाच मानवासही उभे राहून एका मांडीवर भांडे ठेवून केले जाते, जिथे एकीकडून दूध काढले जाते तर दुसऱ्या बाजूने बछडा दूध पित असतो.



कुंभळगड उंट डेरी लोकहित पशुपालक संस्थान तर्फे सन २००८ मध्ये सुरू करण्यात आली असून, रुक्ष भागातील भटकंती करणाऱ्या उंट पालकांच्या कल्याणासाठी दूध वितरणाचा उपक्रम राबवण्यात येत आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या आखत्यारीत बिकानेर येथे केंद्रीय संशोधन संस्था- उंट सन १९८४ सालात स्थापन करण्यात आली. या संस्थेतर्फे उंटाची दूध पावडर तयार करण्याचे तंत्र २०२३ मधे देशात उपलब्ध करून देण्यात आले. संस्थेकडून मूल्यवर्धित दुग्ध पदार्थात चीज, योगर्ट, चॉकलेट, तूप यांची विक्री केली जाते. औषधी गुणधर्म असणारे आणि सुपर फूड म्हणून नावाजलेले उंट दूध सर्वत्र ऑनलाइन खरेदीसाठी उपलब्ध असून, एकदा तरी अनुभवणे निश्चित गरजेचे ठरते.

## सौंदर्यवर्धक दूध गाढविणीचे

नेहमी तरुण दिसण्याची असणं व जगण्याची हौस वाढवणं हा नेहमीच सर्वांच्या आवडीचा विषय असतो. त्यात स्वतःच सौंदर्य खुलावं, असं प्रत्येकाला वाटतं आणि त्यासाठी पर्याय उपलब्ध आहे गाढविणीचे दूध. मानवातील ॲसिडिटी, पोटातील पचनीय जिवाणू संवर्धन, खोकला आणि रोगप्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी गाढवीणीचे दूध उपयुक्त समजले जाते. अनादी कालापासून गाढविणीच्या दुधाची औषधी उपयुक्तता नोंद करण्यात आली आहे. त्वचारोग, अनाथ बालके, कुपोषित मुले यांच्यासाठी गाढविणीच्या दुधाचा मोठ्या प्रमाणात वापर अपेक्षित असतो.



भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अश्ववर्गीय राष्ट्रीय संशोधन संस्था, हिस्सार येथे गाढविणीच्या दुधावर संशोधन सुरू आहे. मात्र, आजपर्यंत भारतात मानवी आहारात अशा दुधाचा समावेश झालेला नाही. महेबूबनगर, तेलंगणा राज्यात खाजगी गाढव प्रक्षेत्र उभारण्यात आले आहे. गाढवीणीचे दूध अधिक शुभ्र पांढरे असून कमी प्रमाणात तयार होत असल्याने महाग असते. वैशाख महिन्यात म्हणजेच उन्हाळ्यात प्रसन्न असणारा प्राणी म्हणून वैशाखनंदिनी- जेनी म्हणजेच गाढविणीचे दूध सुपर टाॅनीक, सुपर कॉस्मेटिक समजले जाते. गाढविणीच्या दुधाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात जीवनसत्व व क्षार मोठ्या प्रमाणात असतात, तर दुधातील महत्त्वाचे प्रथिने केसिन आणि स्निग्ध पदार्थ अगदी कमी प्रमाणात आढळतात. गाढवणीच्या दुधातही जिवाणूंना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक घटक असल्यामुळे दुधात जिवाणूंचे प्रमाण अत्यंत कमी असते, मात्र तरीही गाढविणीचे दूध स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपायांसाठी उकळून वापरणे शिफारस केले जाते.




कासेच्या दोन ग्रंथी व त्यास जोडलेली सडे अशा लहान आकारातील कास गाढविणीत आढळते. प्रसूतीनंतर दोन ते अडीच लिटर उत्पादन असणारे दूध, नवजात शिंगरास पिल्यानंतर पहिल्या तीन महिन्यात दिवसातून तीन वेळा दोहन शक्य असते. कासेची साठवणूक क्षमता असल्यामुळे दिवसातून तीन वेळेस दोहन अपेक्षित असते. मात्र, त्यानंतर अर्धा ते दीड लिटर एवढे उत्पादन प्रमाण गाढवीणींमध्ये सहा ते सात महिन्यापर्यंत आढळते.

सौम्य अल्कली वर्गीय, कमी ऊर्जा कॅलरी आणि प्रथिने असणारे दूध दिसून येते. कोरडी पडणारी त्वचा यावर उपाय म्हणून गाढविणीच्या दुधाचा उपयोग सौंदर्य प्रसारण साधनातून मोठ्या प्रमाणात केला जातो. वाढत्या वयाचा त्वचेवर होणारा परिणाम आणि तीव्र सूर्यप्रकाशातून त्वचा भाजण्याची इजा टाळण्यासाठी गाढविण्याचे दूध जगभर वापरले जाते. कातडीला उपयुक्त ठरणारी सौंदर्य प्रसाधने हमखास गाढविणीच्या दुधाचा अंतर्भाव करतात. अत्यंत उपयुक्त औषधी गुणधर्मांकडे दुर्लक्ष करून सौंदर्य वृद्धिंगत करण्यास होणारा गाढविणीच्या दुधाचा वापर बदललेल्या काळाची पावले दर्शवतो.



# आनुवांशिकता




**जे पशुधन आपल्याकडे आहे त्यापासून अधिकाधिक उत्पादन मिळावे अशी प्रत्येक पशुपालकाची इच्छा असते आणि त्यासाठी पशुधनाच्या उत्पादन क्षमतेमध्ये सुधारणा करणे आवश्यक ठरते. शेतकरी बांधवांकडे असलेल्या पशुधनापासून दूध, मांस, अंडी इ. अनेक पशुजन्य उत्पादने मिळत असतात. आजच्या यांत्रिक युगातही, ग्रामीण भागात शेती संबंधीची पूरक कामे करण्यासाठी सुद्धा बैल, रेडे, गाढव यांसारख्या पशूंची 'कार्यशक्ती' वापरली जाते. अधिकाधिक दर्जेदार उत्पादन मिळविण्यासाठी पशुपालनात ज्या विविध पातळ्यांवर सुधारणा करावी लागते त्यात प्रामुख्याने व्यवस्थापन, आनुवंशिकता, पोषण, आरोग्य, उत्पादन निर्मिती प्रक्रिया अशा प्रमुख बाबींचा समावेश होतो.**



**डॉ. स्नेहल पाटील**
**पशुधन विकास अधिकारी,**
**विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, अकोला**

आनुवंशिक पातळीवरील सुधारणा ही सुजाण पशुपालकांसाठी महत्वाची ठरते. कारण आनुवंशिक सुधारणा ही पशुधनाच्या जनुकीय पातळीवर होत असून कायमस्वरूपी राहते. एका पिढीत झालेली सुधारणा आनुवांशीकतेने पुढल्या पिढीत हस्तांतरित होत असते. वासरांचे जन्मदाते असलेल्या गायी, वळू यांचेच गुणधर्म त्या वासरात उतरतात. आईवडीलांमधील गुणधर्म मुलांमध्ये येतात ह्याला 'आनुवांशिकता' म्हणतात. म्हणून आई-वडील म्हणजेच गाय व वळू ह्यांचात चांगले उत्पादनक्षम गुणधर्म असले तर वासरू / कालवड सुद्धा उत्पादनक्षम असते. मात्र पहिल्या पिढीतील जनावरांना चांगले व्यवस्थापन, आहार, आरोग्य देऊ केले तरी पुढील पिढीतील वासरांना पुन्हा उत्तम व्यवस्थापन, आहार, आरोग्य देणे गरजेचेच असते. म्हणजेच व्यवस्थापन, आहार, आरोग्य वगैरे बाबींमधील सुधारणा या महत्वाच्या असल्या तरी केवळ त्या जनावरांच्या तेवढ्या आयुष्यापुरत्याच मर्यादित राहतात. पुढील पिढीत उत्पादनहेतु अपेक्षित सुधार व्हावा असे वाटल्यास जनुकीय पातळीवरील (GeneticImprovement)सुधारणा केल्याशिवाय पर्याय नाही.

आपल्या पशुधनाचे जे काही गुणधर्म आहेत, जसे दुधउत्पादन, मांस उत्पादन, कार्यशक्ती इ. ते नियंत्रित करण्याचे काम शरीरातील अतिसुक्ष्म अशी जनुके म्हणजे (Genes) करीत असतात. म्हणजे आपण दुधाचे उदाहरण पाहूया. दुध वरपांगी जरी एक उत्पादन वाटत असले तरी दुध म्हणजे पाणी, प्रथिने (Proteins), स्निग्धपदार्थ(Fat), शर्करा(Glucose), जीवनसत्वे (Vitamins), खनिजद्रव्ये (Minerals)अशा अनेक घटकांचा संयुक्त पदार्थ असतो. प्रत्येक प्राण्यांत दुधउत्पादन क्षमता वेगवेगळी असतेच त्याचबरोबर दुधाचे जे घटक पदार्थ असतात त्यांची पातळी सुद्धा वेगवेगळी असते.

दुधातील प्रत्येक घटक पदार्थास नियंत्रित करणारे स्वतंत्र जनुके असतात. प्रत्येक जनुकाचे काम त्याच्या त्याच्या रासायनिक घटक आम्लांमुळे वेगवेगळ्या स्वरुपात व्यक्त होत असते. काही जनुके एकमेकांसोबत मित्रत्वाने राहतात किवा व्यक्त होतात. तर काही जनुके परस्परविरोधी भूमिका पार पडतात. उदा. दुधाचे उत्पादन ज्या जातीच्या जनावरांत जास्त असते त्यांच्यात दुधातील स्निग्धाचे प्रमाण कमी असते. आपल्याला जर दुधातील स्निग्धाचे प्रमाण वाढवायचे असेल तर स्निग्धाला नियंत्रित करणारा जो विशिष्ट जनुक (Fat gene) आहे त्यात जनुकीय पातळीवर बदल करून पुढील पिढीत असा सुधारित जनुक गेला तर अपोआप होणाऱ्या कालवडीपासून भविष्यातील दुधउत्पादनात स्निग्धाचे प्रमाण अधिक राहील.

आपण ज्या विविध पातळीवर सुधारणा करतो त्या सुधारणा पुढच्या पिढीत जात नाहीत. उदा. दुधत्पादन साठी तुम्ही गायींना हिरवा चारा दिला आणि व्यवस्थित काळजी घेतली त्यायोगे उत्पादन पातळीत जो फरक दिसून आला तो त्या गायीपासून मिळणाऱ्या कालवडीमध्ये दिसणार नाही. त्या कालवडींना त्यांच्या दुग्धोत्पादन कालावधीत हिरवा चारा, व्यवस्थापन इ. लागतीलच मात्र आनुवांशिक सुधारणा पुढल्या पिढीत जाते म्हणून ती महत्वाची ठरते.

## आनुवांशिक सुधारणा पद्धती

निवड पैदास




गीर गाय



गीर वळू

आपल्याला माहिती असेल की आपल्याकडील जनावरे ही देशी, विदेशी, संकरीत इ. विविध जातींची असतात. आपण ज्यांना देशी संबोधतो त्यातही जातिवंत, अर्धसंकरीत, गावरान अशी वर्गवारी केली जाते. उदा. गीर, सहिवाल, खिल्लारी, गवळाऊ या देशी गायी आहेत. जर्सी, होल्सस्टेन फ्रीझन या विदेशी गायींच्या जाती आहेत. देशी गायींमध्येही महाराष्ट्रात गवळाऊ, खिल्लार, डांगी, देवणी, लाल कंधार अशी जातिवंत जनावरे आहेत. जसे खिल्लारची उंची व शिंगाची ठेवण व त्याचबरोबर प्रत्येक जातींचा बाह्यरंग अशी गुणवैशिष्टे पाहायला मिळतात.

प्रत्येक जनावरांच्या जातीचे गुणवैशिष्टे त्यांच्यातील विविध जनुके नियंत्रित करीत असतात, आनुवांशिक पातळीवर सुधारणा करण्यासाठी विशिष्ट गुणधर्मधारक जनावरांचा संकर करून किंवा एखाद्या जातिवंत जनावरांचा उत्पादनक्षमतेचा विकास करण्यासाठी त्या जातिवंत जनावरांना 'निवड पैदास' (Selective breeding) पद्धतीचा अवलंब केल्यास होणारी पिढी आपल्याला पाहिजे त्या उत्पादनक्षमता धारक गुणधर्मांनी संपन्न असेल.

## संकरीकरण



गीर गाय

X



जर्सी वळू

जातिवंत जनावरांच्या अंगभूत गुणधर्मांचे संवर्धन होण्यासाठी आपण त्यांचे **संकरीकरण** (Cross breeding) टाळतो. मात्र जी जनावरे गावठी/ गावरान किवा शास्त्रीय भाषेत अवर्गीकृत (Non descript/ND) या गटात मोडतात. ज्यांच्यातील गुणधर्म कुठल्याच जातिवंत जनावरांशी जुळून येत नाहीत व त्याचबरोबर ज्यांची उत्पादनक्षमता सुद्धा खालावलेली असते. अशा गटातील जनावरांसह उत्पादनक्षमता अधिक असलेल्या जर्शी, होल्सस्टेन फ्रीझन सारख्या विदेशी गायी यांचेसोबत संकरीकरण या पद्धतीचा अवलंब करावा.

## पत सुधारणा



गावठी / संकरीत म्हैस

X



मुर्रा वळू

म्हशीमध्ये पत सुधारणा (Grading up) ही पद्धत अवलंबिली जाते. पत सुधारणापद्धतीत गावठी म्हशींचा इतर स्थापित जातींच्या म्हशीसोबत संकर केल्या जातो; जेणेकरून पुढील पिढीत स्थापित जातीच्या म्हशींचे अर्धे गुणधर्म आढळतील.

## आनुवंशिक सुधारणेचे माध्यम

गाय व वळू दोनी उत्तम प्रतीचे असल्यास मिळणारी संतती उत्तम गुणवत्ताधारक मिळते. आजमितीला कृत्रिम रेतन (Artificial insemination) पद्धतीने सिद्ध वळूचे वीर्य (ProvenSireSemen) सर्वच शासकीय पशूंच्या दवाखान्यात उपलब्ध असते. वस्तूस्थितीनुसार, एक गाय तिच्या आयुष्यात जास्तीत जास्त १० § १२ वेळा पिलांना जन्म देऊ शकते, मात्र वळूपासून वीर्य संकलन करून ते कृत्रिम रेतनासाठी वापरले तर एक वळू असंख्य कालवडीचा / वासरांचा 'पिता' होऊ शकतो. म्हणूनच वळूमधील जनुकीय किवा आनुवांशिक सुधारणा अधिक महत्वाची असते. एक वळू एकावेळी सरासरी ४ मिलि वीर्य देतो. एक मिली विर्यापासुन सरासरी ४० रेतन डोस मिळतात. यशस्वी फलनासाठी एका डोसमध्ये सरासरी ३० दशलक्ष शुक्राणू असावे लागतात. यावरून एका वळूपासून एकावेळी मिळालेल्या वीर्यापासून साधारण १५० ते २०० गायी फळवता येतात म्हणूनच आनुवांशिक सुधारणेत वळू हा केंद्रस्थानी असतो. मात्र त्याचबरोबर गायीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उत्तम गायीची निवड करण्यासाठी तिच्यापासून प्राप्त कालवडीच्या उत्पादन क्षमतेचाही विचार करावा लागतो यासाठी आपल्याजवळील पशुधनाच्या मुलभूत बाबी तसेच उत्पादनाच्या नोंदी ठेवणे सुद्धा आवश्यक आहे.

## विदेशी वंशाचे रक्तप्रमाण

आपल्याकडील एकूण पशुधनाच्या ८०% गावरान / अवर्गीकृत जनावरे आहेत. कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ / सुधारणा करणे हेतूने आपण विदेशी वंशाच्या जातीच्या वळूचे वीर्य वापरतो. आई वडिलांकडून मुलांमध्ये प्रत्येकी ५०% - ५० % गुणधर्म असतात. अशा वासराची / कालवडीची आंतर-पैदास केली म्हणजे पुन्हा पित्याशी संकर केल्यास, पित्याकडून पूर्वीचे प्राप्त २५% गुणधर्म व आता नवीन पिढी वेळेसचे ५०% गुणधर्म असे मिळून एकूण ७५% गुणधर्म दुसऱ्या पिढीत बनतात. वळूच्या वीर्याचे जेवढे प्रमाण असेल त्याच्या निम्मे पुढच्या पिढीत जाते. म्हणून पैदास प्रणालीचे धोरण ठरवताना विदेशी जातीच्या वळूचे प्रमाण काही वेळा ५०% तर काही वेळा १०० % ठेऊन होणाऱ्या पिढीमध्ये ६२.५०% च्यावर जाता कामा नये याची काळजी घ्यावी लागते.



## भारतातील आनुवांशिक सुधारणा कार्यक्रम

भारतात स्वातंत्र्यापूर्वीच काही अंशी जनावरातील अनुवांशिक सुधारणेची मुहूर्तमेढ 'टेलर' या पटना, बिहार इथे विकसित संकरीत गायीच्या माध्यमातून झालेली आहे. स्वातंत्र्यानंतरही पंचवार्षिक योजनेद्वारे एकात्मिक गोवंश विकास प्रकल्प, दुधमहापूर योजना इत्यादी अनेक उपक्रमाद्वारे विविध जातिवंत गाईमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्याचबरोबर देशी गायींचे व इतर देशी जनावरांचे नोंदणीकरण व संवर्धन, संकरीकरण, कृत्रिम रेतन केंद्रांची स्थापना अशा उपक्रमातून विविध पातळीवर सुधारणा करण्यात आल्या आहेत. विविध प्राण्यांच्या जातींचा व त्यांच्या गुण-

गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी 'राष्ट्रीय पशुअनुवांशिकी संसाधन ब्युरो (NBAGR) करनाल' हरयाणा येथे स्थापना केलेली आहे, याशिवाय विविध प्राण्यांच्या केंद्रीय संशोधन केंद्राची स्थापना केलेली आहे. उदा. राष्ट्रीय डेरी अनुसंधान केंद्र (NDRI) करनाल, राष्ट्रीय म्हैस संशोधन केंद्र, हिस्सार येथे आहे. याच बरोबर जैवतंत्रज्ञान शास्त्रातील नवनवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने (भृणप्रत्यारोपण, ETT) पशूंच्या आनुवांशिक सुधारणेस गती मिळाली आहे. आपल्या पशुधनातील आनुवंशिक सुधारणा करणे आपणास सहज शक्य आहे. उत्तम प्रतीचा वळू आपल्या गोठ्यात असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण तर आहेच त्याचबरोबर असा वळू म्हणजे आनुवंशिक सुधारणेची गुरुकिल्लीच म्हणावी लागेल.

आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम गावपातळीवर यशस्वीपणे राबविण्यासाठी कृत्रिम रेतन करणाऱ्या सक्षम व कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची गरज आहे. म्हणून केंद्र शासनाने राष्ट्रीय गोकुळ मिशन प्रकल्प (२०१४) हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे प्रमुख उद्देश खालीलप्राणे आहेत.

- देशी पशुधनाचा विकास आणि संवर्धन करणे
- पैदाशीसाठी उच्च आनुवंशिकता आणि रोगमुक्त वळूंचे वितरण करणे
- दूध उत्पादन क्षमता आणि दुग्धोत्पादन वाढीसाठी प्रयत्न करणे
- साहीवाल, गिर, राठी, देवणी, लाल सिंधी व थारपारकर या अधिक दुधाळू जातींचा देशी पशुधनाच्या गुणवृद्धीसाठी प्रयत्न करणे
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व सामान्य संसाधन व्यवस्थापन यांना प्रोत्साहन देणे

**कृत्रिम रेतनाने भरता गायी-म्हशी ।**
**आनुवंशिक सुधारणेने होईल सरशी ।।**



महापशुधन वार्ता

# नागपुरी म्हैस :
# ग्रामीण अर्थव्यवस्थेचा नवा कणा



**विदर्भाच्या मातीशी एकरूप झालेली, काटक आणि देखणी अशी 'नागपुरी म्हैस' खऱ्या अर्थाने पशुपालन क्षेत्रातील 'ब्लॅक डायमंड' ठरत आहे. नुकताच नागपुरी म्हशीच्या मूळ पैदास क्षेत्रातील पशुपालकांशी संवाद साधण्याचा योग आला. या देखण्या पशुधनाचे गुणवैशिष्ट्ये व शेतकरी समुदायाची नागपुरी म्हशीबद्दलची निष्ठा पाहून एक सकारात्मक ऊर्जेचा अनुभव आला.**

**शब्दांकन:** डॉ. सतीश राजू
प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन
व दुग्धव्यवसाय
नागपूर विभाग, नागपूर

नागपुरी म्हैस ही केवळ दुधाळ जात नसून, ती निसर्गाने विदर्भाच्या मातीला दिलेली एक उत्कृष्ट भेट आहे. चित्रात पाहिल्याप्रमाणे, या म्हशींच्या चेहऱ्यावरील आकर्षक पांढऱ्या खुणा, फिकट डोळे व पाठीमागे पसरलेली लांब शिंगे त्यांना इतर जातींपासून वेगळे व अद्वितीय बनवतात.

या म्हशीची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

- विदर्भातील कडाक्याच्या उन्हातही या म्हशी स्वतःला उत्तम प्रकारे जुळवून घेतात.
- पूर्णपणे नैसर्गिक कुरणावर जगण्याची क्षमता असल्याने, या जातीसाठी खर्च अतिशय कमी येतो.
- सरासरी 7 ते 8 किलो दुग्धोत्पादन देणाऱ्या या म्हशीच्या दुधात 7% पेक्षा जास्त फॅट व 9 % चा ठोस SNF असतो, जो डेअरी उद्योगासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

### शाश्वत विकासासाठी योजनांची जोड

पशुपालकांशी झालेल्या चर्चेतून एक महत्त्वाची बाब समोर आली, ती म्हणजे या स्थानिक प्रयत्नांना शासकीय योजनांची जोड देणे. नागपुरी म्हैस संवर्धनासाठी आता औपचारिक पशुपालक संघटनेची स्थापना करण्याच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावरील या कार्यक्रमाद्वारे पशुधनाची उत्पादकता वाढवण्यावर भर दिला जाईल. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून स्थानिक पशुपालकांना केवळ शेतकरी न ठेवता 'उद्योजक' म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

### देशी जातींचे संवर्धन: काळाची गरज

आपल्या देशी जातींचे संरक्षण करणे हे केवळ पशुसंवर्धन नसून, तो आपल्या संस्कृतीचा व वारशाचा भाग आहे. नागपुरी म्हशीसारख्या कणखर जातींचे संवर्धन केल्यास भविष्यातील हवामान बदलाच्या आव्हानांना आपण समर्थपणे तोंड देऊ शकतो. जेव्हा आपण तळागाळातील पशुपालकांना सक्षम करतो व त्यांना आवश्यक संसाधने मिळवून देतो, तेव्हाच आपल्या देशी पशुधनाचा वारसा खऱ्या अर्थाने सुरक्षित होतो. 'ब्लॅक डायमंड' म्हणून ओळखली जाणारी ही नागपुरी म्हैस आगामी काळात ग्रामीण महाराष्ट्राच्या समृद्धीचे प्रतीक ठरेल, यात शंका नाही.








महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:
पशुसंवर्धन विभाग
स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
134
वर्ष
गौरवशाली परंपरा
१३४ वर्षाची
गौरवशाली परंपरा!
पशुसंवर्धन विभाग: शेतकयांच्या प्रगतीचा विश्वासू साथी.
दुध, अंडी व मांस:
सकस आहारासाठी वाढते उत्पादन.
शेळी-मेंढी विकास:
आर्थिक दुर्बल घटकांना आधार.
कुक्कुटपालन:
सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी.
गोवंश सुधारणा:
स्थानिक आणि संकरित गाईच्या पैदासीवर भर.
चला, पशुपालनातून
घडवूया समृद्ध महाराष्ट्र!

# महापशुधन वार्ता